
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध ...
सं. क्र. 3443



REFBK-0027050

संस्कृत / निबंध
3443
26040
E1C1E3



प्रा सं गि का

दुर्गा भागवत



REFBK-0027050

वरदा बुक्स

प्रथमावृत्ती
दिवाळी १९७५
© दुर्गा भागवत
प्रकाशक
ह. अ. भावे
वरदा बुक्स
वरदा, सेनापती बापट पथ
पुणे ४११ ०१६
मुद्रक
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४ बुधवार पेठ
पुणे ४११ ००२
मुखपृष्ठ
सुभाष अवचट
किंमत
दहा रुपये

प्रसंग

निळावंतीची पोथी	५
नाद-प्रतिमा	१४
कार्तिकी एकादशी	२४
शेवंती, शेवंती आणि शेवंती	३४
फुलभेट	४३
धर्मप्रचारक आणि अबला	४८
विद्येच्या वाटेवर	५४
गोष्ट 'मोरण्या'च्या पुस्तकाची	८७
'ज्ञानकोशा'विषयी थोडेसे	१०९
अरेबियन नाइट्स	११४
एक थंडगार गोष्ट	११८
विनायक दामोदर सावरकर	१३०
कर्वे आले, कर्वे गेले	१३७


ग्रंथालय
नि व
ग्रं. क्र. 3443
26040
8/8/07

निळावंतीची पोथी

बऱ्याच वर्षांपूर्वी मी कुठे तरी ऐकले होते की निळावंतीची पोथी आहे. तिच्यात पशु-पक्ष्यांच्या विविध भाषा आहेत. तंत्रविद्येतले गूढतम रहस्य या पोथीत आहे. जन्ममृत्यूचे रहस्य तिच्यात सांगितलेले आहे. जगात एका वेळी फक्त दोनच माणसांना मोठ्या चमत्काराने ही पोथी प्राप्त होते; पण ही वाचली तर बहुतेक, वाचणारा सहा महिन्यांच्या आत मरतो. जसजशी लोकसाहित्याच्या शोधात मी अधिकाधिक भटकू लागले, तशी निळावंतीची ही कथा अधिकाधिकच गूढ नि भयावह होऊ लागली. पुढे दोन चार व्यक्तींच्या तोंडून असेही ऐकले की, ही पोथी छापलेली आहे. ती मराठीत आहे; आणि स्वामी विवेकानंदांनी ती वाचली होती. महाराष्ट्रात ते आले तेव्हा त्यांना ती मिळाली; म्हणजेच गूढविद्येत त्यांचा लौकिक फार असल्यामुळे त्यांना ती कुणी भक्ताने दिली. असे म्हणतात की, स्वामीजींना या पोथीची माहिती कळल्यावर त्यांना तिच्याबद्दल औत्सुक्य निर्माण झाले. त्यांनी ती मागितली. परंतु अपमृत्यूचे संकट समोर उभे असल्यामुळे कुणी भक्त ती देईना. पण अखेर स्वामीजींच्या हट्टाला शरण जाऊन ती पोथी त्या भक्ताने त्यांना दिली. स्वामीजींचा मृत्यू त्यानंतर सहा महिन्यांतच घडून आला असे म्हणतात. कुणी म्हणतात की, मूळ पोथी बंगालीत आहे आणि तीच विवेकानंदांनी मृत्यूपूर्वी सहा महिने वाचली.

ही सारी सांगोवांगीची हकीकत असली तरी परंपरेत तिला फार वजन आहे. मला या दुर्मिळ पोथीबद्दल कुतूहल वाटले ते तिच्यातल्या गूढविद्येबद्दल नसून तिच्यातल्या पशुपक्ष्यांच्या भाषेबद्दल, म्हणजेच त्यांच्याविषयीच्या काही संकेतांबद्दल.

त्यानंतर मी तिच्याबद्दल मिळेल त्याला माहिती विचारीत सुटले. एक लावणी मिळाली; छापलेली. निळावंतीच्या त्या लावणीत निळावंती रात्री नदीच्या पुरात उडी घेते, एका प्रेताला दातांनी ओढून काठावर आणते, आणि आपल्या मंत्रविद्येने त्या पिशाच्चाकडून अलौकिक साधने व द्रव्य मिळवते; तिच्या पतीला तिच्या पातिव्रत्याचा संशय येतो, पण तो पुढे नाहीसा होतो, वगैरे. निळावंती व गूढविद्या यांचा एक धागा या लावणीत असा राखला गेला आहे.

पण ही काही निळावंतीची पोथी नव्हे. लावणीला विविध पर्याय आहेत. परंतु त्या पर्यायांनी मूळच्या विचारणेला कुठलेच उत्तर मिळत नव्हते.

एक दिवस काय झाले ? माझे एक स्नेही अध्यात्मात पुष्कळ साधना केलेले आहेत, त्यांना मी म्हटले, " तुम्हाला निळावंतीच्या पोथीची काही माहिती मिळाली आहे का ? मला सांगा. "

विवेकानंदांची आख्यायिका त्यांनीही ऐकलेली होती. ते म्हणाले, " या वाईट पोथीच्या नादी तुम्ही कशाला लागता ? "

पण मी त्यांना सांगितले, " म्हणूनच मला ती वाचायची आहे. कर्व्यानंतर, मीच बहुतेक शंभर वर्षं जगेन. तेव्हा मला अपमृत्यूचं भय नाही."

हो ना करता ते तयार झाले. म्हणाले, " तपास करतो."

वर्ष उलटले. एक दिवस ते आले व म्हणाले, " निळावंतीच्या पोथीचा माहितगार एक माणूस आहे. पण तुम्ही त्याला भ्याल."

" भ्याले तर मग पाहू. पण तुम्ही तयार असलात तर आपण जाऊ या."

" मी तयार आहे. त्याच्यापासून तुम्हाला अपाय होणार नाही एवढं मी पाहीन. पण हे साहस आहे हे विसरू नका."

निळावंतीच्या पोथीचे वास्तवात दर्शन होणार, मी ती वाचणार या कल्पनेने मला हर्ष झाला. पण संशोधनातली ही हर्षाची लाट लवकरच ओसरली. कारण ती पोथी अद्याप केवळ एक संभाव्यता होती. शक्यता नव्हती. मग वास्तवता तर कुठली ? संशोधनात शंभर निराशा गिळल्यानंतर

एक झुरूमुरू आशा वाटयाला येते हे अनुभवाचे सत्य आठवले. आतुरतेला आळा घातला, पण निर्धार सोडला नाही. त्या गृहस्थांकडे जायचेच असे उरवले.

ते स्नेही व मी दोघे आगगाडीने निघालो. जिथे उतरलो तिथल्या लोकांनी त्या गृहस्थांबद्दल भला शब्द काढला नाही. पण आम्ही जायचा बेत बदलला नाही. त्यांची भेटायची वेळ रात्री दहा वाजल्यानंतर. रात्रभर त्यांची प्रॅक्टीस चाले. शेकडो लोकांची ये-जा असे. नदीच्या काठच्या बोळात एका भव्य पडक्या वाडयात त्यांचे वास्तव्य होते,

आम्ही गेलो. गृहस्थ चौरंगावर बसले होते. सभोवार मंडळी होती. चांगली तोलामोलाची माणसे होती. गृहस्थ बोलत होते. भाषा गावरान, शिवराळ होती. देहयष्टी अगदी काठीसारखी. चर्या उग्र. हसणे भेसूर. आवाज चिरका. डोळे एकाच वेळी स्थिर आणि चंचल असे. सर्वकडे उग्रता होती. विलासाची नावनिशाणी नव्हती. धूप नव्हता. दीप नव्हता. देवदेवतांचे अवडंबर नव्हते. शंकराची तसवीर आणि दुसऱ्या दोन तसबिरी होत्या.

आम्ही नमस्कार करून बाजूला बसलो. पोथी मिळवायची तर सर्व शिष्टाचार पार पाडणे भाग होते नि युक्तही होते. स्नेह्यांनी ओळख करून दिली आणि येण्याचा हेतू सांगितला. त्याबरोबर गृहस्थांचा चेहरा आणखीच उग्र झाला. तिरस्काराच्या हसण्याने खोली भरून गेली.

"निळावंतीची पोथी ? नि ही बाई वाचणार ?" ते खूप हसले. बाकीची मंडळी स्तंभित झाली.

माझे नाव लेखिका म्हणून त्यातल्या काहींना माहीत होते; आणि बाकी काही माहीत नसले तरी मी लग्न न केलेली आहे ही गोष्ट अधिक माहीत होती, असे त्यांच्या उद्‌गारावरून सहज दिसून आले. माणसे चकित झाली. कारण निळावंतीची पोथी हे एक तर त्यांच्या त्या गृहस्थ गुरूंचे राखीव क्षेत्र होते. पृथ्वीतल्या साऱ्या अधिकारांना तुच्छ तुच्छ करणारे अधिकार-बळ निळावंतीने या विद्यमान एकमेव श्रेष्ठाला दिले होते. त्या श्रेष्ठतेची आढ्यता गृहस्थांच्या मुखावर रेषेरषेत दिसत होती. रेषेरेषेत म्हण

ण्याचे कारण त्या गृहस्थ-श्रेष्ठांचे वय पन्नाशी गाठलेले होते, हे त्यांच्याच बोलण्यातून कळले.

तेच म्हणाले, " मी नोकरीत साधा शिपाई. पण लक्ष या मारगा-कडस; तवा दिल्ली नोकरी सोडून अन् बसलो यवून हिकडं. आज्ञा झाली वरची की, हिथून फुडं जगाचं भल्लं कर. "

स्नेह्यांनी माझे निळावंतीचे प्रकरण पुन्हा पुढे ढकलले. तेव्हा गृहस्थ म्हणाले, " हूं ! बाईमानसानं कधी कुठं विद्या पढलीय व्हय ? सोडा राव. तुमचं शिक्शन अन् ह्ये शिक्शन काय येक न्हवं. बुकं पढून विद्या होते व्हय ? अन् आता असं पाहा, ही बाई काय संसारात पडली नाई. हिला गती नाई. म्हंजे हिची जात आमच्या शास्तरापरमानं मुंजाची. ते नशीब काय चुकतं ? आम्हाला पुना जनमच नाई. हा फरक गिरस्तात अन् या अशा लोकांत. ही बुकं वाचा की लिवा त्यात मोक्षाची किल्ली न्हाइच.

" आमचं तसं नाही. बघा माझं वय पन्नास झालं; पन् अजून संसार चालू."

" ए ! हिकडं ये गं" त्यांनी हाक मारली. एक पंचविशीची, अतिशय उग्र चेहऱ्याची, पण देखणी स्त्री पुढे आली. तिच्याबरोबर चार मुले; सर्वांत मोठे नऊ वर्षाचे, धाकटे वर्षाचे.

" बघा, कसं शरीर हाय ते. सांगतो बाई, असा जनम हवा. आता ही पोटुशी हाये हं. पण उद्या आम्ही संसारातून भाईर पडनार. मग मुलं-बाळं फुडं नाही. ब्रह्मचरिय पालणार. तशी आज्ञा हाये. हूं ! तुम्ही निळा-वंती हवी म्हनता. निळावंती कोन हो वाटती तुम्हाला ? ती का सादीसुदी वाटली व्हय ? तुम्हाला नील द्रिष्टी म्हाईत हाय ? न्हाई ना ? कुठून असणार ? निळावंती ज्याला गावली त्याला ती द्रिष्टी मिळाली. साऱ्या दुनियेतलं सारं काय हिथं बसून दिसतं. "

मग माझ्याकडे खूप निरखून पाहून मोठा संशय आल्यासारखा आवि-र्भाव करीत ते म्हणाले, " पन् तुम्हास कशापायी ही नसती उठाठेव ?"

" मला पक्ष्यांची भाषा कशी असते ती पाहायची आहे. "

" पक्ष्यांची भाषा ? हूं: ! असं काय पन गावायचं न्हाई त्या पोथीत. दुनियेतल्या साऱ्या जिवांची गत त्यात हाये. ती मुंजा मानसाला कशी कळणार ? बोला, कळेल का ?"

" कशी कळणार ?" एक भक्त बोलले.

जोरात मान हलवून हसून गृहस्थ म्हणाले, " कसं बोललात ! न्हाईच कळणार. आता बाई, तुम्ही आमच्यापून मोठ्या, तुम्हाला ताई म्हणतो. पन बघा, मी हिथे बसून माणसाच्या आत्म्याची जोत बघतो. आता या तुमच्या संगं आलेल्या दादाची जोत कशी चूडेवाणी हाये बघा, झळझळीत."

मग चेहरा खूप गंभीर नि दुःखी करीत ते माझ्याकडे टक लावून म्हणाले, " हं ! कर्माचं संचितच न्हाई बघा तुम्हाला. तुमची जोत इंचभर बी न्हाई; तिला उजेड न्हाई. फड फड फड फड करतेय. कधी बंद पडेल त्याचा भरोसा न्हाई." मग डोळे मिटून ते म्हणाले, " बघा तुमची जोत फिकी. विझू विझू करतेय. दोन वरसात मरणार तुम्ही. नि मरते वखत कुत्रं ढुंकून बघणार नाही. मानसं घरातली, भाऊ, बहीण, भाचे, कुण्णी कुण्णी बघणार नाही. हाल हाल होतील. हूं ! नशीब असं हाये. दोन वरसं फक्त."

" यांचं बोलणं कधी खोटं होत नाही," भक्त म्हणाले.

" आता निळावंतीची पोथी वाचायला अधिकार लागतो. तो तुम्हाला न्हाई. या दादांना आहे. पन् तुम्ही तर निघाला निळावंती, निळावंती करीत. बघा, एकानं असाच हट धरला. दिली त्याला पोथी. पन् महिन्यात मेला; घरदार सारं गेलं. वाटुळं झालं ! तुम्हाला चालेल ?"

स्नेही मोठ्या प्रयासाने संताप आवरीत होते. पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करून गृहस्थ म्हणाले, " बघा, बाई तुम्ही हा नाद सोडा. अगदी हटच असेल तर पोथी मिळवून देतो. हाय एकाच्याकडे, पत्ता देतो.'

" द्या" मी म्हटले.

" द्या ? काय द्या ? म्होरं ऐका नि बोला. अहो ! निळावंतीची पोथी मिळते. पण ती अशी तशी न्हाई; मिळाली तर जवळ टिकत न्हाई. टिकली तर लाभत न्हाई. मला मिळाली. लाभली. नि बघा, आपलं वाचन

झालं की, ती रानात एकटं जाऊन ठेवावी लागते. मागे वळायचं नाही. फिरून, आपल्याला ती कुठे ठेवली तो रस्ता उमगत न्हाई. निळावंतीचा रस्ता कुणालाच परत सापडत न्हाई. आता आम्हाला निळावंती पावली. तेव्हापासून नीलद्रिष्टी आली. आता तुम्ही पेपरात वाचता की मानसं गेल्या महिन्यात चंद्रावर पोचली. चंद्र असा नि तसा म्हनतात. पन मी हथं बसून चंद्र बघितला. या सदूअण्णांना पण बरोबर घतलं. सारा चंद्रलोक पालथा घातला."

"होय तर. अगदी तसंच पाह्यलं आम्ही." सदूअण्णा बोलले.

"बघा! कशाला हवी विमानं नि कसलं तुमचं सायन्स? नीलद्रिष्टी हवी. मग दुनिया तुमच्या ढुंगणाखाली. आता हेच सांगायला मी अमेरिकेत जाणार हाये. सदूअण्णा बरोबर येईल. इंग्रजी काय? तिथे फडाफडा बोलून दाखवीन. त्ये अमेरिकन थक्क होतील बघा. आमचा योग हायेच तसा."

प्रफुल्ल मुद्रेने ते पुढे म्हणाले, "हं! आता तुम्हाला सांगतो. आता म्हणे डॉक्टर लोक ऱ्हिदयाचं आपरेशन करून मेलेल्याचं ऱ्हिदय जिवंत करनार. याचं ऱ्हिदय त्याला नि त्याचं याला. लोकांना नवल वाटलं. मी म्हणतो काय हाये यात नवलाचं? अहो ताई बघा, त्या येशू ख्रिस्ताने म्हणे मुडदा उठवला. काय हाये त्याच्यात? मी दाखवतो मुडदा उठवून. अहो! मेलेल्यांचे आत्मे भटकत असतात. द्यायचा असा एक आत्मा त्या मढ्यात घालून की, उठला मुडदा. आता त्येचा आत्मा बदलला की काय ते कोन बघतो? पन मी इथे करीत न्हाई, कारन मग लोक हिथं गोळा व्हतील. बुवाबाजी नको आपल्याला."

मग थोडे थांबून तो म्हणाला, "आता तुम्हाला हे खरं वाटणार न्हाई. पन माझी थोडी ओळख देतो. मी समंध काढतो. ब्रह्मसमंध. बाकीची धेडीभुतं काढतात हलकेसालके लोक. मी या सदूअण्णांचा समंध काढलाय."

"हो. माझी पीडा यांनीच घालवली." सदूअण्णा बोलले.

"ऐका, समंध ब्राह्मण. तो ब्राह्मणालाच जास्त लागतो. आता त्याची पन मजा हाये. आता ह्या सदूअण्णांचा समंध मी काढला ना, पन तरी हा

मरेल तेव्हा फिरून समधच होनार. असे किती समंध मी लोळवले. पार जितले. या वाड्याच्या छपरावर शेकडो समंध पाहारा करतात. तुम्हाला परिचिती हवी तर देतो सोडून एक तुमच्या मागे. येईल भुंबईला. पन् नको. तुमची जोत लहान. पण तुम्ही सत्यवचनी आहा. म्हणून तुम्हाला मानतो."

मग त्याने बायकोला हाक मारली, 'बघा, आता तिच्या अंगात समंध येऊन तो तुमचं सारं भूतभविष्य सांगील.'

बाई आली. मांडी घालून बसली. डोळे लाल झाले. तोंड खूप क्रूर झाले. थरथर कापत ती-म्हणजै तो समंध म्हणाला, " मी फार रागावलो आहे. आता काही सांगत नाही.' ती उठली नि पाय आदळीत निघून गेली.

आता एक प्रकारे वारा निघून गेला होता. गृहस्थ म्हणाले. " मोठा समंध आहे. फार लहरी. जाऊ दे. आता माझी हकीकत सांगतो. काशीत एका देवळाचा मी गेल्या जनमी पुजारी होतो. पन मी धोबिणीसी संग केला. म्हणून या जनमी अशा हीन जातीत आलो. मी लवकर मेलो नि माझ्या आईबापांना एका बंगाल्याने अघोरी करून मारलं. आता ते पुजारीपण त्या बंगाल्याच्या वंशजाकडे हाये. मी माझ्या विद्येने त्या बंगाल्याला ठार मारून फिरून पुजारी होणार हाये. तिन वरसं लागतील. माझा धाकटा मुलगा पन गेल्या जनमीचा ब्राह्मण. फार मोठा होणार आहे तो. या वाड्यात गुप्त धन हाये. सारा वाडा खोदला हाये. आणखी सहा महिन्यांनी बायको बाळंत झाली की, ते धन मला मिळणार. मग मी या गावात एक धरमशाळा बांधणार. तिन दिवस राहाणं-जेवणं फुकट. अहो, लॉन्ड्रीसुद्धा फुकट. मग आम्ही काशीला जाणार."

मग फिरून खालचा आवाज काढून तो म्हणाला, " अहो, दोन वरसं तर तुमचं आयुष्य राहिलंय. कशाला हट्टापायी आणखी लहान करता ? आन् बघा. तुमच्या भावाचा कुळक्षय होईल. चालेल ?"

" भावाचा कुळक्षय " या शब्दांचा आता निळावंतीशी असलेला संबध तुटला होता. मला कळून चुकले होते की, इथे आता काहीच खरं नाही. तरी पण त्या शब्दांनी मी थरथरले. भावाचे लहानसे गोकुळ नष्ट

होण्याची कल्पना कुठल्याही रूपाने असह्य वाटावी अशीच होती. मी उद्‌गारले, " भावाचा कुळक्षय अर्थात नको. "

" झालं ! आता निळावंती बाईच्या हाती पडायला नको. " अत्यानंदाने गृहस्थ म्हणाले. खरे म्हणजे त्यांना त्यांच्या व्यवसायातली मी प्रतिस्पर्धी होते की काय ही धास्ती पडली होती. ती आता पूर्णपणे निघून गेली होती. ते खूप खुषीत आले नि म्हणाले, ' ताई, उद्यापासून आम्ही ब्रह्मचरिय पाळणार. उद्या होम करणार हाये. तर तुम्ही जेवायला यायचं. दादांना घेऊन. ब्राह्मण भोजन तेच उद्याचं. नाही म्हणू नका. "

पुढे ते म्हणाले, " होम म्हणजे तसा देवाबिवाचा नाही हो. नि ब्राह्मण भोजन तुम्ही साप बोलता म्हणून. मी विष्णूच्या डोकीवर पाय ठेवतो. शंकरावर थुंकतो." असे म्हणून ते खरोखरच थुंकले.

" उद्या तुम्हाला आणखी अशी गोष्ट सांगतो की तुम्ही थक्क व्हाल."

ती गोष्ट ऐकायची जिज्ञासा मात्र तीव्र होती. तेव्हा मी दुसऱ्या दिवशी जेवायला गेले. गृहस्थांनी स्वतः लाडू वाढले. दक्षिणा रुपायाची दिली, नि नमस्कार केला.

जेवण झाले. ते सांगू लागले, " आता पाहा ! मी मोठमोठ्या समंधांशी झुंज घेतो. एकदा जवळच्या गडावर मोठा समंध होता. रात्री दोन वाजता एकटा गेलो. अगदी त्याच्या राज्यात. हगलो. मुतलो. शिव्या दिल्या. समंध खवळला. पण करतो काय ? ती लघवीच ओलांडवेना त्याला. मग केला त्याला दास. माझ्या छपरावर बशिवला आणून. अन् हा बघा मुलगा.' तिथे बसलेल्या दहाबारा वर्षांच्या मुलाकडे बोट दाखवून ते म्हणाले, ' याला लागला होता समंध. सवंक्रीत बोलायचा. शाळेत अभ्यास धडाधड करायचा. बापाला वाटलं ह्ये काय झालं ? पोरगा खेळेना. बोलेना. मग आणला इथं आम्ही समंध घालविला. आता, न्हाई येत पहिला नंबर. पन् पोरगं खेळतं, बोलतं. व्हय ना रे? "

पोरगा ' हो ' म्हणाला.

" आता या मुलाचा अभ्यास बेताचा आहे. पण समंध सुटला." सदू-

अण्णा म्हणाले.

" आता ऐका, एक झुंज अजून जितलो न्हाई. पण मी जिंकणारच जिंकणार. याच जिल्ह्यात जवळच्या तालुक्यात नळवाडीचा डोंगर हाये. त्याच्या शिखरावर हाये म्हादेवाचं देऊळ. तिथं देवळात एक मोडकी वीणा हाये. मध्यान् राती नळराजा तिथं येतो. पिंडीला नाहू घालतो. जासुंदीचं लाल फूल घालतो. अन् वीणा वाजवून निघून जातो. नळराजा काय सात चिरंजिवांत न्हाई. समंधच हाय तो. ब्राह्मण न्हाई तरी समंध हाये. आता बघाल तर साऱ्या तालुक्यात जासुंदीची झाडं न्हाई, पन् देवळात रोज मध्यान् राती फूल हायेच. मी गेलो तिथे नळराजाशी झुंज घ्यायला. देवळात हगलो, मुतलो, थुंकलो. त्या राती पिंडीवर पाणी पडलं न्हाई. फूल आलं नाही. पण ताई, मोडकी वीणा वाजली. गुं गुं करीत वाजली. तर नळ आला होता. मला दिसला न्हाई. तो निसटून गेला. पन् मी काय हार मानतो ? आता बघा, उद्यापासून ब्रह्मचरिय. बायकोची सुटका हून चाळीस दिवस झाले की, माझी ताकद कशी होईल बघा. त्या नळराजाला बसवतो छपरावरच्या समंधांत. "

विजयाच्या धुंदीत ते बोलत होते. पुण्यश्लोक नळराजाचेही भूत झाले आहे आणि भारतातले आमच्या माहितीतले तरी सर्वात प्राचीन भूत त्याचेच आहे, हे ऐकून मला खरेच फार अद्‌भुत गोष्ट ऐकायला मिळाल्याचा आनंद झाला. पुण्यश्लोकांचीही भुते होतात तर !

त्यानंतर सहा वर्षे झाली. माझे मरण दूर गेले आहे आणि नळराजाच्या भुतानेच माझ्या आत्म्याच्या फडफडत्या ज्योतीला बरेच तेल घातले आहे. गृहस्थ आहेत तिथे व तसेच आहेत.

नाद-प्रतिमा

सोलापूरच्या महारवाड्यात मी हिंडले, त्याला वीसबावीस वर्षे झाली. पण कानातली नादाची भिंगरी अजून ताजीच्या ताजी निनादतेच आहे. मी ओव्या ऐकत होते; गळ्यातल्या गळ्यातच हलणारे तीव्र–मधुर स्वर उंच उंच चढत होते. आमच्या नेहमीच्या सप्तकांच्या श्रेणीच्या बाहेरचे ते होते; पूर्ण पार्थिव; चाल अगदीच वेगळी. चाल कसली, पूर्ण स्वैर वाटावी अशी ती नादांची बांधणी होती. किनरे वाटावे असे आवाज; पण जी गाणी त्या बायका म्हणत होत्या त्यांतल्या भावभावना त्यांच्या पूर्ण परिचयाच्या होत्या. इतक्या की ओव्यांची रचना त्या हवी तशी फिरवीत होत्या; तिथल्या तिथे रचीत होत्या. स्वैर नि घडीव एकमेकात मिसळून जात होते. ओव्यांची चाल कुठल्या स्त्रीला येत नाही ? नि कुठली स्त्री त्या म्हणताना रंगून जात नाही ? पण इथे नेहमीच्या गाण्या–रंगण्याच्या पलीकडचे काहीतरी होते. एक बाई म्हणू लागली, दुसरी म्हणू लागली, तिसरी म्हणू लागली. करता-करता झोपडीझोपडीतल्या साऱ्या बायांचे आवाज मी ऐकत चालले. ऐकता ऐकता वाटले की, या साऱ्याजणींचे आवाज इतके कसल्यासारखे कसे ? इतका ओघ त्या आवाजात कसा आला ? सारेच आवाज इतके मंजुळ कसे ? किनरेपणा इतका मोहक कसा ? हा घाटणीचा गोडवा ? जातीय परंपरेचा वारसा ? की सामुदायिक गाण्याचा परिणाम ? ओव्यांची चाल असते अगदी साधी नि सोपी; म्हणणारी मन ओतेल तरच सुरेल वाटणारी. पण इथे तर सुरेलपणा बायांच्या आधीन. मी न राहवून म्हटले, "किती सुरेख आहेत तुमचे गळे ! ओवीची इतकी कठीण चाल मी कधीच ऐकली नव्हती. इतकं चांगलं तुम्हाला कसं गाता येतं ?"

बायकांच्यापैकी एक म्हणाली,

" बाई, यात काय झालं वं ? आमच्या जातीत सर्व्याच बायांचं गळं असं असतात. गाता गळा न् शिंपता मळा."

' सर्व्याच बायांचं गळं असं असतात ' हे वाक्य काळजाला भिडले. ओव्यांची ती चाल खरोखरच फार अवघड होती. मी कितीतरी प्रकारच्या ओव्या ऐकलेल्या आहेत. पण त्यांच्या चाली लाडिक नि मधाळ. पण अशी चाल नि लाडिकपणाशिवायचा करडा सुंदर सुरेलपणा मी ऐकला तो प्रथम इथेच नि त्यानंतर कुठेही नाही. उपजत नि उत्कृष्ट संगीताची ही पेठच होती. पण ती बाजारी आली नाही. मला ते सूर आठवत नाहीत, कारण ते माझ्या गळ्यात उतरले नाहीत. पण लांबचे, परके असे ते सूर आपली आठवण मात्र कोरून गेले. तेव्हापासून कुठच्याही ओवीची चाल मला पसंत येत नाही.

अपवाद फक्त एकच.

आमच्या घरी बाळंतीण होती. तिचे करायला एक सुईण येत असे. कोकणातली होती – चंद्रा तिचे नाव. चंद्राप्रमाणे सुरेख, सडपातळ नि प्रसन्न अशी. मला बरे नव्हते. चंद्रा माझे अंग चेपू लागली. चेपता चेपता गाणी म्हणू लागली. तिने एक ओवी म्हटली :

" गाणं मी गायिलं । आपुल्या मन्नात ।
जाईच्या बन्नात । नाद गेला ।।"

चाल परिचित. पण मनातल्या तळातून आलेल्या त्या गाण्याचा नाद जाईच्या बनात गेल्याचे ते वर्णन ऐकून नादाची आणखी एक प्रतिमा मनात साकारली. नादाला हिरवा रंग आला; त्यानंतर त्याचा रंग पांढरा पांढरा होत चालला, हिरव्या नादाच्या तंतूंना पांढरी जरतार लाभली. मधेमधे जाईची पाने, वेलांट्या नि पांढरी नाजूक फुले उठली; फुलाचा गंध घमघमला. नादाला रंग, रूप आले; ध्वनीचा कायापालट झाला.

पहिल्या ओव्यांनी ध्वनीचे प्रांगण ओलांडले नव्हते. त्यांचा सोवळेपणा अप्रूप होता. नाद केवळ नादच होते; त्यांच्या चालीचा त्यांना घाट होता;

त्यांना बाह्य आकाराची संगत नव्हती; प्रतिमा फक्त आतल्या भावांची होती. पण या ओवीने गाणारे यौवन, दूरगामी हाक, मुसमुसणारा उल्हास, सारे काही जिवंत केले. पहिली किमया शुद्ध ध्वनीची होती; दुसरी अर्थ, भाव, वृत्ती, सूर–साऱ्यांची, म्हणूनच संमिश्र होती. गाणे म्हणून पहिले अजोड होते; पण तशी सुरावट सर्व्यांच बायांना अवगत होती. पण इथे गाता गळा दुय्यम होता. जे कुणी ही ओवी म्हणेल त्याला या नादांतून अनेक प्रतिमा मिळणार होत्या; चित्रे मिळणार होती. पहिली होती नाद-प्रतिमा; दुसरे होते नाद-चित्र. पहिली गोष्ट मला अप्राप्य होती पण रंजवणारी होती. दुसरी मला रंजविणारी नव्हती, कारण मीच तिच्यात शिरून तिचा अर्क घेऊ शकत होते. गातागाता वेगळी चित्रे तिच्यातून मिळवीत होते :

गाणारी मुलगी. एकटी. चाहूल घेते. ऊन्ह असते दुपारचे. ते ती मानीत नाही. कारण, जाईच्या कळ्या आता फुलूफुलू करीत असतात. जाईच्या वेलांट्या खाली-वर होतात. पाने हिरवी होतात. उन्हाने सोनेरी दिसतात. मुलीला जाईच्या त्या बनात कुणीतरी असावेसे वाटते. तिची ती अपेक्षा असते. जाईचे बन साद देणारे असावेसे तिला वाटते. मनात ती गाणे रचते; ओठ ते म्हणून जातात. मुलगी जाणते की तो मनातला नाद जाईच्या बनात पोहोचला आहे – आणि – आणि ? इथे अगणित पर्याय निघतात; प्रीतीचे, रतीचे आणि दीर्घ विरहाचे. निराशेचे; मृत्यूचे आणि स्मृतीचे. ही सारी चित्रांची वलये गाण्यातल्या नाद-प्रतिमेला धरून राहिली. पहिल्या प्रकारात गायकी अमूर्त होती; बीजरूपाने होती; परंतु 'गायनी-कळा' कशी जन्म घेते, हे त्या ओव्यांच्या धाटणीवरून कुणालाही समजण्या-सारखे आहे. दुसऱ्या प्रकारात पाण्यात खडा टाकल्यावर एक 'सलिल' नाद उत्पन्न होऊन मग कंपांनीच केवळ ध्वनीला सूचित करणारी वलये उठत-उठत, लांब जाऊन फुटत राहातात. कुणीही हा खेळ करावा. पहिल्यात नादाची भिंगरी गरगरत आपल्याच द्रुतगतीने वर-वर चढत राहाते. तिची ऊर्ध्वगती टोकदार बनते. पण दुसऱ्यात प्रसरण असते. पृथ्वीवरचे, पाण्या-तले प्रसरण असते. पहिला नाद आकाशाला भिडून त्याच्यातले तेज व तीव्र-

पणा ओढणारा, तर दुसऱ्यातला नाद आपल्याजवळून सावकाश सरकत सरकत जाऊन, वाटोळ्या–वाटोळ्या तरंगांत साकारलेला असतो. पहिला नाद आकारहीन, तर दुसरा आकाराला जखडलेला भासतो.

चारपाच वर्षांपूर्वी कान्हेरीच्या लेण्यांत हिंडत होते. कान्हेरीच्या डोंगरात जी खुरटी झाडेझुडपे आहेत त्या बहुतेक औषधी वनरपती आहेत. डिकेमालीची झाडे डोंगरभर आहेत. फेब्रुवारीचा महिना होता. वसंतागमनाच्या खुणा डोंगरभर उठल्या होत्या. उष्मा चांगलाच जाणवू लागला होता. वेळ सकाळी दहा-साडे दहाची. जसे ऊन्ह चढत होते, तसतसे भुंगे चेतावत होते.

प्रवचनाचे मोठे दालन पूर्वेच्या आणि उत्तरेच्या मधे आहे. प्रवचनाच्या त्या दालनाची योजना अशी की, वक्त्याच्या आसनावरून बोललेला शब्द सर्व ठिकाणी सारख्याच तऱ्हेने ऐकू येतो. बाहेरच्या बाजूला शांत बुद्धमूर्ती आहे. ध्यानस्थ अशी. आता आत कुणी प्रवचने देत नाही; कुणी ऐकतही नाही. पण तरीही मनापुढे मोठा भिक्षुभिक्षुणीसंघ उभा राहतो; एक वृद्धावस्थेकडे झुकलेला प्रशांत महाथेर आसनावर बसलेला दिसतो. तो काहीतरी सांगत असतो, पण ते आपल्याला शब्दांत सांगता येत नाही. बुद्ध, मैत्री, शांती, वगैरे काही शब्द तेवढे आपल्याला ओळखीचे वाटतात नि मग ते प्रवचन बंद होते. त्या क्षणी अशा नादाच्या धाग्यातून मोठा गुंजारव उठतो. समूह ठेक्यात म्हणतो, गद्यात संगीताची समग्र लय ओतून विशिष्ट सुरात म्हणतो :

'बुद्धं सरणं गच्छामि।
संघं सरणं गच्छामि।
धम्मं सरणं गच्छामि।'

या सामुदायिक गद्यमय धर्मगीताचा नाद नि ठेका फार झपाटून टाकणारा असतो. तो ठेका उरतो नि महासंघाचे मघाचे चित्रे नाहीसे होते, त्या ठेक्याचे भय वाटू लागते. दीड हजार वर्षांपूर्वी या ठिकाणी विहारा-विहारातून घुमलेला तो नाद तरंगित न होता, तिथेच त्या भव्य छतात नि भितीत अडकून पडलेला असावा. देह गेलेल्या भिक्षूंचे सहस्रावधी आत्मेही

तिथेच घोटाळत तर नसतील ? बुद्धाभोवती फेरा धरून तेच म्हणत नसतील, 'बुद्धं सरणं गच्छामि ?' त्या वचनांची आवर्तने म्हणूनच तर माझ्यासारख्या अभ्यासूंच्या मनात अशी अकस्मात आवर्तित होत राहिली नसतील का ? इथल्याच बौद्ध स्मशानात असे लुप्त देहातल्या प्रबळ प्रेरणांचे अस्तित्व मला मागे जाणवले होते. तिथे मी ही आजची मी नसून दुसरीच कुणी झाले होते. शांत, अंतर्मुख, निराकार. पण आता तसा भाव नव्हता. नादाचे, बसक्या नादाचे झोत उठत होते; जाणवतील इतपतच श्राव्य; झपाटतील इतके घुमणारे. मोठ्याचा आवाज लहानाला चेपतो, तसे चेपून टाकणारे. भयचकित, स्तब्ध करणारे ते नाद होते किंवा नादांची ती दूरच्या काळातली स्मृती होती. वृंदनादाची स्मृती होती. वृंदनादाची प्रतिमा होती.

आता आत कोंडू लागले; इथे शिल्पे नव्हतीच. तेव्हा मी बाहेर आले. प्रसन्न वाऱ्याच्या झुळुका अंगावर आल्या; कडू-गोड वास आला; फुलांचा, रानफुलांचा. सहज समोर पाहिले, तर डिकेमालीचे लहानखुरे झाड फुलांनी डवरून गेले होते. पांढरट-पिवळी फुले झाडभर उमलली होती. त्यांचा उग्रमधुर वास हवेत दरवळत होता; पण हेच दृश्य डोंगरावर आता वेलीवेलीवर, झाडाझाडावर थोड्याबहुत फरकाने दिसत होते. निळेतांबडे, पिवळे, पांढरे रंग झुकून झाडाझाडातून बाहेर पडत होते. बुलबुल, फुलचुखे मस्त गात होते. मधून कोकीळदेखील 'कुहू' करीत होता. पण ते एकेकट्याचे विशिष्ट स्वर आज मनाला ओढीत नव्हते. वृंदनादाचीच छाप त्याच्यावर पडली होती आणि हा वृंदनाद चमत्कारासारखा माझ्यासमोर प्रत्यक्ष वर्तमानात साकारला होता, डिकेमालीच्या त्या पुष्पित झाडावर हजारो भुंगे लवथवत होते; रुंजी घालीत होते; गुंजत होते. मध चोखताचोखता पंख उभारून उडत-नाचत गंभीरपणे गुंजत होते. प्रत्येकाचा संतोष त्या सामूहिक नादात प्रतीत होत होता. ते सामूहिक गान नव्हते, सामूहिक नृत्य नव्हते, तर तो सामूहिक पुष्पानुनयाचा धर्मविधी होता. पांढरी-पिवळी फुले जणू मंत्रमुग्ध होऊन हलत-डुलत होती. बेचैनी परमावधीला गेल्यासारखा एकेक भुंगा वाटत होता. त्यांची वाटोळी काळीशार शरीरे, पार-

दर्शक पंख आणि फुलांवर न ठरते पाय, या आकृती दिसतादिसता, पुसट होता होता; त्या उठून दिसत होत्या. काळा नादमय रंग पांढरट फुलांवर तुटून पडल्याचा आविर्भाव करीत होता; पण त्यांना दुखवू शकत नव्हता. तो रंग रस पीत होता नि नादातून तो रस वाऱ्यावर सोडून देत होता. ते सामूहिक रसपान नि सामूहिक रसविरेचन होते. त्यातून एक अद्यतन सुरावट निघत होती; फार कोवळी, फार नेटकी आणि फार पकड घेणारी अशी. वास्तविक भुंगा एकेकटा गुंजत असतो, त्या वेळी त्याचा आवाज कर्कश, जरबेचा असतो; सारखे ऐकत बसले तर डोके उठते. कोकिळाच्या उन्मत्त कुहूकाराने उठते तसेच. पण आताचे वृंदगान फार फार मंद, संथ, सूर एकमेकांत एकजीव झालेले असे होते. ते स्वर इतके दाट असूनसुद्धा इतके मंद कसे, याचे मला नवल वाटले. अगदी खालच्या सप्तकात घेतल्यासारखे. कुठलाच कोमल स्वर नसताना परमावधीचे कोवळे वाटणारे.

ते झाड माझ्या दृष्टीने अप्रूप बनले. वासंतिक सोहळ्याचे केंद्र बनले. खाणे, गाणे, नाचणे, रतणे सारे एक झाले होते. फुले स्फूर्तिस्थान होती. मधांचे प्यालेही होती. भुंग्यांच्या मार्फत स्वजातीचा फैलाव करण्यास उत्सुक झालेली होती. त्यांच्यातला रेणू-रेणू सचेतन झाला होता. विश्वजननाचा एक पर्व इथे घडत होता. फुलांतले केसर नवे, त्याच जातीचे तरुविश्व घडवण्यासाठी झटत होते. फुले भुंग्यांना मध पिऊ देत होती. भुंग्यांचेही नवजनन इथूनच निघायचे होते; आणि या साऱ्या उघड्या हेतूंना नि कृतींना एकांताचे आवरण देण्यासाठी म्हणूनच जणू काही ही गुंजनगीतिका भुंग्यांनी आरंभली होती; हजारो कंठ एकच गीती म्हणत होते, ती भृंगगीती आमच्या स्वरात सरळ उतरत होती. ते स्वर असे :

नी सा रे सा रे ग सा.

जरा गुणगुणा ते स्वर, की पाहा ते 'पहिली माझी ओवी'च्या चालीत एकरूप होतात की नाही. अभंग, गीती, फार काय, पण ऋचांचा सुद्धा पायाभूत स्वरकल्प हाच आहे. भारतीय जनसंगीताचा मूळ नाद इथूनच स्फुरतो. मात्र आमच्या भृंगाचा गुंजारव ठायीठायी पुरातन काळापासून

आमच्या अभिजात वाङ्मयात वर्णन केला असला तरी त्यातून संगीताला प्रेरक असे काही निघते असे काही कुठे सांगितलेले नाही. ऋग्वेदात हंसाच्या मधुर गीतमय नादाचे उल्लेख आहेत. हंसाच्या शब्दाला 'शिंजित' म्हणतात. वेदात मधुर गाणे हंसाचे असते, एवढेच नव्हे तर मधुर गायन करणाऱ्या ऋषीला "हंस" म्हणत असत, असा उल्लेख आढळतो. पुढे अभिजात वाङ्मयात हंसाच्या शब्दाला 'शिंजिता' बरोबर 'कलध्वनी' असेही नाव मिळाले. 'कलध्वनी'ची नादप्रतिमा पुढे वेगवेगळ्या प्रकारे धावते. परंतु शिंजिताला एक लयबद्धता आहे, गती आहे, आकारही आहे. 'शिंजित' शब्द नूपुराच्या झणत्कारालाही वापरतात. नूपुर घातलेल्या तरुण मदोन्मत्त मंथर पावलांचा नाद त्यात आहे. घागऱ्यांचा पदक्षेपाबरोबर होणारा लयबद्ध नाद शिंजितात आहे. ही वेदातली नाद-कल्पना त्या काळी गाण्याशी संबद्ध असली तरी पुढे तिला घुंगरांच्या छुमछुम या नादाखेरीज आणखी पर्याय राहिला नाही. नादातला गीतप्रवण पर्याय गळला आणि सुंदरीच्या नूपुरांचा, हंसगतीचा व पर्यायाने हंसशिंजिताचा मर्यादित ध्वनी या प्रतिमेला चिकटला. भारतीय संगीतशास्त्रात पशुपक्ष्यांच्या ध्वनीत सप्तस्वर आणलेले आहेत. उदाहरणार्थ, 'नारदीयशिक्षे'त षड्ज हा मोराचा बोल आहे, गायी-बैलांचा ऋषभ, बोकडाचा गंधार, करकोच्याचा मध्यम, वसंतकालातील कोकिळाचा पंचम, घोड्याचा धैवत आणि हत्तीचा निषाद, अशी सा पासून नी पर्यंत स्वरांच्या उगमाची समजूत दिलेली आहे. याच्या भरीला विविध स्वरांना पांढरा पिवळा, निळा इत्यादी रंगही बहाल केलेले आहेत. नाही दिले आहेत त्यांचे आकार. पुढे रागरागिणींची चित्रे आली तरी स्वरांना रंगाखेरीज दृश्य रूप-बंध कुठेही दिलेला आढळत नाही. म्हणून या हजारो भुंग्यांचे हे वृंदगीत जेव्हा मी ऐकले तेव्हा माझ्या गळ्यात त्याचे स्वर आपोआप फिरू लागले. अर्थात, त्या गीतीचे ते अपार्थिव वाटावे इतके तरल सौम्य निनादन कुणा मानवी कंठाला सहज साधणारे नाही; कारण ते सामूहिक उच्छ्वासासारखे आहे. 'पृथ्वीला आनंद झाला व ती गाऊ लागली' असे वर्णन ब्राह्मण-वाङ्मयात आहे. पृथ्वी गायली म्हणजे कशी? पक्ष्यांच्या, पशूंच्या रूपानेच

ना ? मग त्या वेळीच भृंगांनीही आपली वृंदगीती त्या प्रारंभकाळीच गायली असली पाहिजे. पण हत्ती, घोडा, कोकिळ, क्रौंच वगैरे प्राण्यांच्या स्वरांची संथा माणसाने घेतली; मूळ सूर त्यांचे; फक्त त्या स्वरांची परस्परमीलन आणि त्यांतले तीव्र-कोमल भेद जाणून ते एकत्र गुंफण्याचे काम तेवढे माणसाने केले. पण भुंग्यांचा गुंजारव मात्र वाङ्मयात आला तरी संगीतात उतरला नाही. मला मात्र त्या दिवसापासून गुंजारव म्हणजे काय चीज असते ते कळले. आमच्या बायकी गाण्यांची बैठक आकळली. जातकात एक गोष्ट आहे. दोन गवयांची. त्यांची स्पर्धा झाली; त्या वेळी हरलेल्या गवयाच्या गाण्याचे वर्णन करताना कथाकार म्हणतो की, त्याचे गाणे, बायका मुलाला निजवताना म्हणतात त्या गाण्यासारखे बेसूर होते. शास्त्रीय सौंदर्य नसले तरी ओव्या, अंगाई गीते इत्यादी तीनचार स्वरांच्या आवर्तनातच बसवलेल्या असल्यामुळे त्या नीट म्हणणे कुठल्याही गळ्याला शक्य असते, हे मला नेहमीच वाटत आले होते. पण आता ही भृंगगीती ऐकून मात्र मला ओवीचा छंद धन्य वाटू लागला. ओरडून सांगावेसे वाटले की, अहो, हे गाण्याच्या अलीकडचे गाणे आहे; मूळ गाणे आहे; सर्व गाण्यांचा सूर आहे; आणि हा सूरवृंद रसिकराज भृंगांनी निर्माण केलेला आहे; फुले चुंबताना गायलेले हे मंदमधुर निसर्गगान आहे.

आणि मग असेच दुसरे मुके निसर्गगान डोळ्यांपुढे रंगात, आकारात, गंधात व नृत्यात एकाच वेळी भरलेले डोळ्यांपुढे आले. जंगलात हिंडताना एकदा एका शेतात मोहरीची झाडे मोहरली होती. सबंध शेत पिवळे झाले होते. मधून पानांची हिरवी छटा दिसत होती. पिवळ्याधम्म उन्हात वाऱ्याच्या झुळकांबरोबर फुलांत लाटा उठत होत्या. फुलांवर निळ्या फुलपाखरांचे थवे दाटीवाटीने असेच झेपावत होते. खालच्या लाटांबरोबर वरतीही निळ्या लाटा उठत होत्या. असे मनोरम जिवंत दृश्य क्वचितच दिसते. तिथे चैतन्य होते; आकार होते; रंग होते; गंध होते. नव्हते फक्त सूर. पण वाऱ्याच्या झुळका लाटा उठवत तेव्हा, सूर घुटमळतोय, पण बाहेर पडत नाहीसे वाटत होते. उच्छ्वास नव्हता. ती स्तब्धता, ती मौनी अवस्था, मला स्वरोदया-

पूर्वीची नादगर्भ अवस्था वाटते. ते समग्र दृश्य म्हणजे बोलकी शांतता किंवा शांत बोलकेपण होते. अभावात खूप भाव दडला होता. सारे स्वर तिथे बंदिस्त होऊन पडले होते.

शिवाच्या स्थाणुरूप पिंडीत जसे निर्मितीचे रहस्य असते, तसेच नादाचे रहस्य गूढ स्तब्धतेत असावे. कारण, महेश्वराची प्रतिमाच घ्या. पाणिनी 'माहेश्वरसूत्र' व्याकरणात आणतो; त्याचा अर्थ एवढाच की, भाषेच्या उगमाचा, विकासाचा आणि विलयाचा संदर्भ महेश्वराशी आहे. हाच शिव नटेश्वर म्हणजे नृत्याचा प्रवर्तक आहे; संगीतशास्त्राचाही तोच प्रणेता आहे असे आमची कलापरंपरा सांगते. जेव्हा 'प्रणवा' ची म्हणजे आद्यतम नादबिंदूची कल्पना शिवाशी संलग्न होते; जेव्हा बिंदू आणि कला यांच्या आकृती त्या प्रणवाशी ऊर्फ ओंकाराशी भिडतात. तेव्हा माझ्या मनात समग्र भाषा–संगीतासह सर्वसमावेशक नादतत्त्व व नादप्रतिमा उभी राहाते, ती अशी : शिव तांडवनृत्य करतो आहे; विलय आणि नवउत्पत्ती यांच्या मधली अवस्था आहे. शिवाच्या हातात डमरू आहे. हेच नादबिंदूचे प्रतीक. डमरूचा आकार दोन्ही बाजूंनी पसरट, कुठल्याही कलेपर्यंत पसरत जाईल इतका अमाप पसरट आहे. मधला भाग बिंदुमात्र निमुळता आहे. हाच ध्वनीचा स्थितिकाळातला आकार.

डमरू हलते ते अर्धवर्तुळाकृतीत; चंद्रकोरीच्या आकृतीत; ते हलले की एक नाद होतो; तो मरतो आणि फिरून दुसरा नाद उठतो; तो मरतो; असे सतत नादाचे जनन-मरण आवर्तनांत चालू राहाते; गतीमुळे आवर्तने जुळतात, नादाचा संकेत होतो; एक ध्वनी उमटून नाहीसा झाल्या-शिवाय दुसरा ध्वनी जन्मत नाही; अशा आवर्तनातून केवळ नादानुसंधाना नाने शब्द जन्म घेतो. एक शब्द मरतो तेव्हा दुसरा शब्द तयार होतो. शब्दाच्या मरणाने अर्थानुसंधान भंगत नाही. म्हणून वाक्य जन्माला येते. वाक्यांच्या जननमरणातून भाषा तयार होते; स्थिरावते. हाच चलाचा व स्थाणूचा डमरूत भरलेला नादसंभव गाण्यालाही लागू पडतो. संगीतात अर्थाहून भावानुसंधान व माधुर्यव्यंजन हे अधिक बलवत्तर असते. म्हणूनच

नादाची आमच्या संस्कृतीतली सर्वात समर्पक आकृती डमरूची आहे; समर्पक म्हणण्याचे कारण डमरू हे वाद्य नाद व ठेका असलेल्या वाद्यांत आदिम म्हणायला हरकत नाही; कारण, त्यात नाद, गती, ताल, त्याचप्रमाणे उत्पत्ती, स्थिती, लय या अवस्थांचेही प्रतीक सामावते. ध्वनीच्या प्रतिमेचे जनक डमरूच म्हणायला हरकत नाही; आणि समस्त नादक्रियेचा प्रवर्तक म्हणून शिवाचा आकृतिबंध सार्थ ठरतो.

कार्तिकी एकादशी

ते काळे वर्ष. १९३० सालचे.

क्षयरोग्यांच्या विश्रामधामातल्या रोग्यांच्या नातलगांसाठी बांधलेले एक कुटीर; दोन बिऱ्हाडांची त्यात सोय. पुढचा व्हरांडा सामुदायिक फरशी म्हैसूर प्रांतातल्या सुप्रसिद्ध काळ्याभोर पाषाणांची. म्हैसूराबाहेर पाच मैल अंतरावर असलेली ही वसाहत. एका बाजूला इस्पितळामध्ये भले मोठे मैदान. मग रुंद नि मैलच्या मैल धावून क्षितिजात लुप्त होणारा रस्ता. त्याच्या दुसऱ्या बाजूला एक मैदान, त्यात हे कुटीर नि कुटीराच्या मागच्या बाजूला शेते नि रान. रानातून नारळी, पोफळीची बने इतस्ततः विखुरलेली. खुल्या भागात टेकाडे वर आलेली. संध्याकाळची वेळ. पश्चिम लाटावरली होती. मातीचा लाल रंग काळपटत होता. वारा घो घो वाहात होता. बघता बघता पाखरे कलकलायची थांबली. नि वाघळे चीत्कारत फडफडू लागली. एक पाकोळी धडपडत खोलीत घुसली नि गरगरत फिरू लागली. शेजारची मल्लव्वा आत डोकावली नि म्हणाली, "बरं नाही हे लक्षण. मला वाटलं की मेली आमच्या घरात येतेय की काय. पण तुमच्याच आली हं ! शेवटाची सुरुवात अशीच होते बरं, शिव, शिव ! म्हातारीच्या कपाळी दुःख आहे, दुसरं काय ?"

माझे पाय लटपटू लागले. मी पाकोळीला हुसकू लागले. ती बाहेर पडून मल्लव्वाच्या खोलीच्या दिशेने धावली. पण मल्लव्वा मोठी हुशार. अपशकुन टाळण्याच्या ग्रामीण विद्येत ती पटाईत होती. आम्हा शहरी बावळटांना ही विद्या कुठली यायला ? "जा. जा. एकदा गेलीस तिकडेच जा. माझ्या गुरूपुढे तुझं काही चालणार नाही." नि खरोखरीच ती पाकोळी

निमूटपणे तिथून बाहेर पडून अंधारात नाहीशी झाली.

धडधडत्या काळजाने मी स्वयंपाकघरात आले. आजी चुलीशी खुडबुडत होती. नशीब ! तिला कानडी येत नव्हते.

" आजी, डबा भरला का ग ? मी नेऊन देते. "

" अंधारातून एकटीच जाशील कशी ? कंदील कालच फुटला ना ! या रानात सारी जीव–जनावरं आहेत भरलेली. एकीची चिंता आहे नि तुझं नको काही उद्‌भवायला. "

" अग पण गेलं पाहिजेच ना, तिला का उपाशी ठेवायचीय ? "

" नाही ग ! पण सोबत तरी घे कुणाला ? "

" आजी, इथे तू नि मीच आहोत, आणखी कोण आहे ग हाक मारायला ? मला नाही भय वाटत. जाईन मी. रस्ता पायाखालचा आहे. "

मी डबा घेऊन निघाले. रातकिड्यांच्या किर्र आवाजात कोल्हेकुईची भर पडली होती. इस्पितळातली कुत्री भुंकत होती. तोच एक दिलासा. रस्त्यावर चिडीचिप होते. आजीची व्हरांड्यातली आकृती काळोखात बुडून गेली होती. इस्पितळातले दिवे जवळ जवळ येऊ लागले. अन्न निवू नये म्हणून मी जवळजवळ धावत चालले. व्हरांड्याजवळ आले नि थबकले. डॉक्टर गंभीर चेहरा करून खोलीतून बाहेर आले.

" तुम्ही एकट्या आलात ? "

" हो. "

" जाताना एकट्या जाऊ नका. उद्या गोविंदाबरोबर डबा पाठवा. " पुढे जे बोलायचे, म्हणजे ते बोलतील ही माझी अपेक्षा होती, ते न बोलता तसेच गिळून ते दुसऱ्या खोलीत गेले.

" डबा आणलास ? कंदील कुठे आहे ? "

इंदूताई म्हणाली. इंदूताई डॉक्टर होती. तीच आज रोगी झाली होती. ती माझी आतेबहीण. इंदुमती काळे.

" फुटला ! "

" फुटला ? "

मी काहीच बोलले नाही. डोक्यातली एक शीर सपकन् तुटली. कुठे तरी रक्त वाहायचे थांबले. पायात गोळे आले. मी खुर्चीवर बसले.

" तुला बरं नाही का ?" तीच माझी काळजी करू लागली.

" नाही. तसं नाही. आपला बायकांचा त्रास आहे ना ?"

तिला ते पटले की नाही कोण जाणे. एकदा तिने संशयाने पाहिले. तिचे बुद्धिमान प्रखर नेत्र आणखीनच तेजाळले. पण आवाज फार शांत, फारच शांत आला. अगदी संथपणे ती बोलू लागली.

" आजीला बिचारीला चालवत नाही हो आता. रोज एवढं चालून येते. उद्या माझं ऑपरेशन आहे बरं का ! न्यूमोथोरॅक्स करणार आहेत डॉक्टर. काय घाबरले ग ते सांगताना ! मी पण डॉक्टरच आहे ना ? एक फुप्फुस बंद करायचं." बोलता बोलता खोकल्याची जोरात उवळ. डोळ्यांतून त्यामुळे पाणी वाहू लागले. पण आशेचा तजेला चेहराभर पसरला होता. थोड्या वेळाने ती म्हणाली, " आजीला सांग, म्हणावं भिऊ नको. उद्या मला डबा नको. मी पुढच्या आठवड्यात बरी होईन. मग आपण मुंबईला जाऊ. मी बरी झाल्यावर आपण खेड्यात जाऊ. तिथे खूप काम करू. चळवळ काय पेटली आहे. नि मी आपली पहिल्या पोटपूजेत नि आता अंथरुणावर. डॉ. भडकमकरांचं पत्र आलं आहे. अभंग आहे नि आशीर्वाद आहे. ईश्वर शेवटी पावतोच, मला मात्र एकादश्या सोडाव्या लागल्या. उद्या एकादशी आहे ना ? भडकमकर विसरले नाहीत."

" बरी झालीस की कर पुन्हा परोपकाराचा धंदा. आहे तुझ्या हाती. तू कशाला खंत करतेस ?

" तुझं सूत किती झालं; आजीच्या सुताची आपण वेगळी खादी बनवू बरे का," आमची आजी वाती वळत नव्हती. बिचारीचे देवही मुंबईला अडकून पडले होते. पुस्तकं दोन चारच. सूते काढणे हीच तिची करमणूक. चळवळीच्या त्या काळी त्याच एकसूत्रात आम्ही सारी अडकलो होतो. चरख्याच्या नादाचे फार मोठे आश्वासन आम्हाला होते. रोज आम्ही कालिदास, प्लेटो, टागोर, टॉलस्टाय, गांधी, राजकारण, धर्म यांच्याबद्दल किती

उल्हासाने बोलत असू. आज ती दुपारी तशीच बोलत होती. म्हणाली की, "तू लेखक हो. पैशांची नको करू काळजी. मी पडलेच आहे धंद्यात." आणि मग तिला टागोरांच्या आत्मवृत्ताची आठवण झाली. "जीवनसंध्या जाणवूनसुद्धा हा माणूस किती उत्साहाने लिहितो नाही?" ती म्हणत होती. पण अकाल जीवनसंध्येच्या अखेरीच्या कडेला पोचूनसुद्धा एक तरुण पण आशेचा अरुणवर्ण मोठ्या ऐटीत लेवून साऱ्या तरुणांच्या विराट राष्ट्रीय स्वप्नांची अमर्याद गाथा गुंफीत बसलेले मी प्रत्यक्षात समोरच पाहात होते. मीही त्या आशावादात डुबले–कॉलेजचे ते वर्ष बुडले होते तोच तेवढे तरलेसे वाटले. विठ्ठलभाईंची ती भाषणे त्यांच्या तुरुंगवासानंतर ती छांदिष्टपणे मनात घोळवीत राही. गीतेचे वाचन नि राजकारणाची उभारी तिला त्या आजारात तगवीत होती. मनापासून देहाचे पदर सुटत चालले होते, ते तिला कळत नव्हते का? ती डॉक्टर होती. फार कुशल होती आणि धीराची पण होती. आतला क्षोभ ती या राजकीय ज्वालांच्याखाली दडवीत होती का? की राजकारण हेच नवयुगातले नवे अध्यात्म तिला तारून नेत होते?

"लवकर जा, कंदील नाही. पायाखाली तरी पाहा. नीघच आता. आजीला भूक लागली असेल."

भूक! आजीला! तिला काय माहीत की घरातला पिठामिठाचा साठा, घासलेट सारे काही आजच संध्याकाळपर्यंत खलास झाले होते ते? आम्ही तिचे अन्न रोजच्यासारखे देत असू. पण घरात निमपट व आता तर पावपटच शिधा वापरून आहे तो साठा लांबवीत होतो. आजी म्हणायची "तपेलीची लांब दोरी म्हणतात ना, ती अशीच असते."

"उद्या अन्न नको–" हा संकेत माझ्या काळजात घुसला. पैसे जवळ असूनही आम्ही अन्न आणू शकत नव्हतो. याला कारण अबलापण. आम्ही दोघी बायका होतो. गाव पाच मैलांवर होते. आजी मला एकटीला इतक्या लांब पायी जाऊ द्यायला कबूल नव्हती. इथे आलो त्याला दोन महिने लोटले होते. तेव्हा वडिलांनी आणून दिलेला शिधा, तेलबील सारे काही

संपले होते. दूध रोज ताई स्वत:च्याच दुधातून उरेल ते पाठवी. पण उद्या ? तीच एका दिव्यातून जाणार होती. एक ताकवाली येई; पण एक दिवसाआड. मी चहा घेतच नसे. पण उद्या दूध नाही. घासलेट नाही स्टोव्हमध्ये घालायला. आजीला चहा कुठचा ? अर्थात हे सारे तिला सांगणे शक्यच नव्हते. अंधारात ठेचा खात मी घरात आले. वारा आणखीच पिसाट झाला. दारे लावली तर फटीतून किचाळत घरभर पसरला. होतं ते अन्न घास घास खातो तोच दिव्याने राम म्हटला. आजी फक्त " हूं " म्हणाली. त्या " हूं " त केवढा विषण्ण इतिहास भरलेला होता.

" उद्या न्यूमोथोरॅक्स आहे. उद्या जेवण पाठवायचं नाही. " मी बिछान्यावर पडल्यावर म्हटले. " उद्या मला गावात जाऊ दे. मी सारं सामान घेऊन येते. "

ती बराच वेळ बोलली नाही.

" जाऊ ना आजी ? "

" नको. "

" मग उद्या ? "

" एकादशी. "

दरवर्षी कार्तिकी येते, नि जाते पण तशी कार्तिकी तीच.

सकाळ झाली. मिळेल तेवढे कागद, पाचोळा नि काडया गोळा करून चहाचे आधण ठेवले. गोविंद नेहमीप्रमाणे दूध घेऊन आला.

शेवटची साखर घालून चहा केला. ती म्हणाली, " तू पण घे थोडा. "

घोटभर चहा मी घेतला. गोविंद तिथेच घुटमळत राहिला.

" का रे गोविंद ? काय हवं तुला ? "

' अम्मा, " गोविंद थोडया रागाने पण गहिवरून म्हणाला, " मी तुमचा कुणीच नाही का ? "

त्या शिपायाचे ते बोल ऐकून मी स्तब्ध उभी राहिले. माझ्या उत्तराची अपेक्षा न करता गोविंद बोलला, " अम्मा ! मी तुमच्या जातीचा नाही. पातीचा नाही. पण, तुम्ही दोन परदेशी बाया इथे असे हालात दिवस

काढता ते पाहून माझ्या पोटात तुटतं. डॉक्टर अम्माची स्थिती काही बरी नाही. त्यांच्या आजीकडे पाहून मला घास गिळत नाही. मला तुमचा भाऊ माना. एवढा अभिमान बरा नव्हे. मला तुम्ही काहीच काम का सांगत नाही ? गावात जाऊन काही आणायचं–सवरायचं असलं तर मी देईन की आणून. संध्याकाळी मी जाणार आहे गावात. सांगा, काय आणायचं आहे ? तेवढाच माझा उपयोग. पुरुष माणूस नाही म्हणून तुम्ही असं राहावं का नि ते पण या परदेशच्या रानात ?"

" गोविंद, आज आम्हाला काही सुचत नाही रे. खरेदी तरी करायला मन ठिकाणावर हवं ना. "

" होय अम्मा. पण पोट तर आहेच ना. "

मी आजीला सांगितले नि गोविंदाला पैसे नि सामानाची यादी दिली. " टांगा करून ये. "

स्वैंपाक नव्हताच, तेव्हा घर सारे धुऊन काढले. शेजाऱ्यांकडे बळीकरता बोकड माजवू घातला होता. त्याने केलेल्या घाणीने अर्धा व्हरांडा भरला होता. आमचा भाग मात्र लखलखीत होता. घासपूस असते म्हणून बायकांना अशा प्रसंगीचा ताण सोसता येतो. कष्टासारखा सोबती नाही. सकाळी इस्पितळात येरझारे किती झाले त्याला सुमार नाही. फुप्फुसबंदी आटोपली नि आजी मंदगतीनं इस्पितळात गेली. इतकी मंद ती कधीच चाललेली मला आठवत नाही. ताई गुंगीत झोपली होती. आजीने नर्सला विचारले, " ही गुंगीच आहे ना ?"

ओशाळ्या मुद्रेने ती म्हणाली, " हो आजी. " आम्ही परतलो तो एक वाजून गेला होता. आज ताकवाली सुद्धा नव्हती. इतक्यात नर्स माणकम्मा हातात पिशवी घेऊन आली. दोन शहाळी होती. घरात तिने भिरभिर नजर टाकली आणि फार अपराधीपणे ती शहाळी आजीपुढे ठेवली. कुणी तिला सांगितले ? कुणी गोविंदला सांगितले ?

स्वत:च तिने ती शहाळी बरोबर आणलेल्या सुऱ्याने फोडली. आग्रह करून तिने आम्हाला ती खायला लावली. " काही करायचं असलं तर सांगा;

आम्हाला डॉक्टर अम्माबद्दल फार लोभ वाटतो."

"गोविंदाला सांगितलं आहे सामान आणायला."

तिच्या प्रकृतीबद्दल बोलण्याचे माणकम्माने उघड टाळले होते. आम्हालाही विचारायचे धैर्य झाले नाही.

इतके मधुर शहाळे इतक्या अपराधी भावनेने मी कधीच खाल्ले नाही. जिभेला ते गोड लागले यानेच मी फार खंतावले. स्वार्थ एवढा बलवत्तर असावा ना ?

माणकम्मा गेली. आजीचे सूत सारखे तुटत होते. पण माझी टकळी मात्र गरगरा फिरत होती. सूत कसे कातीव निघत होते. आज का बरे हिने असा वेग घेतलाय ? ... ...तीन वाजले नि अचानक डॉक्टर आले. "येऊ का आत ?" ते संकोचून म्हणाले.

"या की."

ते खुर्चीवर बसले. आमची चार-पाच इंग्रजी पुस्तके त्यांनी पाहिली. चरखा पाहिला.

"किती स्वच्छ ठेवलं आहे तुम्ही घर. मला नेहमी यावंसं वाटतं इथं; पण आज यायचं ठरवलंच" आणि ते हसले.

तिच्या प्रकृतीबद्दल अवाक्षर त्यांनी काढले नाही की आम्ही.

चहा द्यायला हवा होता त्यांना. पण इकडच्या तिकडच्या गप्पा मारून ते उठले आणि शेजारच्या मल्लवाला बोलावून म्हणाले, "यांचं घर बघा, नाही तर तुमच्या मेंढ्याने केलेली घाण बघा. घरी पुरुष माणसं असून तुमचं राहणं कसं नि यांचं कसं ते बघा. हा मेंढा उद्या इथं मला दिसला तर याद राखा" आणि ते फिरून आमच्याकडे पाहून हसले नि गेले.

संध्याकाळ होत आली होती. गोविंदची वाट पाहात बसले होते. आजी इस्पितळातच बसली होती. इतक्यात मोटार दारी थांबली नि डॉक्टरांची बहीण मुक्तम्मा घरात शिरली. तिच्या मागोमाग एक नोकर एक हारा घेऊन आला. तऱ्हतऱ्हेच्या भाज्या आणि फळफळावळीने तो हारा गच्च भरला होता. "नाही म्हणू नका, माझ्या भावाने पाठवलं आहे ते. त्याला

तुमच्याबद्दल फार कौतुक वाटतं. बायका एकट्या कशा राहतात, यांचं खाणं-पिणं सारं चालतं तरी कसं ? असं तो नेहमी म्हणतो. पुरुषाची इथं मदत नसताना एवढ्या मोठ्या प्रसंगाला तुमची आजी कशी तोंड देतेय ते पाहून आमच्या काळजाचं पाणी पाणी होतंय. आम्ही पण तुमच्याच कुटुंबाची माणसं आहोत ना ? तेव्हा हे एवढं घ्याच. नि डॉक्टरांनी सांगितलंय की जी जी मदत हवी ती हक्काने मागून घ्या."

"आभारी आहे."

"छे ! छे ! आभार कसचे यात ? खरं सांगू तुम्हाला. मी व्यवहारी बाई आहे. व्यवहार म्हणूनच तुमच्याकडे आले. तुम्ही टकळीवर सूत काढता, सुताची बटनं करता ते मी पाहिलं. घरातही चरखा चालू असतो. माझा भाऊ म्हणाला, "तू नुसती शटलची लेस करतेस त्यापेक्षा असं काही तरी शीक त्यांच्यापाशी. आणि खरं सांगू तुम्हाला; मी तेच शिकायला आले आहे. शिकवाल मला ?"

"त्यात काय झालं ! आनंदाने. तुम्ही नाही आमच्या उपयोगी पडलात ?"

"पण एक सांगते. मी आहे व्यवहारी. मी कुणाला काही शिकवीत नाही नि कुणाकडून काही शिकत पण नाही. डॉक्टर अम्माने आमच्यावर जादू केली आहे. तुम्हाला माझी लेस शिकवीन. येते का ती तुम्हाला ?"

त्या परिस्थितीतच कितीतरी वर्षे ती लेस शिकण्याची संधी चालून आली. आणि क्षणभर सारे विसरून मी लेस शिकायच्या आनंदातच बुडून गेले. पण, समोरची बाई व्यथित मुद्रेने उभी होती. आजी इस्पितळात ताट-कळत बसली होती. ते आठवून मी शरमिंदी झाले आणि म्हटले, "शिकीन की, वेळ तर घालवलाच पाहिजे ना ?"

"बरं जाते मी आता आणि आता मी रोज इथे येईन. किती थोडं सामान नि किती स्वच्छ घर हे. तुम्हाला बोलवलं असतं पण आजी एकट्या पडतात म्हणून म्हटलं नाही हं." नमस्कार करून ती उठली. सूर्य डुबला.

ती गेली नि मल्लव्वा घरात घुसली. "एवढी मोठी भाजी नि

तुम्हा दोघींनाच ! डॉक्टर अम्माचा काही भरंवसा नाही. मला द्या ना थोडी भाजी."

उसने मागणे रोजचेच होते. विमनस्कपणे तिला भाजी दिली. ती फतकल मारून बसली आणि हर्षभराने बोलली. "कळलं का तुम्हाला ? काय चमत्कार केला शिवशंभूने पाहा. माझ्या मुलीला क्षय नाही. आज सकाळी तिला उलटी झाली नि तिच्या फुप्फुसात अडकलेली सुपारी बाहेर पडली, नि सारे डॉक्टर आश्चर्याने थक्क झालेत बघा. मेंढा देऊ केला म्हणून हे झालं ना ? नि मेला डॉक्टर उगीच मला बोलला. उद्याच बांधते पूजा नि होते मोकळी. तुम्हाला मात्र टोपलीभर भाजी नि मला शिव्या. आम्ही शिकलेलो थोडेच आहोत, आताच देता ? तुझी विळी देशील उद्या मला ?" आता मात्र भयंकर राग आला. "काही नाही देत माझी विळी मासमटण कापायला. उसने घेतेस तर घेतेस नि वर असं बोलतेस ?"

"का ? माझी मुलगी बरी झाली नि तुझी बहीण मरत पडली म्हणून हा त्रागा वाटतं ? खूप ओळखते मी या डॉक्टरला नि तुम्हा परदेशी माणसांना. हवाय कुणाला हा भिकारडा डॉक्टर. गुण असेल तर ना मेल्याच्या हाताला ?"

ती गेली. पंधरा मिनिटे पोटात कळ नि चक्कर. इतक्यात गोविंद आला सामानाचे ओझे घेऊन. त्याने कंदिलाला काच लावली. स्टोव्हमध्ये तेल घातले नि कंदील पेटवला.

त्याला थोडी भाजी व केळी मी देऊ लागले पण तो ती घेईना. "अम्मा मी गरीब आहे पण मला लाजवू नका. एक केळं द्या फक्त. मी भाऊ आहे ना तुमचा ? अडाणी असलो तरी भाऊच. इथे तुम्ही आला म्हणून गाठीभेटी झाल्या. तुम्हाला आमची भाषा येते हे तरी कुठं माहीत होतं कुणाला ? नाही तर मी केव्हाच मदत केली असती." माझ्याबरोबर इस्पितळात आला नि आजीला परत आणतेवेळीही सोबत केली त्याने. आजी घरात आली नि फळे वगैरे पाहून थक्क झाली, "ही ग इतकी कशाला आणलीस ? वेड लागलं की काय तुला ?"

" डॉक्टरनी पाठविली."

" नशीब माझं, " ती खिन्नतेने म्हणाली, मी दार लावायला उठले तेव्हा गोविंदने हताशपणे मान हलवली आणि तो चालू लागला.

शेवंती, शेवंती आणि शेवंती

शेवंतीच्या सौरभाचं ज्ञानेश्वरीत मोठं कौतुक केलेलं आढळतं. वास्तविक या फुलाचा गंध चाफ्या-मोगऱ्याच्या तुलनेत तो काय ? ज्ञानेश्वरांच्या काव्यात सर्वत्र मोगऱ्याच्या फुलण्याचं उद्‌गान आढळतं; कधी नागकेशराचं फूल आढळतं; चाफा आढळतो; बकुळ आढळते; आणि त्या त्या फुलाच्या अनुषंगात ते दरवळ आपल्यालाही पूर्णपणे माहीत असल्याने आपण ते गृहीत धरून चालतो. पण मी शेवंतीच्या गंधाशी जरा घुटमळले. तो मंद, थोडा हवासा, थोडा नकोसा गंध घमघमाटाच्या राज्यात जरा अंग चोरूनच वावरणारा,

पण नुकताच त्या गंधाचा अविस्मरणीय हृद्य प्रत्यय मला आला; नि आला तोही, वाळूत निर्माल्य झालेल्या पांढऱ्या शेवंतीच्या फुलाच्या बाबतीत. महालक्ष्मीच्या देवळातली एक रोड माळ प्रसादाबरोबर घरी आणलेली. मी ती माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे माझ्या वडिलांच्या फोटोला टांगून ठेवली. फुलं, वेण्या मुलींना देते. माळ त्यांच्या फोटोवर अडकवून ठेवते. ती माळ तशीच पंधरावीस दिवस सुकून तिथे पडली होती. परवाच ती काढली. शेवंतीची दोन-तीन फुलं होती त्या माळेत. पांढरी व मध्ये जराशी पिवळी असलेली ती फुलं वाळली तरी त्यांचा रंग तसाच होता. फुंकर मारली तशी धूळ निघून जाऊन ती आणखीनच पांढरी दिसू लागली. त्यांचा रंग सुकल्याने बिघडला नव्हता. मी ती फुलं काढली आणि त्यांच्या पाकळ्या चुरल्या; तोच तो आत चोरून बसलेला सुगंध माझ्या आसपास बहरून गेला. मी ओंजळीतल्या पाकळ्या हुंगल्या. शेवंतीच्या त्या लाजऱ्या गंधाने मातीच्या गंधाप्रमाणेच मला भारून टाकलं. पाकळ्या मी टाकल्या पण हातांना किती-

तरी वेळ तो दरवळ सोडीना. पहिल्या वयात शेवंतीच्या वेण्या दरवर्षी हंगामात माळल्या होत्या. पण त्या फुलांच्या शोभेसाठी; त्यांच्या गंधासाठी नव्हे. एकंदरीत शेवंतीच्या वासाची जरा नाराजीच असे; गुलाब, चाफा, मोगरा, बकुळ, सुरंगी न मिळाली तरच ही निर्गंधातच जमा होणारी शेवंती माळायची. पण फुलांचा हव्यास म्हणून तीही खूप घालायची. शेवंतीच्या फुलाचे लाड कधीच केले नाहीत. हे फूल स्वस्त; त्याला राबवून मात्र घेतलं. बलिष्ठपणे, निर्दयपणे. या फुलांचं कामच मुळी माणसाची सेवा करण्याचं; त्यांचं उद्‌गान कोण करतो ? आम्ही गुलाब, चाफा डोकीत घातला तर त्यामुळे आमच्या मस्तकांना थोरवी लाभते, पण शेवंतीची फुलं मात्र आम्ही डोर्कात घातल्यामुळेच धन्य होतात, अशी भावना. तिला सौम्य धक्का दिला ज्ञानेश्वरीने आणि आता निर्माल्य झालेल्या शेवंतीच्या गंधाने झपाटल्यामुळे मागचा सारा अभिनिवेशच कोसळला. विशिष्ट गंधश्रेणीने या फुलाला जोखण्यात केवढं भावबळ आपण घालवून बसलो होतो, ते जाणवलं. केवळ त्याचं रूप आणि घवघवीत रंग, यामुळे आपण त्याचा उपभोग घेतला. त्याच्या आकाराचा गुणच असा की, त्याच्या पाकळ्या वेणीत गुंफायला सोप्या; मलमलीत रेशमी टाके बसावे, त्याप्रमाणे त्या पाकळ्या एकमेकींत मिळून जातात; सारी फुलं जणू एकच लांब फूल बनतं; फूल पण विलक्षण गुंतागुंतीचं; लक्षावधी पाकळ्यांचं फूल. शतदळ कमळ कुणी पाहिलं आहे ? पण शतदळी शेवंती हीच आमच्या प्राकृत जगात त्याचं स्थान पटकावून बसली आहे. बंगालीत शतदळ कमळाचं महत्त्व अपार आहे. जेव्हा जेव्हा तो उल्लेख येतो, तेव्हा तेव्हा शेवंतीचं घवघवीत टपोरं फूलच माझ्या नजरेसमोर उभं राहातं. या फुलाचा घरगुतीपणा मला नेहमीच जाणवत असे; आणि म्हणूनच उदंड वानलेल्या फुलांच्या ताटव्यातून हे फूल जरा बाजूलाच पडल्यासारखं झालं होतं.

आताच्या सुक्या पाकळ्यांच्या वासाने शेवंतीचं घरगुतीपण मावळलं; तिच्याबद्दलची पूर्वीची धारणा गेली; सुक्या फुलाचा वास म्हणजे एक प्रकारचा मरणगंधच. हा गंध गुलाब, बकुळ, केवडा यांना विशेष असतो. हे

मी आता शेवंतीच्या बाबतीत अनुभवलं. हे लक्षात आलं नि मी त्या मुठीतल्या पाकळ्या पुन्हा एकदा जोरात हुंगून अलगद वाऱ्यावर सोडून दिल्या.

शेवंतीच्या पाकळ्यांचं विसर्जन केलं आणि मरण नि शेवंती यांच्याबद्दलचे माझे पूर्वानुभव, अधिक टोकदार होऊन वर आले,

सुमारे अडतीस वर्षांपूर्वीची गोष्ट. विठ्ठलभाई पटेलांची प्रेतयात्रा जायची होती. नोव्हेंबर १९३३, तारीख नऊ. परदेशी मृत झालेल्या विठ्ठलभाईंचे अंत्यसंस्कार मुंबईत व्हायचे होते. त्या वेळी राष्ट्रीय चळवळ जोरात चालू होती. गांधी, नेहरू, वल्लभभाई वगैरे सारे नेते तुरुंगात होते. विठ्ठलभाईंची स्मशानयात्रा गाजत–गर्जत जाणार नव्हती. नेते बाहेर असते आणि आंदोलन नसते तर या यात्रेला नेहमीची तुफान गर्दी झाली असतीच. विठ्ठलभाईंनी पार्लमेंटचं अध्यक्षपद सोडलं, त्यानंतर चाळीस दिवस मुंबईत त्यांची चाळीस व्याख्यानं झाली. 'ब्रिटिश सरकारला कान कधीच नव्हते, आणि आता नाकही कापलं गेलं आहे,' असं म्हणून अत्यंत जहाल, सुबुद्ध आणि विनोदी वाणीने विठ्ठलभाई बोलत. ते सुगम वक्तृत्व कानात घुमायचं. आताही त्यांची आठवण करीत मी गिरगावातून गेले. नाक्यावर फुलवाल्याच्या दुकानात अनेक प्रकारचे हार होते. पण त्यात एका भव्य तिपदरी पिवळ्या शेवंतीच्या हाराने माझं लक्ष वेधून घेतलं. चार साडेचार फूट लांबीचा; मध्ये ऐटबाज गेंद घातलेला आणि मधोमध पाच लंबक असलेला तो सुशोभित हार होता. त्या लंबकात शेवटी गुलाबांची फुलं होती. मधेमधे पदकं केली होती, त्यांत नेवाळीची फुलं होती. इतका सुंदर हार मी अजून पाहिलेला नाही. उघड उघड तो हार विठ्ठलभाईंकरताच केलेला होता. तो हार खरेदी करण्याइतकी माझी ऐपत नव्हती. तरी पण कुणीतरी तो विकत घेईल आणि मुंबईच्या या पूर्वनगराध्यक्षाला आपली आदरांजली वाहील, हा विचार मनात येऊन समाधान वाटत होतं.

महायात्रेचं नेतृत्व क्रॉनिकलचे संपादक बी. जे. हॉर्निमन यांच्याकडं होतं. सरोजिनी नायडूही होत्या. यात्रा चालू झाली. हॉर्निमननी फार उत्तमपणे आपलं काम बजावलं. ती शोकयात्रा असली, तरी उद्याच्या उभारीचं

काहीतरी चिन्हही तिच्यात होतं, कारण ती सुंदर होती. गडबड नाही, गोंधळ नाही, स्तब्धता आणि खोल अंतर्मुखता तिच्यात होती. विठ्ठलभाई केवळ नमस्कार घेणारे नेते त्यांच्या अखेरच्या काळात राहिले नव्हते. सुभाषबाबूंबद्दलची त्यांची भावना, परदेशातल्या भारतीय राजकारणाबद्दलचं त्यांचं धोरण वगैरे गोष्टींमुळे गांधी–नेहरूंपासून ते दूरच गेले होते. परंतु आता या क्षणी मात्र त्यांच्या आवडत्या मुंबापुरीने सहजस्फूर्त मानवंदना त्यांना दिली. विरोध होता तो ब्रिटिश सरकारचा. पण हा विरोध साऱ्याच राष्ट्रभक्तांच्या वाटणीचा. गांधी–नेहरूंबद्दल लोकांना खूप प्रेम असलं, तरी सुभाषबाबूंबद्दलही कमी आकर्षण नव्हतं. गांधी–नेहरू आणि त्यांची प्रभावळ तुरुंगात होती तेव्हा एका परीने कुठल्याही विरोधकाची सावली न पडता विठ्ठलभाईंची–सुभाषबाबूंच्या पाठीराख्याची प्रेतयात्रा निघाली, एक प्रकारे बरंच झालं असं वाटलं. दृष्ट लागेल इतकी नेटकी ती यात्रा होती.

दुसऱ्या दिवशी 'क्रॉनिकल' मध्ये हॉर्निमननी जो अग्रलेख लिहिला. त्यात त्यांनी म्हटलं होतं की, "मी अनेक शाही प्रेतयात्रा पाहिल्या आहेत. व्हिक्टोरिया महाराणीची प्रेतयात्राही मी पाहिली आहे. या राजेशाही प्रेतयात्रांत मृत राजदेह तोफगाड्यावर ठेवतात. राष्ट्रीय मानसन्मान व आंतरराष्ट्रीय वंदना मृताला मिळते. ते वाद्यवृंद, ते समारंभी सन्मानसुद्धा विठ्ठलभाईंच्या या एक मैल लांबीच्या प्रेतयात्रेत, या यात्रेतल्या शोकस्तब्धतेच्या धीरोदात्ततेमुळे फिके पडतात. या आदरांजलीला तुलना नाही."

दुकानातला हार तो कुणी एकाने खरीदला होता आणि शवावर वाहिला होता. समाधानाचा श्वास मी टाकला.

तेव्हापासून शेवंती आणि मरण हा कल्पनाबंध माझ्या मनात निर्माण झाला. विठ्ठलभाईंच्या स्मृतीबरोबर शेवंती आठवे. नि शेवंती पाहिली की विठ्ठलभाईंची आठवण झाल्याशिवाय राहीना.

विठ्ठलभाईंकरता केलेल्या हारातील शेवंतीची प्रतिमा माझ्या मनात उत्तरोत्तर खोल खोल गेली. त्यानंतर कुठलाही हार बघितला की मी त्याची त्याच्याशी तुलना करायची नि नेमका तो नवा हार तुलनेत कमी भरायचा.

सुंदर गुलाब, घवघवीत मोगरे, यांचे हारही डोळ्यात भरेनात. वाटे, की हे तर फुलांचंच लाघव. यात कुठे आहे हाराचं कसब ?

बरेच दिवस गेले. १९३४ साली माझ्या आत्याने टोपलीभर गुलाबाची फुलं पाठवली. लाल भडक फुलं. आनंदाने टोपली उघडली, तर साऱ्या फुलांच्या पाकळ्या झडलेल्या. ही नव्हती देशी गुलाबं की त्यांचा गुलकंद करावा. मग या पाकळ्यांचं काय करायचं ? फेकून पण देववेनात. मी सुन्न होऊन बसले. इतक्यात आजोबांना पाहायला आमचे डॉक्टर आले. मला जमिनीवर फतकल मारून बसलेली पाहून ते म्हणाले, " काय ग, अशी काय वेड्यासारखी बसलीस ?'

मी गुलाबाची टोपली समोर ठेवली नि म्हटलं, " पाहा हे गुलाब ! इतक्या लांबून आले, पण त्यांची ही दशा झाली ! फेकून देववत नाहीत. देवालाही वाहाता येत नाहीत. डोक्यातही घालता येत नाहीत. " त्यांनी पाहिलं. त्यांनाही माझं म्हणणं पटलं. एक समस्या पुढे उभी होती. या पाकळ्यांचं करायचं काय ? इतक्यात माझ्या मनात एकदम कल्पना आली. " डॉक्टर, यांचा हार केला तर देवाला चालतो ?"

" हार चालेल, पण पाकळ्यांचा हार करायचा म्हणजे अजब कसरत आहे ! "

" हार चालेल ना ? मग तुमच्या मारुतीला संध्याकाळी घेऊन जा. मी पाठवून देईन. डॉक्टर, विठ्ठलभाईंसाठी केलेला हार आपण पाहिला होता, नाही ? तुम्हालाही तो फार आवडला होता. तसाच हार करते मी. "

" तसा ?" ते खोचून म्हणाले. " तसा हार होणं कठीण आहे ! "

" तसा म्हणजे त्या नमुन्याचा. "

मी उत्साहाने बागेतील सारी पानं-फुलं जमवली. बकुळी, गुलाब, जाई यांची फुलं घेतली. शेवंतीची पानं घेतली. वेण्यांचा कलाबतू आणि मग तो नमुन्याचा हार आठवून आठवून मी प्रत्येक पाकळीची सुरळी करून माझा हार तयार केला. तो अर्थात नमुन्यापेक्षा उतरता असला तरी त्याला घरून होता, यात शंकाच नाही. सहा तास मी हार करण्यात घालवले होते.

दुसऱ्या दिवशी डॉक्टर म्हणाले, "देवळात सर्वांना हार फार आवडला. विठ्ठलभाईंच्या हारासारखा हार तुलाही सराव ठेवलास तर जमेल."

आणि अशा तऱ्हेने एक अंकुर त्या हारावर रुजला.

काळ पुढे पुढे गेला. वल्लभभाईंनी निजामाला वठणीवर आणलं. संस्थानं खालसा केली. भारताला युद्धकर्तृत्वाची जाणीव देत देत वल्लभभाई गेले. भारताचा 'पोलादी पुरुष' पडला. त्यांची भाषणं काँग्रेसच्या अधिवेशनाची भूषणं होती. त्यांतून कृतीचे अनेक दाखले असत. रोखठोक भाषण करावं वल्लभभाईंनीच. ती भाषणं, तो उग्र-तापट चेहरा आणि तो निश्चयी भाव समर्पणवृत्तीला गांधींनी जोडला. तेव्हापासून वल्लभभाई आमचे म्हणजे जनतेचे नेते झाले. स्वराज्य आलं. वल्लभभाई भारताचे उपमंत्री झाले; सेवकाचे अधिकारी झाले. गांधींची हत्या झाली आणि तिथून नेहरूंची लोकप्रियता वाढली आणि यांची उणावू लागली. निजामशाहीच्या नायनाटामुळे जरी त्यांच्या कर्तृत्वाला जनतेने तुडुंब मान्यता दिली असली, तरी आता नव्या-जुन्या काँग्रेसमध्ये जो संघर्ष दिसतो, त्याची ठिणगी नेहरू व वल्लभभाई यांच्या मतभेदाच्या रूपाने इथेच फुटलेली आता स्वच्छ दिसून येते.

वल्लभभाईंबद्दल उलटसुलट विचार चालू असतानाच ते गेले. ते मुंबईतच वारले. बिर्ला यांच्या निवासस्थानी नेपियन सी रोडवर. दिवस पंधरा डिसेंबर १९५०. हा थंडीचा हंगाम असल्याने दिवस आखूड. वल्लभभाईंची प्रेतयात्रा दुपारी चार वाजल्यानंतर निघणार होती. लोक नेपियन सी रोडकडे हजारोंनी चालले होते. मीही त्यात होते. मी आजूबाजूच्या लोकांची बोलणी ऐकत होते. कुठे प्रशंसा, कुठे चीड ऐकू येत होती. पण शोकमग्न कुणीच नव्हतं. विठ्ठलभाईंच्या वेळीसुद्धा शोकाचा उमाळा नव्हता. पण तीव्र दुःख होतं. एक स्वातंत्र्ययोद्धा गेल्याची जाणीव दिसत होती. गर्दीतून वाट काढीत मी बंगल्याच्या दाराजवळच बाहेर उभी राहिले. नेहरूंना यायला विलंब झाला होता. म्हणून प्रेतयात्रा निघायला ठरल्यापेक्षा उशीर होऊ लागला. राहिलेल्या लोकांची उत्कंठा वेगवेगळ्या रूपात प्रकट होऊ लागली. आमच्यासारखे काहीजण कोण कोण बडी मंडळी येतात, ते पाहा-

ण्यात गर्क झाले. हजारो हार नि चक्रं येत होती. पण ओलावा नसल्याने तो प्रसंग अधिकाऱ्याच्या मृत्यूचा वाटला; नेत्याच्या मृत्यूचा वाटेचना. काही मध्यमवर्गीय महिला आणि पुरुष, सरळ बागेत घुसले. त्यांनी तिथली फुलं तोडली. कुंड्यांची नासधूसही झाली. त्यांनी मिळतील तेवढी शेवंतीची फुलं ओरबाडून आणली; राजवर्खी, झिपरी, बटनाची, पांढरी, पिवळी, गिरेंबाज, वाटोळी—सारे प्रकार होते त्यांत. काही बायकांनी ती फुलं हर्षभराने डोकीत घातली; काही पुरुषांनी कोटाच्या बटनांत खोवली; काहींनी सुंदर गुच्छ करून हातात घेतले. घराची शोभा वाढवणारी सौंदर्यदृष्टी इथेही प्रगट झालेली पाहून मला एक आठवण झाली. नगरला एका प्रेताची तयारी चालली होती. सुंभ होता. कडब्याच्या लांब काड्या होत्या. दोन कावळे सुंभाचे तुकडे नि कडब्याच्या काड्या जमा करण्यासाठी सारखे तिथे घोटाळत होते. अखेर त्यांनी काही कार्यभाग साधलाच. पाखरांना घरटयासाठी निसर्गाने कुठूनही काहीही गोळा करायची मुभा दिलेली असते. पण माणसांना ही वांझोटी सौंदर्यदृष्टी कुठून आली ? ते पाहिलं आणि मला त्या माणसांबद्दलच नव्हे, तर शेवंतीच्या फुलांबद्दलही एक प्रकारची घृणा आली. कित्येक वर्ष मी ती फुलं पुढे डोकीत घातली नाहीत.

नेहरू आले नि थोड्या वेळाने प्रेतयात्रा निघाली. मोठ्या तोफगाडयावर वल्लभभाईंचा देह राष्ट्रीय ध्वजात गुंडाळून ठेवला होता. सैनिकी बँड वाजत होता. शाही इतमाम होता. लष्करी सलामी होती. सारं काही होतं; पण कुठे तरी आस्था तुटली होती. नेहरू उभे होते. त्यांचा चेहरा चिंताग्रस्त होता; दुःखी नव्हता. त्याच्यावर घाई होती. तोच वेगाचा भाव यात्रेत शिरला. झपाट्याने गाडा पुढे गेला.

सूर्य झरझर मावळला. दिवस जलद मिटला. यात्रेने हां हां म्हणता स्मशानभूमी गाठली. कमालीची शिस्त. कमालीची घाई. इथे शान होती. उपचारात न्यून नव्हतं. ही गर्दी लोटली होती. पण ती बघ्यांची; योद्धा—अधिकारी जगाच्या पडद्याआड जात होता, ते पाहायला. तो विठ्ठलभाईंसारखा आमचा नेता नि केवळ नेता नव्हता. मोठा अधिकारी गेला, जागा रिकामी

राहिली; ती आता कोण भरणार, हाच विचार सर्वत्र चालू होता.

विठ्ठलभाईंना नेलं ते साध्या लॉरीतून. पण ती लॉरीदेखील या रणगाड्याहून कितीतरी सुशोभित वाटत होती; कारण ती संथ, मूक यात्रेबरोबर एक मोलाचा देह घेऊन चालली होती. नि हा रणगाडा नेत होता अधिकारी पुरुषाचं शव. अशी अनेक शवं तो रणगाडा ओढणार होता. मोठे अधिकारी आहेत नि ते मरणार आहेत, तोवर त्याच्या कार्याला, त्याच्या मिरवणुकीच्या कार्याला खळ म्हणून नाही. विठ्ठलभाईंपेक्षा इथे फुलांचा डोंगराएवढा खच पडला होता. पण त्यात तो गेंदबाज शेवंतीचा हार त्यांच्यासाठी वाट पाहात राहिला नव्हता. कदाचित असलाच तर त्याचंही काहीतरी अजस्र नि व्यवहारी रूपांतर झालेलं असणार. विठ्ठलभाईंचे मरणशय्येवरचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत. जिनेव्हाला त्यांच्या नर्सने, रुग्णाच्या खोलीत प्रसन्नता यावी म्हणून फुलं आणली नि ती त्यांच्याजवळ ठेवली. ती फुलं पाहाताच खवचट विठ्ठलभाई हसून म्हणाले, "आताच कशाला फुलं? ती आणायची वेळ अजून झाली नाही!'

मृत आणि फुलं यांच्या संकेताची अशी चेष्टा त्यांनी केली, तरी पिवळ्या शेवंतीचा हार त्या संकेताला बिलगून त्यांच्याबरोबर गेलाच. आणि इथेही तोच संकेत होता. पण फुलं, फुलं राहिली नाहीत. त्यांचे डोंगर झाले. ती जड झाली.

आणि बघताबघता रणगाडा दृष्टीआड झाला. गर्दीतली माणसं फुटाणे घेऊ लागली; कारण, अजून घरची वाट मोकळी झाली नव्हती आणि गर्दी ती गर्दीच. लोकशाहीतली गर्दी. अशा गर्दीत पायतणं हरवतातच. इथेही ती हरवली होती; आणि मग अतिउत्साही नवयुवकांनी ती हसत–हसत हातात घेतली आणि तोंडाला येईल ते भकत ती लीलेने भिरकावून दिली. शववाहक तोफगाडा दृष्टीआड होत होता म्हणून बरं. नाहीतर सरळ त्याच्यावर ती पायतणं जाऊन पडती. नाही तरी त्यांची दिशा तीच होती. राजकारणाचं ते भयानक व्यंगचित्र कुणा चित्रकाराने रेखाटलं नसून उत्स्फूर्त मानवी विकट कृतीतून स्फुरलं होतं आणि याला जबाबदार होती नियती!

वल्लभभाईंना, तुम्हाला-आम्हाला आणि पायतणांचं खेळणं करणाऱ्या त्या, जनतेत एकरूप झालेल्या पोरांना निर्माण करणारी विराट आणि खत्रूड नियती!

फुलभेट

१९३६ चे वर्ष असावे. नीटसे आठवत नाही. आजोबा व आजी वारल्याला वर्ष उलटले असेल-नसेल. मी बेळगावला गेले होते. राजाराम शास्त्र्यांबद्दल लिहायचे होते नि त्यांचे बरेच मतभेद ज्यांच्याशी झाले त्या मणेरीकर वकिलांना भेटायचे होते. उतरावे कुठे हा प्रश्न आला. वडील म्हणाले, 'तमण्णाचार्यांकडे उतर.'

तमण्णाचार्य हे आजोबांचे मित्र नि त्यांचे एकाकाळचे अशील होते. त्यांची आजोबांवर फार भक्ती होती. आजोबांच्या पडत्या काळात बाकीचे, मानीव मित्र दूर झाले होते. पण तमण्णाचार्य कधीच दुरावले नाहीत. माझ्या वडिलांना बेळगावला कधी कधी जावे लागे. ते तमण्णाचार्यांकडेच उतरत. मीही उतरले. माझ्या वडिलांना अरेतुरे म्हणणारे ते म्हातारे जोडपे फार आनंदले.

तमण्णाचार्यांची पत्नी साठीपलीकडे पोचलेली असूनही अत्यंत सुंदर होती. केस फक्त पिकले होते. पण त्या रुपेरी केसांची शोभाही अपूर्व होती. रंग सतेज गुलाबी; चेहरा अतिशय रेखीव, बांधा सुडौल, बाई अत्यंत नीटनेटकी. लुगडे चापूनचोपून नेसलेली. दागिन्यांनी मढलेली. केसांत नेहमी गजरा. नाकात चमकी. आपल्या रूपाची जाणीव क्षणभरही न विसरणारी व्यक्ती मला अजून दुसरी दिसलीच नाही.

त्या घरात हे म्हातारे जोडपे, नि त्यांची सोळा वर्षांची नात याशिवाय दुसरे माणूस नव्हते. नातही गोरी नि शेलाटीच. पण आजीचा मोहकपणा काही वेगळाच !

दुसऱ्या दिवशी सकाळी बघते तर नात नि आजी यांचे अक्षरशः

भांडण चालले होते. भांडणाचा विषय नागकेशराच्या फुलाची वेणी आज कुणी माळायची हा होता.

नात म्हणत होती, "आज मी घालणार. गेल्या वेळी तू मला एक फूलसुद्धा दिलं नाहीस–"

"कुठलं फूल देऊ ? देवाला नको द्यायला ? नि उरलेली चार फुलं मी घातली तर लगेच बोंबलतेस एवढी ? केसांच्या तर चार वटा नि म्हणे मी घालणार फूल ? लग्नाला पत्ता नाही. सवाशीण देवी असते बरं. तिनंच फुलं घालावी अशी. तुम्हाला तुमचे गुलाब–टुलाब आहेत. मोगरे–मदनबाण आहेत ना ? हे जुनं फूल म्हाताऱ्यांनीच घालायचं. हे फूल सौभाग्याचंच असतं. माझंच ते–"

आता नात याच्यावर काय बोलणार ? फुणफुणली, फुरंगटली, नि जाऊन झोपली. आजी आत आपल्या कामात गुंतली. मी अंगणात उभी होते.

आजी जवळ आली नि हसत म्हणाली, "तुला वाटलं असेल की काय ही म्हातारी नातीबरोबर एवढ्याशा फुलाकरता झगडतेय म्हणून. पण तुला म्हणून सांगते, दुर्गा ! आताच्या या पोरींना या जुन्या गोष्टींचा जिव्हाळाच नाहीय बघ. डोकीत नागकेशराचं फूल घालायचं का, तर केवळ दरवळतं म्हणून. पण मग तोंडाला पावडर लावायची. हे दोन वास एक होतात का ग ? नागकेशर देवाचं फूल. त्याचा वास असला तर दुसरा नको. त्याचं रूप अप्रूपच. ते या इतर फुलांसारखं घालायचं ? ही गधडी डोकीत घालील नि लोळेल इथं तिथं. अशी फुलं घालून बाईनं कसं हसतमुखानं कामं उरकीत राह्यलं पाहिजे तर त्या फुलाची शोभा. तुला काय वाटतं ? सांग. मी आपली वेडी बिनशिकलेली बाई.'

"आई, मी ते फूल पाह्यलंच नाही हो अजून !"

"काय तू पाह्यलं नाहीस ? अग्गोबाई ! ऐकावं ते नवलच ! बाकी मुंबईत कसली आलीत फुलं ? थांब. आज तुला देतेच आणून. किशा मेला रोज देईलसा नेम नाही. पैसे देऊन वर विनवणी. आज तुलाच देईन हां

ती फुलं. सारी तुझीच–तू आहेस तोवर आमचं भांडणच नको. बरी आलीस ग बाई !"

मलाही मनातून फार बरे वाटले. दुपारी उत्कंठा वाढली. इतकी की सांगून सोय नाही. मी नागकेशराच्या फुलाची वाट पाहात बसले.

आजींनी मोठा आरडाओरडा करून चार फुले आणली. सुरंगी-सारखं पण कवटीचाफ्याएवढं मोठं पांढऱ्या शुभ्र पाकळ्यांचं फूल, आत केशरी परागपुंज. असे मनोहर फूल मी अजून पाहिलेले नाही. आता सुधाही खुषीत होती. वेणी मला द्यायला ती उत्सुक दिसली.

आजींनी स्वतःच्या हाताने फुले गुंफली, वेणी केली नि माझ्या केसात घातली. त्या फुलांच्या सुगंधाने घर दरवळले. माझा आनंद गगनात मावेना, मी आज नागकेशराची फुले माळली होती. आजवर नुसते मसाल्यातले नागकेशरच माहीत होते. त्याचे फुललेले जिवंत पूर्ण रूप मी आज डोळ्यांत नाकात नि स्पर्शात भरभरून घेतले. ही दुर्मिळ फुलभेट मला संवेदनात चिरंतन करायची होती.

तिला खरे चिरंतनत्व आले ते पुढं पंधरा–सोळा वर्षांनंतर. विल्यम जोन्स या भारतातल्या पहिल्या पिढीतल्या आंग्ल प्राच्य विद्याविशारदांच्या उद्‌गारामुळे. जोन्सनी भारतीय वृक्षसृष्टीवर अपरंपार लोभ केला. तिचे ते पहिले अभ्यासकच होते. आपल्या त्या शंभर वर्षांपूर्वीच्या पुस्तकात त्यांनी म्हटले होते की, 'मी जगातल्या बहुतेक देशांतली उत्तमोत्तम फुले पाहिली आहेत. पण आकार, रंग, सौंदर्य आणि सुवास या चारीबाबतीत नागकेशराच्या फुलांची बरोबरी करील असे फूल मी अद्याप पाहिलेले नाही.'

हा उद्‌गार वाचून माझे भारतीय स्त्री–मन उचंबळले. म्हणजे नूरजहानचा गुलाब काहीच नाही तर ! हे फूल खास भारताचे असे म्हणतात, जसा कदंब आहे. मी मनात म्हटले, जोन्सनी माझ्या मनातले गुज बरोबर ओळखले. बेळगावची नागकेशरे परत घमघमली. तेव्हा त्यांची भेट देहाची नि मनाची होती. आताची फूलभेट प्राणांची होती.

आणखी बरीच वर्षे गेली. १९७० साली बंगाली वैष्णव भावकवी

चंडीदास 'श्रीकृष्ण कीर्तनाच्या' गुजगोष्टी बोलू लागला. तो म्हणाला, 'राधेचं फूलशरीर होतं. तिचे केस तमालाच्या फुलांसारखे काळे, निळे डोळे निळ्या कोरांटीसारखे. नाक तिळफुलासारखे. गाल मोहाच्या फुलासारखे. ओठ सुपारीच्या फुलासारखे. दात कुंदकळ्यांसारखे. कान अगस्त्याच्या फुलासारखे, भुज पिवळ्या जुईसारखे. पंजे अशोकाच्या गुच्छासारखे. स्तन स्थलकमलाच्या कळ्यांसारखे. त्यांच्यावरचे केस आळशीच्या निळ्या फुलासारखे. मांड्या सोनकेवड्यासारख्या. पावले कमळासारखी. बोटं सोनचाफ्याच्या फुलांच्या गुंफणीसारखी. नाभी नागकेशराच्या फुलासारखी. सारं अंग शिरीष फुलासारखं सुकुमार. इवल्याशा हसण्यात, नेवाळी, सायली प्राजक्त नि मोगरी. असं ते फुलशरीर.'

मी सारी फुले विसरले. त्यांचा गंध विसरले. डोळ्यांना दिसले नाभीसारखे गोरे नि पिवळे खोलसर डौलदार नागकेशराचे फूल. कस्तुरीमृगाप्रमाणे राधेची बेंबी सुवासिक झाली होती.

कस्तुरीप्रमाणे राधेचे जीवन-मरण ती झाली होती.

आता या फुलभेटीत नागकेशराचा मनाशी नि प्राणाशी जडलेला संबंध सुटला नि अशरीरी विश्वमय झाला, राधेची ती नागकेशरी नाभी थेट विश्वाची नाभी बनली, त्या नागकेशराचे पराग सूर्यचंद्राचे किरण बनले. कळ्याकळ्यांना जागवू लागले.

याच सुमाराला आणखी लौकर चौथी फुलभेट झाली. पैसला बक्षीस मिळाले तेव्हा, आमच्या कुटुंबाचे तीन पिढ्यांचे ऋणनुबंधी स्नेही अनंतराव हर्डीकर, ऐंशीच्या पलीकडे गेलेले. कितीतरी वर्षांनी जिना चढून आले. धापा टाकीत म्हणाले, 'काल राजापुराहून आलो. ही फुलं मुद्दाम तुला आणली आहेत.'

पानांसकट फुलांचा जुडगा माझ्या हाती त्यांनी दिला. मला हसवेना, रडवेना, बोलवेना, देठापानांसकट मिळालेली ती अपूर्व फुले सारीच जण कौतुकाने न्याहाळून पाहू लागली. नागकेशराच्या या फुलभेटीने मी तृप्त झाले. विश्वनाभीतले राधेचे फूल फिरून धरणीवरचे घरगुती फूल

झाले. पोरीबाळींशी एकरूप झाले. सवयीचे साधे फूल झाले. या फुलभेटीने मला शांतशी तृप्ती आली. आता काही हवेसे उरलेले नाही.


ठाणे
ग्रं. क्र. 34493

धर्मप्रचारक आणि अबला

१९३९ साली दिवाळीच्या अगोदर पीएच.डी. च्या प्रबंधासाठी चवथी व अखेरची सफर रानात करायची होती, १९४० च्या एप्रिलनंतर परत फिरायचे होते. पण वर्षभर अगोदर मला यावेळी तू घरातून बाहेर पडू नको, गेलीस तर पुढलं आयुष्य हाती राहणार नाही अशी पूर्वसूचना वारंवार मिळत गेली. ही हकीकत 'नवी क्षितिजे'त 'पूर्वसूचनेचा अनुभव' या लेखात प्रसिद्ध झालेलीच आहे. अर्थात या वेळेला माझे वडील, ज्यांना मानलेले चुलते समजत, ते कै. प्रा. रा. ना. भागवत यांचे चुलते, बापूकाका माझ्याबरोबर आले होते. यावेळी मी एकटी नव्हते.

१९४० साल लागले. मला वाटते, संक्रांतीचा सुमार असावा, बापूकाकांच्या मनात आले, जमशेटपूरला जाऊन कृष्णराव ढवळ्यांना ऊर्फ किशाला भेटावे. त्यांचा व बापूकाकांचा फार घरोबा. कृष्णरावांचे वडील बंधू भास्करराव माझ्या वडिलांचे मित्र. बापूकाका म्हणाले, "कृष्णाकडे जाऊ या. परत भेट कसली होतेय?" नि मी पण तयार झाले. सात–आठ दिवस या दौऱ्यात मोडणार होते. दोनच दिवस आम्ही जमशेदपूरला राहणार होतो. मी कृष्णरावांना पत्र लिहिले. 'या' म्हणून उत्तर आल्यावर आम्ही निघालो.

कृष्णराव अविवाहित, पण पाहुण्यांचा राबता विचारूच नका. यावेळी त्यांच्या घरी विनायकबुवा मसुरकर आणि त्यांचे काही शिष्य यांचा मुक्काम होता. मसुरकरबुवा सारा दिवस बंद खोलीत असत. बाहेर रखवाली करायला एक धिप्पाड शिष्य असे. त्यांचे जेवणखाण सारे त्या बंद खोलीत होत असे. जेवण प्रथम अनुयायी घेत, नंतर ते घ्यायचे. यजमानांबरोबर जेवण.

खाण नाही हे कृष्णरावांनाही जरा लागले होते. आम्ही गेल्यावर ते म्हणाले- " बरं झालं वापूकाका ! आता झकास जेवण करू या. मोठे पाहुणे आतच जेवतात."

दुसऱ्या दिवशी सकाळी मसुरकर महाराजांचा निरोप आला की मी त्यांना भेटावे. माझी माहिती यांना कशी याचा मला अचंबा वाटू लागला, मी त्यांच्या मार्गातली उघड नव्हते; माझ्या येण्याची वार्ता त्यांना कशी कळली याचे मला नवल वाटले; कारण मी तर एक विद्यार्थिनी होते. त्यावेळी माझे नावगावही कुणाला माहीत नव्हते. पण बोलावणे आल्यावर न जाणे अशिष्ट दिसले असते, तेव्हा मी ठरलेल्या वेळी आत गेले. जमिनीवर गादी होती. तिच्यावर स्वच्छ चादर होती. दोन शिष्य होते; त्यातलाच एक तो धिप्पाड द्वारपाल होता. त्यानेच मला आत नेले होते. गादीवर एक वृद्ध पण खूप धिप्पाड असा गोरा नि रुबाबदार संन्याशी बसला होता. हेच ते मसुरकर महाराज हे कुणीही ओळखले असते. गादीच्या खाली बैठकीवर मी एक टोकाला मुकाट्याने बसले. माझ्याकडे निरखून पाहात ते उद्‌गारले. " हं ! तुम्हीच का त्या ? इतक्या दुबळ्या कशा ? तुम्ही खरोखरच का जंगलात हिंडलात ? तुमची हकीगत ढवळ्यांकडून ऐकली होती."

मी काहीच बोलले नाही. कारण त्यांना माझी माहिती झालेली होतीच. फिरून माझ्याकडे रोखून पाहात, चेहऱ्यावर बारीक हसू खेळवीत ते म्हणाले, " एकट्या फिरलात. वयही जास्त नाही; नि आता आलात ती बरोबर पुरुषाची सोबत घेऊन. तेव्हा बरा–वाईट अनुभव आलाच असला पाहिजे. जंगलात लोकांचा वाईट अनुभव यायचाच. तर मला सांगा तुम्हाला खरोखर काही अनुभव आला आहे की नाही ते." किंचित थांबून ते मग कार्यकर्त्यांच्या आश्वासक हुकमती लकबीत म्हणाले, " मला सारं सांगा. लाजायचं कारण नाही. मुसलमानांचा बाईमाणूस म्हणून तुम्हाला जो अनुभव आला असेल, त्याच्याबद्दल सारं सांगा."

असा पहिल्याच भेटीत पहिलाच प्रश्न अनोळखी तरुण स्त्रीला करणारा पुरुष–स्वामी असला तरी पुरुषच ना ?–मला अजून भेटला नव्हता.

याच्या अगोदर वर्ध्याचे गांधी शिष्य आर्यनायकम् भेटले होते नाही म्हणायला गेल्याच वर्षी. मी अविवाहित. व्हेरियर एल्विनही अविवाहित; मी त्याच्या आश्रमात आठ दिवस मुक्काम केला होता. ही वार्ता काँग्रेस गोटात दुमदुमली होती. आर्यनायकम्ना ती कळलीच होती; पहिल्या रहिवासात दादाभाई नाईक बरोबर होते नि दुसऱ्या वेळी मी एकटी होते. तेव्हा गोष्ट काय ? एकच उठायची. तिच्याबद्दल मला नवल वाटले नाही. पण आर्यनायकम् मला त्यांच्या एका मैत्रिणीच्या घरी पाटण्याला भेटले, तेव्हा तिने ओळख करून देताच एकदम फटकारून उद्‌गारले. 'म्हणजे हीच ती मुलगी ना ? एल्विनसारख्याच्या घरी राहिली होती ती ?' त्या बाईंना विचित्र वाटले. त्यांनी विषय बदलला. मग आर्यनायकम् अहिंसा, चारित्र्य, पावित्र्य याबद्दल एकटेच खूप बोलत होते. पण मी जेवणात मन गुंतवले. स्वतःच्या चारित्र्याची ग्वाही देणे हा बढाईखोर असंस्कृतपणा तर आहेच; पण त्याचे मूळ स्वतःमधला चमत्कारिक न्यूनगंड आहे अशी माझी धारणा असल्यामुळे शहाण्या माणसाने आत्मसमर्थनाच्या भरीला पडू नये हा धडा मी घराबाहेर संशोधनासाठी पडले तेव्हाच स्वीकारला होता.

पण हा प्रसंग तर त्याहूनही बाका होता. कारण अविवाहित मुलीचे नाव अनेकांच्या संदर्भात घेतले जाते; ती एक सामाजिक खोड आहे नि करमणूक पण. तिची सवय झाली होती. पण जगरहाटीत मोडणारी तरी ती गोष्ट होती. पण हा प्रश्न ? हा काय प्रश्न झाला ? बाई एकटी असली की ती पुरुषाची शिकार झालीच पाहिजे; नि हिंदूबाई मुसलमानाशिवाय कुणाची शिकार होणार ? मी का अमेरिकेहून आलली निवेदिता होते ? मी का अध्यात्माची यात्रिक होते ? रानटी लोकांचे असंस्कृत जीवन पाह्यला निघालेली किरकोळ पोर मी. शुद्धीकरणाचे आजन्म व्रत घेतलेल्या त्या नितांत हिंदू ध्येयनिष्ठ पुरुषाच्या मनाची वाट एकच होती. उद्धाराची. त्यात अबलोद्धार पहिला. त्या प्रश्नातच मला हे जाणवले. त्यांचे शुद्धीकरणाचे वर्तमानपत्रातले उल्लेख आठवले. पण मनात मनस्वी चीड आली; म्हणजे त्यांना प्रचाराला माझ्या उदाहरणाचा दाखला हवा होता. 'दाखल्या'चा

विचार मनात आला नि त्याबरोबर एक कच्चा दुवा पण मला जाणवला. त्यांच्याजवळ इतके सणसणीत उदाहरण नसले पाहिजे. मला गंमत वाटली. प्रथम 'अशा प्रश्नांना मी उत्तर देत नाही,' असे सांगून आपल्या चारित्र्याचा पंचनामा इथेच थांबवावा असे वाटत होते. पण आता मी जशी गोंडा-कातो ड्यांची माहिती गोळा करीत होते, तसेच तेही बापडे अशा अत्याचारांची माहिती त्यांच्या प्रचारासाठी गोळा करीत होते, हे मनात आले, नि मी सावरले. मी म्हटले, "एकटीने हिंडायचं ठरवलं, तेव्हा कुठलाही प्रसंग आला तर कसं वागायचं हे गांधींच्या लेखातून मला कळलं होतं. बाईला नेहमीच सावध राहावं लागतं. प्रसंग आला तर त्याच्याशी मुकाबला करण्या-इतका आत्मविश्वास मला आला होता; प्रसंग आले नि गेले, त्यातून मी सुखरूप पार पडले. मुसलमानांचा एकही अनुभव वाईट आला नाही. आले चांगलेच." गांधींबद्दलचा उल्लेख त्यांना आवडलेला दिसला नाही. मुसलमानांचा वाईट अनुभव नाही, उलट चांगलाच आला हे ऐकून ते साफ बिथरले. म्हणाले, "काय म्हणता? असं व्हायचंच नाही. मुसलमानांचा अनुभव चांगला हे खरं नाही. आपल्या बायकांचा अकबरापासून इतिहास काय सांगतो?" मग थोडा वेळ थांबून ते मला म्हणाले, "इतक्या हिंडलात नि वाईट अनुभव नाही, हे नवल आहे. मला सांगायला हरकत नाही. सांगा पाहू." आता मलाही स्फुरण चढले. मी म्हणाले, "लपवण्यासारखे माझ्याजवळ काही नाही. मुसलमानांचा अनुभव सांगते. गेल्या वर्षी आठ दिवस सगळीकडे हिंदु–मुसलमानांचा दंगा चालला होता. मला पाटण्याहून जबलपूराला जायचं होतं. पण अलाहाबादला उतरता येईना. चार दिवस मी गाडीतच काढले. पाटणा ते अलाहाबाद अशी फिरत होते, रेल्वेच्या पोलिसांना नि गार्डला मी सांगायचे की "बायकांच्या डब्यात मी एकटी आहे. रात्री मला संरक्षण हवं." आणि ते मिळायचं. एकदा मात्र मिळालं नाही. तिसऱ्या वर्गाच्या बायकांच्या डब्यात मी एकटी होते. शेजारच्या डब्यात मुसलमान होते. गयेच्या स्टेशनावर मी इकडेतिकडे पोलिसाला धुंडीत असताना, त्यातल्या एका उतारूने विचारले, "बाई, तुम्ही एकट्याच का? काय हवं तुम्हाला?"

मी माझी भीती बोलून दाखवल्यावर तो म्हणाला, " बाई, खुशाल बस तुम्ही डब्यात. हे बिहार आहे. स्त्रीच्या केसाला इथे कुणी धक्का लावणार नाही. आम्ही आहोत बरोबर." खरोखरच मी स्वस्थपणे डब्यात बसले नि निघोरपणे अलाहाबादला उतरून जबलपूरची गाडी पकडली. तसं पाहिलं तर ते लोक मला काय वाटेल ते करू शकले असते. काय केलं असतं मी ? मला त्यांचे उपकार वाटतात."

मसुरकरबुवांचा चेहरा कोरा होता. पण आता सांगायचेच असे म्हणून मीच पुढे बोलू लागले, " नि गेल्याच वर्षी मी जबलपूरहून मंडल्याच्या जंगलात पाटणगढला व्हेरिअर एल्विनकडे जात होते. त्यांची मोटार रायपूरला मला न्यायला यायची होती. पण घाटात खूप पाऊस पडला. जी बस दुपारी चार वाजता पोचायची ती रात्री बारानंतर पोचली. काय करावं ते मला कळेना. रात्रभर बसमध्येच बसून राहावं नि सकाळी त्याच बसने जबलपूरला जावं असं मी ठरवलं. कंडक्टर, ड्रायव्हर यांनाही पेच पडला. इतक्यात एक पोलिस-इन्स्पेक्टर आला; त्याने विचारलं, " बाई तुम्ही उतरत का नाही ? कुठं जायचं तुम्हाला ?" मी सांगितले की " मला एल्विनसाहेबाकडे पाटणगढला जायचं होतं ... मोटार यायची होती पण बस लेट झाली. बसमधेच बसून राहाणार आहे." त्यावर तो म्हणाला, " साहेबाची मोटार तुमच्यासाठी थांबली होती. पण आता ती गेली. तुम्ही कुठे जाणार ? तुमचा माझ्यावर विश्वास आहे का ? मी मुसलमान आहे." मी म्हटलं, " आहे ! " " चला तर आमच्या पोलिस स्टेशनात तुमची सोय करतो." मी उतरले. ठाण्यावर गेले. एका खुर्चीवर बसले. तो बाहेर गेला नि पंधरा-वीस मिनिटांत परतला. " चला तुमची राहायची सोय एका घरात केली आहे." मी निघाले. एका मराठी सारस्वत कुटुंबात त्याने मला नेले. बाईने रात्री एक वाजता मला भातपिठलं जेवू घातलं. मी आचवतेय तोवर तो इन्स्पेक्टर परत आला नि म्हणाला, " दीड वाजला आहे. साहेबाची मोटार तयार आहे. तुम्ही तयार आहात जायला ?" मी " आहे " म्हणून सांगितले. दुसऱ्याची मोटार सकाळपर्यंत अडवून कशी ठेवायची ? मी निघाले. नर्मदा

ओलांडायची होती. दाट जंगल होतं. पाऊस पडत होता. ड्रायव्हर मुसलमान होता. साडेतीन वाजता मी पाटणगढला पोचले. ड्रायव्हरने दार ठोकलं नि एल्विन स्वतः बाहेर आले. मला पाहून आश्चर्याने थक्क होऊन त्यांनी बसकण घेतली. "काय धाडस तुझं. या रात्री ड्रायव्हरबरोबर तू एकटी आलीस ? मी सुद्धा आलो नसतो" असं ते म्हणाले. "सांगा आता की मुसलमानांचे हे अनुभव मला आले; ते चांगले नाहीत का ?"

मसुरकर महाराज मौन धरून होते. तेव्हा मी म्हटले "वाईट अनुभव आला पण तो हिंदूचा होता. मी सरकारकडे त्याबद्दल लेखी तक्रार देखील केली. पण बचावले स्वतःच्या धैर्यामुळेच. सांगू ती हकीकत ?" "नको; काही जरूर नाही." ते म्हणाले. थोडा वेळ तसाच गेला. तणाव वाढला होता. मग ते अगदी खालच्या आवाजात म्हणाले, "पण तुम्ही तो अनुभव हिंदूचा असला तरी थोडा बदलून, गाव बदलून मुसलमानाचा म्हणून लिहून द्याल का ? आम्हाला तो चालेल." आता मी चिडले. "पण मला चालायचं नाही. बाईला कुणीही पुरुषाने त्रास दिला तर ते वाईटच. हिंदूचा त्रास नि मुसलमानाचा त्रास, काय फरक आहे त्यात ? मी खोटं लिहिणार नाही."

स्वामींनी मौन धरले. मी उठू लागले तेव्हा ते म्हणाले, "आमच्या आश्रमाला स्त्रियांची वाण पडते. तुम्ही कार्यकर्त्या म्हणून का येत नाही ?" मी "नाही" असे उत्तर दिले. माझा अविवाहितपणा मला असा कुठे अडकवायचा नव्हता. तेवढ्यात स्वामींनी एक पुस्तक दिले. ते घेऊन मी बाहेर आले.

कृष्णरावांनी प्रचारपुस्तक पाहिले नि म्हटले, "आम्हाला काही असलं पुस्तक दिलं नाही त्यांनी."

विद्येच्या वाटेवर

विद्येचे मला उपजत वेड. कारण माझी चौकसबुद्धी फार अवखळ आणि आणि तीव्र होती. साधारण तीन वर्षांपासूनची आठवण मला आहे; तेव्हापासून वडील माणसे जे-जे करतील ते–ते आपण करायचेच, नव्हे केलेच पाहिजे अशी प्रेरणा माझ्या मनात असे. आगकाडी पेटविणे ही पहिली विद्या. त्याबरोबरच चुलीतल्या कोलितांशी खेळ, पीठ चोरून पळवून पाण्यात कालवून भाकरी करून ती चुलीत टाकणे ही नंतरची पायरी, भाजी चिरणे ही एक महत्त्वाकांक्षा. चाकू, कात्री, विस्तव ही मुलांची खेळणी नव्हेत, असे वडील माणसे बोलत आणि ती तसे बोलत म्हणूनच त्यात त्यांच्या मोठेपणाचे रहस्य भरलेले आहे असे माझ्या बालमनाला वाटायचे. नेमकी तीच हत्यारे नि कोलिते माझ्या जिज्ञासेने जपली. ती वापरणे सोपे नव्हते म्हणून यात शिकूनच कौशल्य मिळवावे लागते हे मला उमगले नि मी सर्व गोष्टींतले कौशल्य टिपू लागले. शेवटी कौशल्य नाही अशी गोष्टच व्यवहारात दिसेना, आणि म्हणूनच मी जे–जे मला सहज करता येत नव्हते, ते ते करण्याचा सपाटा लावला.

ज्ञानाच्या बाबतीत एक मौज असते ती अशी की त्यात शिळेपणा नसतो नि नित्य नूतन असे नेहमीच अभ्यासू मनाला शिकायला मिळते. 'पदे पदे यन्नवतामुपैति। तदेव रूपं रमणीयताया (पावलोपावली ज्याला नवता प्राप्त होत असते. तेच नवता पावणारे सौंदर्याचे रूप आहे) अशी सौंदर्याची व्याख्या आहे, ज्ञान व सौंदर्य दोन नाहीत. विद्येचा नवनूतनपणा फार विलोभनीय असतो; कुतूहल नवलाची भावना हा या रमणीयतेचा पाया असतो. जिज्ञासा नेहमी सत्याला हुडकत असते; विद्येच्या वाटेवर सत्याचा प्रकाश

असतो, तसाच गूढ अंधारही असतो. पहाटेला सामोरा जाणाऱ्या रात्रीसारखा तेजोगर्भ हा अंधार असतो. सत्य कुणाच्याच सहसा हाती लागत नाही; पण त्याच्या तिरिपातिरिपांतून प्रवासी वाटचाल करीतच राहातो. ठरलेल्या टप्प्यावर आले की सत्य गवसेल असे वाटते. पण त्या टप्प्यावर आल्यानंतर ते पूर्वीसारखेच अप्राप्य आहे असे दिसून येते. वाटसरूची जिज्ञासा, भ्रम, आशा व निराशा यातून मुक्तीच होत नाही. 'का, कसे आणि केव्हा' या तीन प्रश्नांच्या विचारणेची, स्वत:च्या अनुभवावर आधारलेली, इतरांच्या अनुभवाने संस्कारलेली पण मर्यादित दृष्टी घेऊनच तो निघालेला असतो. या प्रश्नात सर्व अडथळ्यांची गर्दी झालेली असते हे उघडच आहे.

अक्षरओळख कधी झाली ते आठवत नाही. माझ्यापेक्षा चार वर्षांनीच मोठा असा माझा एक काका होता. तो नेहमी आजारी असायचा. त्याला शिकवायला मास्तर येत. तिथे मी बसून राहायची. तिथेच मीही बसून बसून अक्षरे शिकले. पाढे शिकले. कविता शिकले. माझ्यापेक्षा वरच्या वर्गातला बराच अभ्यास मला असा पाहून पाहून माहीत झाला होता. त्यामुळे प्रत्यक्ष न शिकताच मी लिहायला नि वाचायला शिकले. माझा काका वसंत गावदेवीच्या मुलांच्या मराठी शाळेत जायचा. आमचे घर तिथून जवळच डामर गल्लीत होते. रोज गडबडीबरोबर ती शाळा मी पाहायची. आपण देखील त्याच्याबरोबर शाळेत जावे असे मला वाटे. पण वय पुरे सहा झाले नव्हते म्हणून घरची माणसे शाळेत पाठविनात. मी शाळेत जायचा हट्ट धरला. खाऊ, खेळणी कशानेच माझे समाधान होईना. आईशी रोज खटके उडू लागले. वडिलांशी, आजीशी भुणभुण सुरू झाली. 'पुढच्या दसऱ्याला तुला शाळेत घालू' हे आजीचे आश्वासन अपुरे वाटू लागले. घरी सारखी पाटी नि पहिले पुस्तक घेऊन बसू लागले. दसरा तर खूप लांब होता. माझा धीर सुटत चालला. शाळेत गेलेच पाहिजे असा छंद मनाने घेतला. एक दिवस दुपारी जेवून सारी माणसे झोपलेली असताना मी घरातून धूम ठोकली आणि शाळेत गेले. त्यावेळी मुलांची आणि मुलींची शाळा एकाच इमारतीत होती. मुलींची संख्या थोडीच होती.

वाडीत आम्ही तीन घरची वीस–पंचवीस मुली व मुले एकत्र खेळत असू. त्यामुळे शाळेत मुला-मुलींचे वर्ग वेगळे असतात हे माहीत नव्हते. मी शाळेत गेले खरी. पण तिथे शाळा म्हणजे एक मोठे मुलामुलींनी भरलेले दालन असते, ही माझी कल्पना खोटी ठरली. मुलांची शाळा खाली नि मुलींची वरच्या मजल्यावर होती. मी प्रथम मुलांच्या शाळेत गेले. शिपायाने विचारले 'तुला कोण हवं?"

"मी वसंत भागवतची पुतणी. मला शाळेत नाव घालायचंय,' तो हसला-'तू एकटीच आलीस?"

"हो."

"नाव घालायला मोठं माणूस कुणीच कसं नाही? तुझा वयाचा दाखला कुठं आहे?"

दाखला–बिखला काय प्रकरण आहे, वडील माणूस आपले नाव घालायला कशाला लागते ते मला कळेना, मी भांबावले. मग त्या शिपायाने मला मुलींच्या शाळेत मोठ्या बाईंच्या समोर उभे केले. "ही मुलगी एकटीच शाळेत नाव घालायला आली आहे," असे म्हणून तो गेला.

"तुझं नाव काय?" मी संपूर्ण नाव सांगितले नि म्हटले, "मला शिकायचंय. मला शाळेत घ्या."

"शाळेत असं घेता येत नाही. तुझ्या वडिलांची सही हवी"

मी गोंधळले. बाई–त्यांचे नाव शेगुलाबाई जोजेफ–म्हणाल्या, "तू पळून आलीस?"

मी 'हो' म्हटले.

"का?"

"मला घरातली माणसं शाळेत पाठवत नव्हती म्हणून एकटीच आले."

"तुझे वडील काय करतात!"

"माहीत नाही."

बाई आता चक्रावल्या. त्या म्हणाल्या "पण तुझा पत्ता काय?"

मी पत्ता सांगितला. त्या गप्पच होत्या. मग मी म्हटले, "माझा काका वसंत खालच्या शाळेत जातो."

"कितवीत आहे ?"

"चौथीत."

"तू बस इथेच," बाईंनी मला पाटीवर बाराखडया काढायला सांगितल्या. एका पुस्तकातला धडा वाचायला सांगितला. मी तो घडघड वाचला बाराखडया लवकर संपल्या.

तासाभरात काका वर आला. तो संतापून म्हणाला "तू इथं कशाला एकटी आलीस ? आता थांब, घरी सांगतो म्हणजे कळेल कसं काय ते."

बाईंनी त्याला प्रश्न विचारले. त्याने दिलेल्या उत्तरांनी त्यांचे समाधान झाले. एक चिठ्ठी लिहून त्यांनी त्याच्याजवळ दिली. "शाळा सुटल्यावर इथे येऊन हिला तुझ्याबरोबर घरी घेऊन जा" असे सांगितले. माझा धीर चेपला होता. मी बाईंना म्हटले, "मला चौथीत बसायचं आहे." बाई हसल्या, पण काही बोलल्या नाहीत.

इकडे घरी मी नाही असे पाहून मोठा कल्लोळ माजला होता. मी मुलखाची आडदांड होते. त्यामुळे ही विहिरीत पडली; का कुठे गाडीखाली सापडली या चिंतेने घरची माणसे बेजार झाली होती. माणसे चारी दिशांनी शोधीत होती. पाच वाजता आमची स्वारी काकाबरोबर हर्षोत्फुल्ल होऊन घरी आली. आईला, "मी शाळेत नाव घालून आले" असे सांगायची अगदी घाई झाली होती. पण घरचा देखावा पाहून उत्साह पळाला. आईने मनगट धरले. "काय ग, कुठे गेली होतीस ?" म्हणून दरडावले. हात वर झाला. इतक्यात माझा मोठा काका पुढे झाला. त्याने आईकडून मला ओढून घेतली आणि उचलून धूम ठोकली–आजीच्या जवळ मला देऊन तो म्हणाला, "आई, वहिनीला दुर्गाला मारू देऊ नकोस. ती काही कुठे खराब काम करायला गेली नव्हती."

आजीचे माझ्यावर फार प्रेम होते. ती स्वतः फार बुद्धिमान आणि विद्येची चाहती होती. शिकलेलीही होती. तिने मला म्हटले "दुर्गे, तुझ्या

खोड्या थांबणार तरी कधी? काय जीव टांगणीला लावलास ग?"

आता माझे अवसान वाढले. मी रुसून तिला म्हटले, "मग मला तू शाळेत का नाही घातलंस?"

तितक्यात आजोबा आले. ते म्हणाले "हो, चूक आमचीच. जाऊ दे ग ही पीडा उद्यापासून शाळेत. म्हणजे निश्चित एका जागी तरी बसेल. उत्पात नकोत." 'उद्यापासून शाळेत जायचे' हे ऐकून माझा आनंद गगनात मावेना. मी त्यांच्याकडे गेले नि म्हणाले 'बाबा मला शिकवा, मी शाळेत जाईन."

मात्र दुसऱ्या दिवशी रीतसर शाळेत जाणे झाले. दोन दिवस हट्ट करून मी चौथीत बसले. पण समजूतदार शेगुलाबाईंनी मला गोडीगुलाबीने तिसऱ्या दिवशी पहिलीत बसविले. मी तक्रार न करता बसले. अशा रीतीने शालेय जीवनात माझा प्रवेश झाला आणि अभ्यास सुरळीत चालू झाला. मुलींशी माझी कधी भांडणे झाली नाहीत. सर्वांशी मिळूनमिसळून वागणारी म्हणून मला शाळेत ओळखत. मराठी चौथीपर्यंत शाळेतले शिक्षण मुंबईत झाले. मध्यंतरी आई वारली आणि आम्ही दोघी बहिणींनी आत्या–नाशिक, नगर इथे मुलींच्या इंग्रजी माध्यमिक शाळेवर मुख्याध्यापिका होती, तिच्याजवळ राहून मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण तिच्याजवळच घेतले.

मराठी म्युनिसिपालिटीच्या शाळेतली पहिली दोन वर्षे फार सुखाची गेली. सर्वांना एकच शिक्षण होते. एकच तऱ्हेची जाणीव होती. ही मुलगी हिंदू, ती ख्रिस्ती असा भेद या शाळेत नव्हता.

पण तिसरीत आल्यावर आम्हा मुलींना सेंट कोलंबोत घालण्यात आले. ही शाळा उत्तमच. पण तिथे आल्यावर बालपण मावळू लागले हे खरे. निदान माझ्या संवेदनाशील मनाला खूप बौद्धिक संघर्ष या जगात आहे याची चांगलीच जाणीव या शाळेत झाली. महापालिकेच्या शाळेत प्रार्थना असे. पण ती आमच्या सर्वांच्या परिचयाची. पण या ख्रिस्ती शाळेत नवी रिव्रस्ती प्रार्थना झाली. बायबलचे वर्ग सुरू झाले. आतापर्यंतची माझी धर्मधारणा पुराणे नि महाभारत–रामायणातल्या कथांवर, देवळातल्या देवांवर,

आजीच्या देवघरातल्या देवांवर आधारलेली होती. अनेक अभंग, स्तोत्रे, आरत्या नि पदे यांनी त्या धारणेभोवती भावनांचे नाजूक वलय निर्माण केले होते. ईश्वराचा प्रखर न्याय व कोवळे वात्सल्य संवेदनेत साकारले होते. पण ख्रिस्ती शाळेतल्या प्रार्थनेने अनेक विचार मनात उमटू लागले. अनेक परिवर्तने घडली. त्यांचे वर्णन 'पैस' मधल्या 'ख्रिस्त–संगत' या लेखात मी केले आहे. परंतु त्यातला काही भाग मिशनरी शाळेतल्या ख्रिस्ती संस्कारांचा आहे, तो इथे पुनरुद्धृत करण्यास हरकत नाही. कारण परकी धर्मशिक्षण पद्धती आणि माझ्या वैयक्तिक क्रिया व प्रतिक्रिया त्यात मूर्त झालेल्या आहेत.

"येशूची शाळेत ओळख झाली. 'तारक' देवाबद्दल प्रथम ऐकले. पापाचे भय तिथून उत्पन्न झाले. मानवांच्या पापाकरता स्वतः मरून देवाजवळ क्षमा मागणारा येशू श्रवणी आला आणि मग पापाच्या जाणिवेची मुळे मनभर पसरली. पापावर उपाय काय? कसले भयंकर पाप? भावंडांशी भांडण, मित्रमैत्रिणींबरोबर मारामारी, सफरचंद वगैरे चोरून खाणे, वडील-धाऱ्यांना दुरुत्तरे करणे, वर्गात अभ्यास चालला असताना दुर्लक्ष करणे, कॉपी आजोबांकडून लिहून घेणे, लंगडया–आंधळ्या भिकाऱ्यांची टिंगल करणे इत्यादी पापांची जंत्री शाळेच्या प्रार्थनेच्या वेळी उभी राही. प्रार्थना मला आठवते ती अशासारखी: "हे आमच्या आकाशातील बापा...जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझे राज्य येवो! आमची आजची भाकर आज आम्हाला दे" इत्यादी.

"मला स्वतःला माझा पृथ्वीवरचा बापच फार आवडत असल्यामुळे आकाशात किंवा स्वर्गात कुणी बाप असेलसे कधी मनातून वाटायचेच नाही. इथे येशू, त्याचा बाप व मी यांच्यामध्ये अंतर उत्पन्न झाले. पापांचे भय मनात चुळबुळत असताना, बाई पवित्र शास्त्रातल्या गोष्टी सांगत, त्या आठवत आणि इतक्यात 'भाकरी' आली की हिचे काय काम असे आकाशातल्या देवाच्या प्रार्थनेत वाटायचे; पण घरच्या देवाचा नैवेद्यही मग आठवे. देव व अन्न जवळ जवळच असायचे हा संकेत मग मनात उमटला.

" मात्र शाळेतली प्रार्थना संपली की हायसे वाटे. पण रात्री झोपण्याची वेळ झाली की मग फिरून प्रार्थनेचे कर्तव्य आठवे. ती प्रार्थना शाळेतली नव्हती. माझीच होती. पण निवेदनात्मक होती. ती एक बोलकी दैनंदिनी होती. एका अनामिक, दयाळू पण पापाची दखल घेणाऱ्या देवाला सांगितलेली."

ही झाली प्रत्यक्ष धर्म-संस्कारांची एक छोटी कहाणी. पण समग्र इंग्रजी राज्यातल्या शिक्षणामुळेच कुठेही पाहा शिक्षितांवर झालेले संस्कार ख्रिस्तीच आहेत. हा विषय फार उद्‌बोधक आणि अभ्यासनीय आहे. परंतु तो फारच मोठा असल्याने त्याचा केवळ उल्लेखच करून तो सोडलेला बरा.

परंतु ख्रिस्ती धर्मशिक्षणाच्या बाबतीत एक गोष्ट अवश्य सांगावीशी वाटते. ती म्हणजे आमच्यासारख्यांच्या घरी राष्ट्रीय भावना जागृत असल्यामुळे माझ्या अख्रिस्ती मनाला येशू आवडलेला असला तरी ब्रिटिश साम्राज्यशाहीशी त्याचे अतूट नाते असलेले पाहून माझे वाढीस लागलेले मन बंड करून उठले. साम्राज्यशाहीची कट्टर वैरी मी बाळपणापासूनच होते आणि म्हणून ख्रिस्त या साम्राज्याचा धर्म-प्रतिनिधी बनलेला पाहिला नि मनाला मोठा धक्का बसला. या धक्क्याने मला सावध ठेवले. तेव्हापासूनच धर्मभावना पारखायची प्रवृत्ती निर्माण झाली.

एवढाच परिणाम दोन भिन्न धर्मांतली स्वाभाविक प्रतिक्रिया म्हणून होता, तरी हरकत नव्हती. परंतु टिळकांच्या मृत्यूनंतर एकोणीसशे एकोणीसपासून भारतातल्या राष्ट्रीय राजकारणाने क्रियाशील दिशा धारण केली. 'क्रॉनिकल' पत्र मुंबईत निघाले. आमच्या घरात 'टाइम्स' बंद झाला. स्वदेशीची चळवळ घरात शिरली. आमची आई एकोणीसमध्ये वारली. तेव्हापासून वडिलांनी आम्हाला विलायती कपडे मिळणार नाहीत असे सांगितले. फटाके बंद झाले. तोपर्यंत आम्ही विलायती मलमलचे सुंदर फॅशनेबल कपडे वापरीत होतो, सुरेख मोजे, बूट, रिबिनी आम्ही मुली वापरीत असू. एका दिवसात ही सारी ऐट गेली. जुने कपडे फाटायला वेळ किती लागणार? मी तर कपडे जबर फाडणारी. तेव्हा गिरण्यात तरी

चांगले कापड कुठे निघत असे ? वडिलांनी मांजरपाटाचे तागे घरात आणून टाकले. आम्ही मांजरपाटाचे स्वदेशी कपडे घालू लागलो. मँचेस्टरच्या कपड्यात आमच्या शेजारची मुले वावरत होती. सेंट कोलंबोतल्या मुली तर उघड 'उच्च' मध्यमवर्गीय. त्या कशा वाईट कपडे घालतील ? शाळेत आम्ही बहिणीच कपड्यांच्या बाबतीत अपवाद ठरलो. मुली हिणवीत, टोचून बोलत. पण आम्हाला त्याचे काही वाटले नाही. कारण गांधींवर आजूबांचा लोभ जडला होता. 'क्रॉनिकल'ने धर्मपोथीचे रूप घेतले होते. आम्ही नवधर्म शिकत होतो. त्यामुळे आजूबाजूच्यांचे टोचून बोलणे म्हणजे आमच्या श्रद्धांना मिळणारे खतपाणी होते गेले. मात्र त्यामुळे राजकारणी संघर्षाची जाणीव शाळेत होत राहिली आणि ख्रिस्ती शाळा राजकारणी शत्रूंच्या शाळा वाटू लागल्या. सेंट कोलंबोत मन रमेना. पण परिस्थितीनेच तिथून आम्हाला बाहेर काढले आणि मुंबई महानगराच्यापासून दूर असलेल्या, गांवढळ्याने वेढलेल्या लघुनगरात पाठवले. पण इथे या राजकीय दुभंगाला विराम मिळाला नाही. वेगळ्या दिशेने पण अधिक तीव्र रूपाने तो वावरतच राहिला. नव्हे तेव्हापासून सुरू झालेली ही आपल्या राजकीय अस्तित्वाची जाणीव या ना त्या रूपाने पुढे सतत वाढतच गेली; राजकीय अस्तित्वाच्या जाणिवेत संघर्ष आपोआपच येतो. कारण त्यात पूर्वेतिहास, धर्मसंप्रदाय, जातीपाती, राजकीय पक्षकारण, आंतरराष्ट्रीय राजकारण सारे काही येते, ही सारी दुभंग असलेली दालने आम्हाला शाळेतच खुली झाली. सामाजिक असमाधान त्यातून वाढीस लागले आणि आत्मसंतुष्टता कायमची गाडली गेली. आमच्या कृती, भावना यांना मर्यादा होत्या. यशही अगदीच नव्हते असे नाही. पण राष्ट्रीय चळवळीमुळे आणि गांधींच्या नेतृत्वामुळे आत्मसंतुष्टता मात्र बाधू शकली नाही, हा माझा सर्वात मोठा लाभ झाला. पण त्यामुळे मन सतत अस्वस्थ राहिले. शंकित राहिले. स्वतःला छेडीत, चिरीत राहिले आणि अखेर ही अस्वस्थता स्वभावाचा एक स्थायी भाव होऊन बसली.

आमची शाळा सरकारी होती, शिक्षकवर्ग खरोखरच चांगला होता.

विद्यार्थिनी उत्साही पण परंपरेला जखडलेल्या होत्या. जातीचा अभिमान प्रत्येकीला उदंड होता. जात कळत नव्हती आम्हाला–मुंबईत सुधारकी वळणात वाढलेल्यांना. नगरला शाळेचे दोन शिपाई होते. एक ब्राह्मण नि दुसरा मुसलमान. त्यात मुसलमान शिपाई फार चांगला होता. शाळेत आमचा डबा तो घेऊन यायचा. पाण्याची पिशवीही आणायचा. प्रथम मुसलमान शिवलेले अन्न आमच्याबरोबर खायचे मुली टाळीत. नावे ठेवीत. पण पुढे त्याही रुळल्या. शाळेतली रोटीबंदी साफ तुटली. त्यामुळे शाळेत आमचा वेळ आनंदात जाई.

नगरच्या शाळेत एक नवे मास्तर आले. डोकीला पागोटे, पघळ कोट नि भोंगळे धोतर नेसणारे. डोळ्यांना चष्मा नि वर पाहात चालणारे, तोंडात अभद्र शिव्या. वर पाहून चालताना रोज कुणा तरी मुलीवर आदळायचे नि मग तिला शिव्या द्यायचे. मनाचे फार कनवाळू पण शिकवण्यात ढिले. त्यांचा तास अघळपघळ गप्पांचा असे. बायको फार सुग्रण आहे. रोज नवे नवे खमंग पदार्थ करते. सुगृहिणी आहे, पण त्यामुळे आपले पोट कसे बिघडते वगैरे गोष्टी ते गावरान भाषेत सांगत, ते ऐकून आम्ही खो खो हसून वर्ग डोकीवर घ्यायच्या. मग आत्या यायची नि मुलींना दम भरून जायची. चुकून मास्तरांना कविता शिकवण्याची लहर यायची. मग कठीण शब्दांचे अर्थ ते विचारीत. आम्हाला मोरोपंतांचे सावित्रीआख्यान होते. मास्तर शिकवीत होते.

'फल मूलार्थ निघे पति त्यासी म्हणे मजसि सत्तमा न्या हो.'

ही ओळ आली. मास्तर मला म्हणाले 'भागवत, सत्तमा याचा अर्थ काय?' मी सांगितले, 'उत्तमोत्तम.' अर्थकोशाप्रमाणे बरोबर होता. पण तो इतका काटेकोर बरोबर होता म्हणूनच मास्तर भडकले. 'अग कार्टे, वकिली करून मला अर्थात पकडू पाहातेस काय? पुष्कळ अर्थ बरोबर असले तरी खरे नसतात आणि खरे असले तरी उचित नसतात. सांग नवऱ्याशी कसं बोलायचं असतं?'

'मला काय ठाऊक.'

'अग कारटे, एवढी घोडी झालीस तर अजून तुला साधी रीती-भातीची गोष्ट माहीत नाही ? सांग कार्ल्याची भाजी कशी करतात ?'

'मला नाही येत.'

'हं, कार्ल्याची भाजी येत नाही ना. मग वधूपरीक्षेत कसली उतरतेस ! रीत लावायला घरात आहेच कोण--आई मेलेली नि आत्याबाई तर नोकरी करणाऱ्या.' मास्तरांनी आत्याच्या अविवाहितपणाचा उल्लेख नाखुशीने टाळला होता हे मला कळले. वर्गातला हशा थांबला आणि वातावरण स्तब्ध झाले. मास्तरांनी दोन्ही हात गालावर टेकले. ते म्हणाले, 'मुलींनो, आमच्या वेळी तुमच्या एवढ्या पोरींना पोरं होत असत. आता तर तुमच्या लग्नांना पत्ता नाही. आचारच बिघडलाय. पण पोरींची जात, अग लग्न तर व्हायलाच पाहिजे ना. असं पाहा, लग्न केल्यावर सासू सासरे राहिले, पण नवऱ्याचा तर मान राखता आला पाहिजे ? मला फार फार काळजी वाटते तुमची. मीही मुलीचा बाप आहे. नुकतीच तिला उजवून मोकळा झालो, पण चाल कशी आहे तिची, बघावं नि तोंडात बोट घालावं. पण तुमच्यापुढे कशाला सारं सांगायचं. गाढव गेलं तीर्था म्हणतं कालचा गोंधळ बरा होता. राहावत नाही. सावित्रीचं आख्यान आहे म्हणून सांगतो. सांगा नवऱ्याशी कसं बोलावं मुलीने ?' आता वर्गात फिरून अवखळ वातावरण आले. मुली फिसफिसल्या. आम्ही म्हणालो, 'सांगा ना मास्तर नवऱ्यापाशी कसं बोलायचं ते.'

मास्तरांनाही आता स्फुरण आले होते. ते म्हणाले, "ऐका, वाया नाही जायचं ऐकलेलं. सावित्री सत्यवानाला म्हणाली, 'ऐकले का गडे आपल्याबरोबर मलाही आज वनात न्यायची होती. पण तुमच्यासारख्या कारट्या काय म्हणतील ठाऊक आहे ? त्या म्हणतील 'अहो चला, आज स्वैपाकाचा कंटाळा आला आहे. चला सिनेमाला जाऊ नि खानावळीत जेऊ." आता मुलींचा हशा अनावर झाला. वर्गातल्या आरडाओरड्याला सुमार राहिला नाही. आत्या नेहमीप्रमाणे आत आली. मास्तरांकडे तिने नुसते पाहिले. मुलींना खूप रागावली नि मला उभे राहाण्याची शिक्षा

देऊन निघून गेली.

मास्तर खूप वरमले नि चिडले. ते म्हणाले, "काय कारट्यांचा गोंधळ तरी, योग्य ते शिकायला नको. बुकं शिकून का संसार होतो ? बस ग कार्टे खाली. नुसता कल्लोळ करता. शिकवू पण देत नाहीत शिंच्या. काय रीत लावायची तुम्हाला ? ब्रह्मदेवसुद्धा पुरायचा नाही अशा पोरट्यांना आळा घालायला !" मुली फिरून फिसफिसू लागल्या. "ऐकलं का गडे" "ऐकलं का गडे" एक सुरात पण खालच्या आवाजात चालू झाले. मास्तर भडकून उठले नि म्हणाले, "मरा, मरा कारट्यांनो, तुमची मसणवट त्या कोपऱ्यात आहे.' इतक्यात घंटा झाली. आम्ही खो खो हसत बाहेर पडलो.

घरी आल्यावर आत्याने मला विचारल 'त्या मास्तरांच्या तासाला वर्ग डोकीवर घेणे तुम्हाला शोभतं का ?"

मग मी सारी हकीकत सांगितली. तशी तीही पोट धरून हसू लागली. पुढे मास्तरांची बदली नाशिकला झाली. ती मुलांच्या शाळेत. सहावीत मी नाशिक हायस्कूलमध्ये गेल्यावर मास्तर एकदा मला सांगू लागले, "काय ग सोन्यासारख्या पोरी होता तुम्ही. नाही तर ही नाशिकची भिकार कारटी, दुनियेत अशी पोरं पाहिली नाहीत कुठं."

मास्तरांचे हे चित्रण मी उगीच हंशा पिकवण्यासाठी दिलेले नाही; कारण त्यांचे उद्‌गार व त्यांचा 'उपवर' मुलीकडे पाहाण्याच्या दृष्टिकोन वैयक्तिक नसून प्रातिनिधिक स्वरूपाचा होता. मुलगी व प्रौढ स्त्री यातला फरक पन्नास वर्षांपूर्वीचा समाज जाणत नसे. 'कन्या धन परक्याचे' ही जाणीव आईबापांच्या हृदयात मुलीच्या जन्माबरोबरच सहस्र सुयांनी गोंदलजात असे आणि समाज ते गोंदणे जोजवीत असे. अजूनही जोजवायचे थांबी लेला नाही. 'ज्याच्या पदरी लेकी त्याच्या घरी पाप' ही म्हण घरी कुणी उच्चारली नसली, तरी आम्ही मुलींनी शेजारी–पाजारी, आले–गेले यांच्या तोंडून सहस्र वेळा ऐकलेली आहे. मुलीचे वाढते वय ही घोर आपदा होती. त्यामुळे मुलगी ही मुलगी म्हणून नव्हे तर जाचापुढे टिकाव धरू शकणारी सून

म्हणूनच जणू जन्माला यायची. तिला पोरपण नसे; व्यक्तित्वही नसे मग व्यक्तिमत्व तर राहिलेच. जन्मत:च ती कुणातरी 'वरा' ची सावली गणली जायची. मास्तरांप्रमाणेच वधूपरीक्षेकरताच तिचे गुण, तिचे कौशल्य असे. किती तरी जणांनी आम्हाला विचारावे. "तुम्हाला भात तरी करता येतो का?" एकांनी विचारले, "श्रीखंड पातळ झाले नि पाहुणे दारी आले आहेत तर काय कराल?" पण कुणी असे विचारले नाही की तुम्हाला शिवण किती येते? गाणे येते का? चित्रकला येते का? वाचनाची कितपत आवड आहे? व्यायाम करता का? मीठ, मिरची, मेतकूट, साखरभात, पुरण-पोळी, लोणचे, पापड यांच्याबद्दलचेच सारे प्रश्न उघड वधूपरीक्षेतले होते. कुणी तर त्याच्याही पुढे जाऊन विचारीत. "सुधारक, जातपात मानीत नाही. पण महिन्याच्या महिन्याला बसता तरी का? विटाळ तुम्ही पाळीत नाही म्हणून विचारले." आता या चौकसपणाला काय म्हणावे? अशा प्रश्नांचे नाशिक हे आगर. सनातनी, क्षेत्राचे गाव. तिथल्या स्थायिक मंडळींना सोईचे. पण बाहेरून आलेल्या आमच्यासारख्या हंगामी निवाश्यांना एकंदरीत तापदायकच.

याचा परिणाम एकच झाला की गृहकृत्यात आपण दक्ष असावे हा संदेश आम्हाला आमच्या आत्याने दिला. 'मुलींनो चोळीला आणि पोळीला कुणाला महाग होऊ नका' असे ती वारंवार म्हणायची. अकराव्या वर्षापासून स्वत:चे कपडे जुन्या कपड्यांवरून स्वत: हाताने शिवायला ती लावायची. आठवड्यातून एकदा स्वैपाक करावा लागे. पंधरा दिवसांतून एकदा आपापले धुणे धुवून वाळत घालायचे नि महिन्यातून एकदा भांडी घासायची अशी तिची शिस्त होती. आम्ही म्हणायच्या, "सिताबाई, आमच्या बरोबरच्या मुली हुंदडतात नि तू मात्र आम्हाला स्वैपाक करायला लावतेस ना." ती गंभीरपणे म्हणायची, "अग तुम्हाला आज समजत नाही. पण उद्या तुम्ही लग्न करून सासरी गेलात आणि काम नीट करता आलं नाही, तर सासरची माणसं म्हणतील ना की आत्याने स्वत: लग्न केलं नाही नि भाच्यांना उनाड ठेवलं. सवय ठेवली तर कामाचा कंटाळा येत नाही. उरक

येतो. स्वैपाक तुम्ही वाटेल तो करा. बदामाचा शिरा करा नाही तर भाकऱ्या करा. पण सारं काही करता आलं पाहिजे. घरकामसुद्धा विद्याच असते बरं." आणि सांगायचा मुद्दा असा की चवदाव्या वर्षी मी पुरणावरणाचा स्वैपाक व शिवण चांगले करू लागले.

नाशिकला प्रथम माझी आत्या गेली, त्यावेळी आजोबा व आम्ही फिरायला जात असू. प्रौढ पदवीधर कुमारिका नाशिक गावाला अपरिचितच वस्तू होती. बायकांनी फिरायला जाणे तर त्याहून अप्रशस्त समजले जात असे. त्यामुळे अनेक सनातन्यांनी आमच्या घरावर कूर्तकोटीमार्फत बहिष्कार घालायचे ठरवून एक पत्रकही तयार केले होते. पण कूर्तकोटींनी अखेर सही दिली नाही. तेव्हा पत्रक व बहिष्कार स्थगित झाला.

माझ्या आत्याने आम्हाला संसारकृत्यात दक्ष केले, त्याबद्दल तिचे मानावे तेवढे उपकार थोडेच होतील. तरी पण आता मागे वळून पाहता यातल्या बऱ्याच गोष्टी माणसाच्या चारित्र्याच्या घडणीला कारणीभूत असल्या तरी त्या मागची तीव्र व्यथा आता समजते. आत्याचे बोल त्यावेळी साधे वाटले. पण आता तिच्यासारख्या रूप, विद्या, गुण, कर्तृत्व या दृष्टीने शेकडो पुरुषांपेक्षा श्रेष्ठ असलेल्या स्त्रीला, ती केवळ स्त्री व त्यातल्या त्यात अविवाहित म्हणून एक प्रकारे सामाजिक दडपणामुळे जो मुका मार सहन करावा लागला त्याची ती साक्षच वाटते. त्यानंतर पन्नास वर्षे उलटली. अविवाहित कर्तबगार स्त्रियांची संख्याही वाढली. तरी समाजाच्या दृष्टीत फारसा फरक पडलेला नाही, हे मलाही भल्या भल्या तार्किकांची अविवाहितपणावरची भाष्ये जी ऐकायला मिळाली आहेत त्यावरून सहज कळून येते, सासुरवाशिणीपेक्षाही सासुरवाशीण होऊन सर्व बाजूंनी केवळ कष्टांचा डोंगर उचलीत, अनेक सहज सुखांचाही त्याग करून, समाजाला आपल्या सच्चारित्र्याची प्रकट ग्वाही देत सीताबाईसारखीला जगावे लागले याची खंत मला होते. नीतिअनीतीचा दारुण संघर्ष तिच्या मनात सतत चालू असावा असे तिच्या एका उद्‌गारावरून मला वाटते. ती म्हणायची, "आपण चांगलं वाटतं ते कितीही कसोशीने आचरणात आणलं, तरी देवाच्या

दृष्टीने ते चांगलं असेल का ?" अत्यंत क्षुद्र गोष्टीही फार तत्परतेने करण्यात सीताबाईसारख्या स्त्रीची मोलाची शक्ती, चारित्र्यपालनाबद्दल स्त्रीच्या, कुमारिकेच्या संदर्भात समाजाने अनुदार दृष्टी बाळगल्याने वाया गेली असे मला वाटते. हे नैतिक, विशेषत: मानीव नैतिक ताण असे असतात की त्यांच्याबद्दल उघड बोलताही येत नाही, मग त्यांच्याशी मुकाबला करणे तर दूरच राहिले, पक्ष्यावर घारीची सदा दृष्टी, तशीच समाजाची अशा स्त्रियांवर असते. त्यांच्या कपाळावर पतितेचा छाप मारायची खूप उत्सुकता त्याला असते. तो मारता आला नाही तर अशा स्त्रिया 'नीरस' ठरतात. पुरुषाच्या भोगाला ज्या स्त्रीचा उपयोग नसतो, तिला जणू समाजात मानाने जगण्याचा हक्कच नसतो. बुद्धिमती, शीलवान स्त्रीचे स्वतंत्र व्यक्तिमत्व ही अत्यंत रक्षणीय नि वांच्छनीय वस्तू असते. अद्यापही स्त्रियांच्या शिक्षणात नि चारित्र्यसंवर्धनात स्वतंत्र व्यक्तिमत्वाचे तेज हवे तसे उदित झालेले नाही. बहुतेक स्त्रियांची शक्ती नको त्या क्षुद्र गोष्टींशी झगडण्यातच खर्ची पडते.

राष्ट्रीयतेच्या जाणिवेचा आंतरिक ताण आणि तिच्याबरोबर सरकारी यंत्रणेशी जुळवून घेण्याचा दुसरा ताण यातून एक मानसिक संघर्ष आमच्या पिढीत अनेकांनी अनेक तऱ्हेने भोगलेला आहे. शाळेत त्याचाही प्रत्यय आला. माधव ज्यूलियन यांची 'दोन विभूती' ही कविता प्रथम मला वाटते 'ज्ञानप्रकाशा'त छापून आली होती. आत्याने ती कविता आम्हा बहिणींना दाखवून तिची फार स्तुती केली.

तो ठाकूर रवींद्रनाथ चढला साहित्य सम्राट्पदा
गांधी मोहनदास तो येशूपरी आपदा

या दोन ओळींनी मला मंत्रमुग्ध केले. मी ती कविता लिहून काढून पाठ करून टाकली. त्याच वेळी गांधी फार मोठी शिक्षा होऊन कारागृहात होते. प्रभातफेरीत रोज कुणीतरी म्हणायचे,

'खादि वापरा देश उद्धरा फकिरी देशासाठि करा

कारागृहि गांधी महात्मा सांगुनि गेला मंत्र बरा.
देशाचे ऋण फेडायाला मार्ग असे हा अजि साधा'

इत्यादी

सावरकरांचे घरच नाशिकला होते. नाशकात त्यांच्याबद्दल अतीच भक्ती होती. लोकमान्य टिळक गेल्यानंतर जहाल गटातल्या राजकारण्यांचे प्रीतिस्थान व आशास्थान सावरकरच होते. सावरकरांचे 'कमला' काव्य, त्यांचा सिंहगडचा पोवाडा मला फार आवडत. पोवाडा काकाने नकलून बंगलोरहून पाठवला होता. आक्षिप्त वाङ्मयात त्याची सरकारने नोंद केल्यामुळे आम्हाला तो गीतेसारखा वाटायचा. सावरकरांच्या कविता मी मुखोद्गत केल्या होत्या. पण पोवाडा त्यात सर्वात सरस वाटायचा. कारण हरि नारायण आपट्यांच्या कादंबऱ्यांतले शिवाजी-तानाजी-जिजाबाई त्या पोवाड्यात सजीव होऊन उठले होते. मरूनही तानाजी जिवंतकळेचे वीर-प्रतीक ठरला होता. गाऊन आनंद व्यक्त करता येतो त्याप्रमाणेच गाऊन क्षोभ व राष्ट्रक्षोभही व्यक्त करता येतो. हे मी तो पोवाडा गाता-गाता शिकले. देशभक्तीचे रोमँटिक वलय सावरकरांच्या कवितांनी मनात निर्माण केले. एक महान् रोमँटिक राष्ट्रभक्तीपर कादंबरीच गाण्यांच्या रूपात मनात निनादू लागली. पण गांधी रोकडे, रुक्ष सत्य घेऊन आले आणि ही कल्पिताची मोहिनी उतरली. गांधींची खादी, त्यांचा झाडू, त्यांचा तो केवळ नग्नता झाकण्यापुरताच असलेला पोशाख, स्वत:ला भंगी म्हणून घेणे, चित्त-रंजनदास, मोतीलाल, टागोर, राजाजी इत्यादी देशभरच्या बुद्धिवंत बलिष्ठांना आपल्या विचारधारेत खुशीने सामील करून घेणे; स्वैपाक करणे, धुणे, भांडी घासणे, शुश्रूषा करणे, सुंदर लिहिणे, देवाने दिलेल्या वेळेचा क्षणही फुकट न घालवणे, प्रार्थनेला आणि प्रार्थनेप्रमाणेच विनोदाला जपणे, भारतातल्या सात लाख खेड्यांकडे लोकांचे लक्ष वेधणे, प्रिन्स ऑफ वेल्सच्या स्वागतावर जाहीर बहिष्कार घालणे, प्रतिपक्षाबद्दल लिहिताबोलताना संयम-पूर्ण व आदरयुक्त भाषा वापरणे; स्त्रियांना उघडपणे राजकारणात भाग घ्यायला लावणे, थोडक्यात म्हणजे सुशिक्षितांनी वेडगळ मानलेल्या 'अहिंसे'-

सारख्या वेडगळ गोष्टी मानणे व करणे आणि त्या वेडाचा जादूसारखा उपयोग करून भल्या-भल्यांना वेडे करणे हे अतिडोळस वेडेपण गांधींच्या रोजच्या बोलण्यातून, करण्यातून आम्ही रोज पाहात होतो. आता आम्ही गांधीमयच झालो होतो.

प्रिन्स ऑफ वेल्स एडवर्ड भारतात आले, त्यावेळी गांधींनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला हे वर्तमानपत्रात त्यादिवशी आलेच. पण बहिष्काराविषयीच्या वार्ता अगोदरपासूनच येत होत्या. आमच्या नगरच्या शाळेत त्या दिवशी खाऊ आणि चांदीची पदके वाटण्यात येणार होती. आम्ही मुले शाळेच्या आवारात जमलो. आत्याला ब्रिटिश साम्राज्याच्या प्रशस्तीचे नि युवराजांच्या शुभागमनाच्या सुवार्तेचे भाषण करावेच लागले. केवळ पाच मिनिटांत तिने हे कृत्य आटपले. तिचा चेहरा सुकला होता. बापुडवाणा झाला होता. आम्हाला खाऊच्या पुड्या दिल्या. पदक दिले. मला आठवते की तो पुडा मी आणि दुसऱ्या काही मुलींनी तिथेच मातीत पायाखाली तुडवला. पदक फेकून दिले. एखाद्या अपवित्र वस्तूच्या विटाळातून सुटल्याचा आनंद क्षणभर झाला. पण मनाला समाधान झाले नाही. घेतल्याची ओशाळगत मिटेना. घरी आल्यावर पाहिले तर आत्या गप्पगप्पच होती. तिच्या उदासीनतेचे कारण स्वतःच्या नाडीवर बोट ठेवून सुद्धा समजत होते. आमच्या व्यथा एकच होत्या.

नगरच्या ख्रिस्ती शाळांत एक गाणे त्यावेळी खूप लोकप्रिय झाले होते.

'प्रेमाचे राज्य नांदो हे मंगल हो
साम्राज्याच्या कीर्तिसुमाचे
विकसन हो जन सुखि राहो.
मंगल हो;' इत्यादी.

मुलींना त्याची चाल आवडे. त्या नेहमी ते गुणगुणत. पण ते गाणे मला विषवत् वाटले आणि त्यावर उतारा म्हणून 'वंदे मातरम' चे संस्कृत भाषांतर 'वंदे त्वां भूदेवी मार्यमातरम' हे गाणे पाठ करून टाकले. नगरला

ख्रिस्ती व मुसलमान समाज मोठा असल्यामुळे राष्ट्रीय उद्रेक तीव्र नव्हता. पण नाशिकला आलो तर वातावरण खूपच तप्त होते,

सावरकर मुक्त झाले त्या दिवशी नाशिकची जनता आनंदात डुंबली. त्या दिवशी थिएटरात त्यांच्या फोटोचा सत्कार झाला. आत्या स्वतः सरकारी नोकर असल्याने येऊ शकली नाही. परंतु तिने आम्हाला जायला सांगितले. त्या दिवशी मला पुन्हा तिच्यातला तो विषाद फार जाणवला.

एकदा नाशिकलाच गांधींची सभा घाटावर होती. भाषण झाल्यावर कस्तुरबा लोकांत फिरल्या व त्यांनी दागिन्यांची मागणी केली. दागिन्यांचा त्याग केलेल्या त्या सौभाग्यमंडित वृद्धेला नाही म्हणवेना. मी हातातल्या दोन बांगड्या व सर्वात धाकट्या बहिणीने आंगठी त्यांना दिली. हसून शाबासकी देऊन कस्तुरबा गेल्या. ती शाबासकी आम्हाला धन्यतेची वाटली इतक्यात तिथे असलेल्या शाळेतल्या एका बाईंना हे कृत्य आवडले नाही. त्यांनी मना केले तरी आम्ही त्यांना जुमानले नाही. त्यांनी घरी येऊन आत्याला सांगितले.

आत्या गप्प होती. बाबा (आमचे आजोबा) काय म्हणतील याची काळजी तिला होती. ती म्हणाली, "जे तुम्ही दिलं ते तुमचं नव्हतं. बाबांना विचारून द्यायला पाहिजे होतं."

आजोबा म्हणाले 'हलवायाच्या घरावर तुळशीपत्र.' इथेच सारे थांबले. पण त्या दिवसापासून दागिने आपले नव्हते हे कळले नि दागिन्यांबद्दल एक प्रकारे उबग आला. जे आपले नाही ते घालूच नये असा विचार बळावत चालला. तेव्हापासून अलंकरणाबद्दलची उदासीनता एक स्वभावधर्मच बनून गेली. आर्थिक स्वातंत्र्याच्या जाणिवेचा पाया या घटनेने घातला गेला.

राष्ट्रीय आंदोलनामुळे झालेल्या द्विधा मनःस्थितीचे एक उदाहरण आठवते. स्काऊटची संस्था जुनी झाली होती. पण गर्ल गाईड मला वाटते तेवीसनंतरच निघाली असावी. निदान नाशिक–नगरच्या नव्याने काढलेल्या मुलींच्या शाळांत गर्ल गाइड सुरू करण्याची कल्पना आमच्या डोळ्यादेखत सुरू झाली. प्रथम शिक्षकांना ट्रेनिंग देण्यात आले. माझ्या आत्याला त्या

कँपला जावे लागले. ती परत आली तो उदास होऊनच. शाळेत वर्ष उलटायला आले तरी तिने गर्ल गाईड सुरू केले नाही. इन्स्पेक्टरनी जाब विचारला. त्यावर तिने उत्तर दिले की, "काटकसरीची शिकस्त करूनही मला कपड्यांचा खर्च चाळीस रुपयांवर आला. मुलींची चार आणे फी द्यायला सुद्धा पालक नाखूष असतात. फी भरू न शकणाऱ्या मुली पुष्कळ आहेत, तेव्हा मी मुलींना एवढा खर्च करा, असं कसं सांगू ?' थोडे दिवस गेले नि फिरून तगादा सुरू झाला. इन्स्पेक्टरसमोर माझी आत्या म्हणाली, "गर्ल गाइडची शपथ घेताना मुलींना मला असत्य शिकवणं प्राप्त होईल. ते मला नको."

इन्स्पेक्टरनी चमकून विचारले, "कुठले असत्य ?"

आत्या म्हणाली, "मी माझ्या राजाशी व देशाशी इमानी राहीन" अशी शपथ घ्यावी लागते. ब्रिटनमध्ये ही शपथ ठीक आहे. पण हिंदुस्थानसारख्या देशात एकतर माणसाला राजाशी तरी एकनिष्ठ राहाता येईल किंवा देशाशी. दोहोंशी एकनिष्ठ राहता येणार नाही. म्हणून मुलींना जी शपथ मोडण्यासाठीच आहे ती मी कशी घ्यायला लावू ?"

हे उत्तर ऐकल्यावर सरकारी गोटात फार क्षोभ माजला. तिच्यावर सरकारची गैरमर्जी झाली. तिच्या प्रमोशनवर गदा आली. या कुचंबणेत वर्षे निघून गेली. मुंबईच्या शिक्षणखात्यात आता तिला मुख्य पर्यवेक्षिकेची जागा मिळायची होती. ज्येष्ठतेत तिचा अग्रक्रम होता. तो डावलण्याची सरकारने एक युक्ती योजली आणि आधीच्या सरकारी नोकरीतल्या शिक्षिकांना समग्रपणे बाजूला सारून श्रीमंत पारशी घराण्यातल्या व विलायतवारी करून आलेल्या नव्याच मिस एमी रुस्तुमजी यांना ती जागा बहुमानाने देऊन टाकली. माझ्या आत्याला हा अपमान जाणवल्याशिवाय राहिला नाही.

घरात तिची आजोबांबरोबर बोलणी होत, त्यावरून ती अगोदरच सरकारी नोकरीला फार कंटाळली होती. राष्ट्रीय चळवळीपासून अस्वस्थ झाली होती. साधे पांढरे पातळ आणि पांढरा पोलका हा तिचा पेहराव

असे. तो पक्का स्वदेशीच असे.

त्या वेळी माझे वडील बेकार होते. घरातली आर्थिक परिस्थिती तंग होती. त्यामुळे सीताबाईवरच खर्चाची पुष्कळ मदार असे. त्यामुळे नोकरी सोडणेही कठीण होते. एकदा ती अशीच फार अस्वस्थ झालेली असताना आजोबा तिला म्हणाले, "सीता, तू उगीच मनात कुढू नको. सरकारी नोकरी खरंच वाईट असते. तुला त्रास होतो ती नोकरी हवीच कशाला? तू सोड. आपण दुसरं काही करू,"

पण यानंतर ती फार जगलीच नाही. एकोणतीस साली विषमज्वराने तो वारली नि घर पोरके झाले. सीताबाई गेल्यापासून राष्ट्रीय चळवळीत आम्ही सक्रिय रस घेऊ लागलो. काँग्रेस हॉस्पिटलमध्ये गोळीबारात, लाठीमारात जखमी झालेल्यांची सेवाशुश्रूषा करणे, स्वैपाक करणे, पिकेटिंग करणे, सूतकताई, सभा, मिरवणुकी यात आम्ही भाग घेऊ लागलो. सर्वांत धाकटी बहीण तुरुंगात गेली. वर्षभर आम्ही कॉलेज पण सोडले होते. ती वेडाच्या झपाट्याची वर्षे अजूनही मंतरल्यासारखी वाटतात. गांधींच्या त्या चळवळीत ज्यांनी काही ना काही भाग घेतला असेल, त्यांनाच गांधींच्या राष्ट्रीय प्रेरणेचे हृद्‌गत कळेल. गांधींनी या गरीब नि परतंत्र देशाला सर्वांत मोठी देणगी दिली. ती देणगी अस्मितेची आहे. भारतीय राष्ट्राला स्वतःचे राष्ट्रपण आहे ही जाणीव त्यांच्यामुळेच जगभर उत्पन्न झाली. आम्ही गुलाम नाही, तर आम्ही स्वतःची संस्कृती असलेले नागरिक आहोत ही जाणीव त्यांनी राष्ट्रातल्या लहान थोरांना दिली. भारतीयांना भारतीयत्वाची जाणीव त्यांनी दिली. एवढेच नव्हे तर भारत एक राष्ट्र आहे आणि त्या राष्ट्रातला प्रत्येक नागरिक प्रथम भारतीय व नंतर आणखी काही आहे ही ओळख त्यांनी जगालाही करून दिली. जगाच्या विराट राष्ट्रसंसारात गरीब नि परतंत्र भारतही राष्ट्र म्हणून उभा केला गांधींनीच. याच जाणिवेला अस्मिता म्हणतात. अस्मितेच्या या देणगीसारखी अन्य देणगी कुठलीच असत नाही. भगीरथाने गंगा पृथ्वीवर आणली तशीच अस्मितेची ही विशाल धारा गांधींमुळे शतमुखांनी या देशात वाहू लागली यात

शंका नाही.

राष्ट्रीयतेच्या भावनेला दुसरा एक संकुचित अर्थही प्राप्त झालेला होता तो म्हणजे 'आर्यत्वा'चा अभिमान; ब्राह्मणत्वाचा अभिमान; क्षत्रियत्वाचा अभिमान; सरंजामशाहीचा अभिमान; जातीजातीतला दुरभिमान. हिंदू संस्कृतीच्या नावाने साचत जाणारी थिल्लरे. नाशिकला मुलांच्या शाळेत असतानाची गोष्ट. नकलाकार भोंडे शाळेत आले होते. त्यांच्या कार्यक्रमात त्यांनी एका भिक्षुकाचे विडंबन केले. ते पाहून आम्ही विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. नक्कल खरेच अप्रतिम होती. सत्यनारायणाच्या पूजेचा फार्स होता तो. दुसऱ्या दिवशी पदार्थविज्ञानाचा प्रयोग करते वेळी विज्ञानाचे शिक्षक फार क्रुद्ध होऊन वर्गात शिरले. हे शिकवीत अप्रतिम; पण विज्ञानाचा, आधुनिकतेचा नि आचारांचा प्रत्यक्ष काही संबंध असतो, हे त्यांच्या गावीही नव्हते. मुली शाळेत गेल्या की बिघडतात म्हणून आपल्या मुलीला मराठी शाळा संपल्यावर त्यांनी कायमची घरीच ठेवली. अत्यंत सनातनी असे हे मास्तर होते. वर्गात आल्यावर ते कडाडले, " मॅट्रिकच्या वर्गातले विद्यार्थी तुम्ही; पण तुम्हाला आपल्या संस्कृतीचा जराही अभिमान नाही. याची लाज वाटायला हवी तुम्हाला. सत्यनारायण म्हणजे चेष्टा आहे की काय ?" आम्ही गालातल्या गालात हसू लागलो. या कुचेष्टेने ते आणखी संतापले. "लोकमान्य टिळक ज्या संस्कृतीचा आदर करीत तिची तुम्ही चेष्टा करता ? धर्माची चेष्टा करता ?" सर्व मुले मख्खपणे बसलेली होती. हे पाहून कालच्या ' टारगट ' पणाबद्दल दिलगिरी कुणीतरी व्यक्त करील ही आशाच त्यांना राहिली नाही. ते जमदग्नीसारखे उसळले. "याला कारण हे भावनाशून्य सुधारक. यांना जात नाही, रीत नाही, लाज नाही. या भागवतलाच विचारा घरी काय चालतं ते. कुणाच्याही हातचं खातात. खरं की नाही ?"

मी " हो " म्हणाले.

मास्तर म्हणाले "होऽ. होऽ. होऽ. काही वाटतं तरी का बोलायला ?"

समज उद्या तुला भूक लागली तर शेजारच्या महाराच्या घरी जाऊन चटणी–भाकरी आणशील की नाही ?"

आता मलाही अवसान आले. मी म्हटले "सर, महाराची चटणी-भाकरी आम्ही खातोच. पण भूक लागली तर दुसऱ्याच्या घरची भाकरी मागून आणणार नाही.'

" मग काय स्वत: करणार ? तोंड तर पाहा करणारणीचं. घरात नोकरांशिवाय स्वैपाक होत नाही. मग नोकर नसला की काय करणार ?"

" स्वत: करणार. "

मास्तरांनी हेकटपणाने म्हटले, " मला थापा मारू नकोस. मला सांगायचं ते हे की भंग्याच्याघरचं सुद्धा खायला तुम्ही मंडळी कमी करणार नाही."

" भंगी माणसं नव्हेत ?"

"असली तरी वेगळ्या संस्कृतीची. म्हणूनच भंगी झाली. अशांच्या घरचं खाणं म्हणजे आपल्या भावना घालवून बसणं. भावना नाहीत ते माणूस कसलं ?' इत्यादी.

मास्तरांत नि आमच्यात भरून न येणारी दरी होती, हे तेव्हाच उमगले. थोडयाच वेळात अभ्यास सुरू झाला नि वादळ बाजूला झाले.

नाशिकच्या हायस्कुलातलीच सहावीत असतानाची गोष्ट. ह्या वेळी सरकारी शाळात संमेलन दरसाल होत नसे. कधी तरी चार–दोन वर्षांनी व्हायचे. पण या वर्षी संमेलन होते. इंग्रजी पाठांतर किंवा काही नाट्यमय भाग निवडण्यात आले. या भागाचे चालकत्व नेने मास्तरांकडे होते. मला त्यांनी एक ग्रीक कथा पाठ म्हणण्यासाठी दिली. एक ग्रीक पुजारीण असते. फार मोठा मान असतो तिला. एकदा एका मंदिरात तिला समारंभासाठी जायचे असते. अंतर खूप होते. त्या दिवशी तिच्या रथाचे घोडे काही कारणाने नव्हते. इतक्या दूर ठरलेल्या वेळात चालत जाणे शक्य नव्हते नि जाणे तर जरूर होते. तिला दोन मुलगे होते. त्या मुलानी घोड्यांऐवजी

स्वत:ला रथाला जुंपले व आईला ठरल्या वेळात इष्ट स्थळी पोचविले. तिचे काम झाले. समारंभ पार पडला. पण धावून थकलेले ते मुलगे अतिश्रमाने मरण पावले. मातृभक्तीचे उदाहरण म्हणून मास्तरांनी ही गोष्ट पसंत केली होती. मी ती नकलून घेतली. पाठ करू लागले. पण ती गळी उतरेना. दुसऱ्या दिवशी मी मास्तरांना सांगितले "ही गोष्ट मला पाठ होणार नाही. दुसरं काही द्या."

"मी ती उत्कृष्ट गोष्ट म्हणून तुम्हाला दिली. पाठ करायला सोपीच आहे."

"सोपी आहे पण ती म्हणता येणार नाही."

"का ?"

"कारण त्यात मुलांची मातृभक्ती उत्कृष्ट आहे ही गोष्ट खरी. पण त्या गोष्टीत आईचं काळीज नाही. मुलांनी ओढलेल्या गाडीत आई बसेलच कशी ? सर, तुम्ही पुरुषाच्या दृष्टीने पाहिलंत गोष्टीकडे. आईच्या दृष्टीने पाहिलंत नाही. मी मुलगी आहे ना ?"

मास्तर गंभीर झाले. ते म्हणाले "खरं आहे, तुम्ही म्हणता ते. माझ्या ते लक्षातच आलं नाही. तुमचं हे स्पिरिट मला फार आवडलं. ते घालवू नका. मी तुम्हाला दुसरं काम देतो."

पुढे लेडी मॅक्बेथचे स्वगत त्यांनी मला दिले. तो भाग मी चांगला वठवला.

पुण्याला पाचवीत हुजूरपागेत एक वर्ष होते. तिथली एक घटना सांगण्यासारखी आहे. नगरला माध्यमिक शाळा असल्याने चौथीपुढे वर्ग नव्हते. आमचे बिऱ्हाड मुंबईचा खर्च पेलत नसल्याने एक वर्ष पुण्यास होते. अर्थात मी त्यावेळी पुण्यास आले. जूनमध्ये शाळेत नाव घातले. शाळेतले अभ्यास मार्चमध्ये परीक्षा झाल्यानंतर लगेच सुरू झाले होते. त्यावेळी पाचवीला बीजगणित, भूमिती व पदार्थविज्ञान हे तीन विषय सुरू होत असता. मध्यंतरी शाळेत खंड पडल्यामुळे हे विषय मला येत नव्हते. माझ्या आधीच्या

दोन मुली नगरहून हुजूरपागेत गेल्या होत्या. त्या वार्षिक परीक्षेत नापास झाल्या होत्या. तेव्हा मला 'तू चौथीत बस' असे सांगण्यात आले. पण मी 'मला तीन महिन्यांचा अवधी द्या. मी सारे भरून काढते असे सांगितले. व ते मान्य करण्यात करण्यात आले. आठवड्याच्या परीक्षा मराठी, संस्कृत, इंग्रजी, भूगोल, इतिहास या साऱ्या विषयात मी पहिली, दुसरी अशी आले, त्यामुळे वर्गशिक्षिकेला तक्रार करायला जागा नव्हती. गणितात मला पन्नासपैकी पंधरा व पदार्थविज्ञानात सतरा गुण मिळाले होते. या दोन विषयांत मी नापास झाले होते. गणिताचे मास्तर शिकवीत तेव्हा वर्गात दरारा असे. छडी लागे छम छम या वृत्तीचे ते होते. मुलींना समजावून सांगण्यापेक्षा टोंचून बोलून घायाळ करणे त्यांना आवडे. गणितात आपली शाळा नामांकित झाली पाहिजे हा त्यांचा दावा होता. वर्गाबाहेरही मुलींना शिकवण्यात ते कसूर करीत नसत. पण चूक कशी ती खपायची नाही. त्यांचे बोलणे फार लागट असे. एका विद्यार्थिनीने तर जीव दिला होता असे मुली सांगत. खरे-खोटे देव जाणे. विशेष-करून गरीब घरातल्या मुलींना ते फार टोचीत. मला ते सपाटून बोलले. "डोकं नाही, तर भांडी घास. बापाचे पैसे खराब करू नका" इत्यादी. मी उठले व म्हटले, "सर, शाळा बदलल्यामुळे माझा अभ्यास बुडाला आहे, मी प्रयत्न करते आहे. पुढच्या परीक्षेत असे व्हायचे नाही" तरी त्यांची सरबत्ती चालूच राहिली. जीव तोडून अभ्यास करीत राहायचे एवढेच माझ्या हातात होते. त्यावेळी अशी मौज झाली की पदार्थविज्ञानाची दुसरी परीक्षा पहिल्या परीक्षेनंतर पंधराच दिवसांनी आली मला पन्नासपैकी सत्तेचाळीस गुण मिळाले. विज्ञानशिक्षक म्हणाले, "गेल्या परीक्षेत नापास होणारी ही नवी मुलगी दुसऱ्याच परीक्षेत पहिली येते हा मोठा चमत्कार आहे. भागवत, मी तुला शाबासकी देतो." मास्तरांनी केलेल्या कौतुकाने माझा हुरूप वाढला. गणिताच्या परीक्षेतही मी पास झाले. पण मास्तरांचे बोलणे थांबेना. "पास झालं म्हणजे काही आकाशाला हात पोचत नाहीत. डोकं लागतं." मास्तर अद्वातद्वा बोलू लागले. बोलता बोलता माझा बाप त्यांनी काढला, त्याबरोबर

माझाही संयम सुटला. मी उठले नि त्यांना म्हणाले " सर, गणितात जी चूक झाली ती माझी; पाऽस होऊन ती मी भरून काढली. माझ्या बापाची अक्कल तुम्ही काढलीत. यात त्यांची काही चूक नाही. पण माझा बाप तुम्ही काढलात, तर मी पण तुम्हाला सांगते की हा अन्याय मी सहन करणार नाही. मी आता तुमचं गणित करणार नाही. वर्गात लक्ष पण देणार नाही. "

मास्तर हादरले. मुली भेदरून गेल्या. मला शाळेतून काढून टाकणार असेच त्यांना वाटले. मास्तर क्षणभर थांबले नि नंतर छद्मीपणाने म्हणाले " वर्गात अभ्यास करणार नाही नि परीक्षेत काय शंख करणार ?"

" माझा अभ्यास मी स्वतंत्र करीन. पेपर तुम्ही कसाही तपासा. "

मास्तर प्रिन्सिपालबाईकडे गेले नाहीत. कारण माझा अभ्यास, वर्तणूक चांगली होती नि मला बोलण्यात चूक त्यांचीच होती. पण इतके मात्र खरे की मास्तरांची न्यायबुद्धी चांगलीच असल्यामुळे त्यांनी माझ्याविरुद्ध कारवाई केली नाही. क्षुद्र मनाचा माणूस असता तर तो तेही केल्याशिवाय राहाता ना. इतकेच काय पण यानंतर मास्तरात व माझ्यात एक स्नेहभाव निर्माण झाला. मी वर्गात पुस्तक वाचीत असे. वाटले तर गणिताचा अभ्यास करायची, वाटले तर नाही. पण मास्तर त्यानंतर माझ्याशी हसूनखेळून वागू लागले. मास्तर हसले हा एक चमत्कारच होता.

पुढे वार्षिक परीक्षा आली नि गेली. मुली म्हणाल्या, " मास्तरांना तूच विचार मार्कांचे."

मी विचारले " सर, आमच्या पेपराचं काय झालं ?" मास्तर हसले नि म्हणाले " भागवत, पास आहात बुवा तुम्ही. " एकप्रकारे ते अभिनंदनच होते. सहावीत आमचे पुण्याचे बिऱ्हाड मोडून आम्ही मुंबईला आलो. मी नाशिक हायस्कुलात जाऊ लागले.

एकदा पुण्याचे गणित–शिक्षक नाशिकला आले. आमच्या शिक्षकांना विचारू लागले, " भागवतचं गणित कसं आहे ?"

" चांगलं आहे की ! "

त्या शिक्षकांना राहवले नाही. मला गाठून ते म्हणाले, " माझ्या

हातून सुटलात म्हणून फुशारून जाऊ नका. सहावीत तुम्ही नक्की गणितात नापास होणार."

मी सहावी पास झाले. त्यावेळी पुण्याहून मास्तरांचा खास निरोप आला की, "तुम्ही मॅट्रिकमधे नक्की नापास होणार." मी मॅट्रिक पास झाले, तेव्हा निरोप आला की "तुम्ही कॉलेजात पहिल्या वर्षात गणितात नापास झाल्याशिवाय राहात नाही." ही वाणी मात्र फलद्रूप होण्याचा मार्गावर होती. मी झेविएर कॉलेजात होते. पहिल्या टर्ममध्ये इन्फ्लुएझाने खूप आजारी पडले. खोकला जाईना. आमचे कुटुंब–डॉक्टर म्हणाले, "हिची आई याच वयात फ्लूचं दुखणं क्षयावर गेल्यामुळे गेली. हिला जपा."

महिनाभर मी नाशिकला हवेसाठी गेले व बरी होऊन आले. पण गणिताचा अभ्यास फार पुढे गेला होता. विषय समजेना. वडील व काका यांच्याकडे गणित व विज्ञान मी शिकत होते. पण आत्मविश्वास गेला होता.

त्या वर्षी भरीत भर अशी पडली की कॉलेजात पहिल्या वर्षाच्या प्रश्नपत्रिका व तपासणीचे काम गणिताच्या बाबतीत भारतीय प्राध्यापकांकडून काढून युरोपियन प्राध्यापकांकडे सोपविण्यात आले होते. फादर राफेल हे प्रख्यात गणितज्ञ आमचे परीक्षक होते. ही वार्ता ऐकूनच मुलींचे अवसान गळाले होते. बीजगणिताची प्रश्नपत्रिका पाहिली. शंभर मार्काचा बाकीच्या प्रश्नांचा खरा पेपर होता. पण त्यात पस्तीस मार्काचे एक उदाहरण मुद्दाम विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याकरता ठेवले होते. हा खास प्रश्नच मी पहिल्याने सोडवायला घेतला. तो सोडवताना फार आनंद मला झाला. माझ्या कानात कुणीतरी गुणगुणत सांगत होते की आता असं लिही, तसं लिही म्हणून. हा भास असला तरी तो फार स्फुरण देणारा होता. माझे उत्तर शेवटी कुठे तरी चुकले. बाकीचा पेपर सुद्धा याच धुंद परिस्थितीत मी दिला. पेपरात एक छपाईची चूक राहिली होती. तीही दुरुस्त करून मी पेपर संपवला. परीक्षा झाली तरी गणितात पास होईन याची सुतराम् खात्री नव्हती. मात्र एकाच विषयात गेले तर त्या विषयात पुन्हा परीक्षा घेऊन मला वरच्या वर्गात जायला मिळेल ही आशा होती. मी आमचे मानलेले चुलते प्रा. रा. ना.

भागवत होते त्यांना म्हटले, "मी उद्या गावाला जाते आहे. गणितात काय झाले आहे ते विचारून येशील ? म्हणजे बरोबर पुस्तके घेऊन जाते नि परीक्षेचा अभ्यास करते."

रामूकाका परत आला तो तोंडात बोट घालून "काय चमत्कार आहे तरी. फादर राफेल म्हणतो की साऱ्या वर्गात गणिती डोकं असणारी ही एकच मुलगी आहे. छान पास झालीस तू."

माझा जीव भांड्यात पडला. यानंतर पुण्याचे गणित-शिक्षक मला पुण्याला भेटले. ते म्हणाले, "भागवत जिंकलंत तुम्ही. मी हरलो." मी म्हटले, "सर, नाही तुम्हीच जिंकलात. तुम्हाला सूड घ्यायचा असता, तर शाळेतच माझं शिक्षण संपलं असतं. तुमचे शब्द मनात घोळत, म्हणून तर मी अभ्यास मन लावून केला."

नाशिकला मॅट्रिकच्या वर्गातली गोष्ट. वर्गशिक्षक उटगीकर सुप्रसिद्ध संस्कृत पंडित, भांडारकर इन्स्टिट्यूटमधले सभापर्वाचे संपादक. फार कडक. काही केलेले त्यांना पसंतच पडायचे नाही. यांचे शब्दचित्र मी 'मास्तर' या मथळ्याखाली दिलेले आहे. मला घडवणारे हे शिक्षक "भावमुद्रा" त्या शब्दचित्रातला म्हणूनच काही भाग इथे फिरून सांगते. प्रिलिम झाली. संस्कृतमधे मला सपाटून मार्क मिळाले होते. पण मास्तर संतापले होते. कारण भाषांतराचा भाग सर्वांचाच कच्चा होता. "वयं जग्मु" लिहिणारी मी होते. संस्कृत भाषांतराचा फारच कंटाळा आम्ही करायचा हे खरे. मास्तर बोलले तेव्हा मी उठले नि त्यांना म्हणाले, "सर संस्कृतमध्ये भाषांतर चांगलं कसं करायचं हे आम्हाला कुणी अजूनपर्यंत शिकायलंच नाही. आम्ही तरी काय करावं ?" मास्तर चपापले. "खरं आहे तुमचं म्हणणं. सर्व भाषांची ही जननी. पण तिचं शिक्षण फार वाईट दिलं जातं. दोष आमचाच. सारं शिक्षणखातंच या अनास्थेने भरलेलं आहे. पण शिकवलं तर शिकाल ? वेळ थोडा आहे. पंधरा दिवसांचा."

मी "जरूर शिकू" असे म्हटले आणि त्यानंतर मास्तरांनी भाषां-

तर, लेखन, शब्दांचा अचूक वापर याबद्दल अविस्मरणीय असे प्रवचन आम्हाला दिले. माझे संस्कृत खूपच सुधारले. आज माझ्या लिहिण्याच्या शैलीची घडण त्यांच्यामुळेच झाली ही जाणीव मला उशिरा झाली. त्यावेळी मास्तर दिवंगत झाले होते.

नाशिकला काही अचकट-विचकट पत्रे मला शाळेच्या पत्त्यावर यायची. मास्तरांनी मला खूप छेडले. पण त्या प्रकारात माझा हात नाही अशी खात्री होताच मला संरक्षण द्यायला ते धावून आले. ती नॉटपेड पत्रे ते पैसे भरून घेऊ लागले. त्यांना किती भुर्दंड पडला ते त्यांचे त्यांनाच माहीत. त्यांची उतराई होणे मला शक्य नाही.

शिक्षणखात्याने घेतलेल्या काही निर्णयांमुळे विद्यार्थ्यांच्या मनात काही वेळा विलक्षण न्यूनगंड निर्माण होतो आणि तो जन्मभर त्यांचा पिच्छा पुरवतो. बाहेरच्या छळावर नियंत्रण आणता येते; पण या आतल्या भयप्रद दटावणीमुळे माणसाचे सारे अवसानच नष्ट झाल्यासारखे होते. कौशल्य आटते. न कळत तो अपराधाच्या भावनेने ग्रासला जातो. माझे असेच झाले. एकोणीसशे चोवीस-पंचवीसच्या सुमाराला मुंबई इलाख्याच्या शिक्षणआयुक्तांनी एक नियम जारी केला. तो असा की इंग्रजी तोपर्यंत 'धावत्या अक्षरात' लिहीत असत, ती धावती लिपी काढून टाकायची; कारण तीन तीन लिप्या वाचताना, विशेषतः हस्ताक्षरात लिहिलेले वाचताना, मुलांचा घोटाळा होतो. छापलेली तुटक लिपी–रोमन लिपी–हीच एक लिपी जारी केली, तर वाचणे–लिहिणे एकाच तऱ्हेचे होईल आणि मुलांची मानसिक व शारीरिक शक्ती वाचेल. सरकारी शाळांत हा नियम सक्तीने लागू करण्यात आला होता. प्रथम वर्षभर जरा ढिलाई होती. वर्षानंतर विद्यार्थी व शिक्षक यांना क्षमा नव्हती. आता ज्या वेळी हा बदल अमलात आला त्यावेळी मी इंग्रजी सहावीत म्हणजे मॅट्रिकच्या आधीच्या वर्गात होते. आमचे शिक्षणाचे माध्यम इंग्रजी होते आणि त्या वर्गात अभ्यास भरपूर असे. लहानपणापासून कित्ते गिरवले ते बाळबोध, मोडी नि धावत्या लिपीच्या इंग्रजीचे नि आता

हे 'प्रिंट' अक्षर आले. कॉपी गिरवायला वेळ नाही. मुळातलेच अक्षर फारसे चांगले नव्हते. कारण आजोबांचे अक्षर उत्तम होते, त्यांच्याकडून आम्ही तिघी नाती आपल्या कॉप्या लिहून घेत असू. शाळेची वेळ येईपावेतोपर्यंत कित्ते तसेच ठेवायचे. नि मग आमची ठरवून केलेली रडारड चालू व्हायची. आजोबा मदतीला आले की आम्ही निश्चित. हे मराठी शाळेत चाले. इंग्रजी शाळेत आत्याच मुख्याध्यापिका असल्याने तिने आमचे 'बंड' मोडून काढले आणि मग आम्ही कॉप्या नीट गिरवू लागलो होतो. अक्षर 'बरे' म्हणण्या इतपत सुधारले होते. पण आता हा नवा प्रसंग गुदरला आणि सुटे प्रिंट अक्षर भराभर नेटके काढता येईना. त्याच्यामागे कुठलीच तपश्चर्या नव्हती. अक्षरात काही अक्षरे धावती येत, काही सुटी, प्रिंट अक्षरे हस्ताक्षरात वाचायची सवय नव्हती. हात व डोळे यांची संगत बसेना. आणि गिरवून शिकस्तीने आत्मसात केलेले 'आपले' अक्षर हरवले असे वाचून मनाला चरका बसला; काही तरी बुद्धीच्या गाभ्यातले, हाताच्या कसबातले कायमचे कुणीतरी ओरबाडून काढून फेकून दिले होते. बेवारशी जुने हस्ताक्षर मरायची इच्छा नसताना मरत होते. त्याला अब्रू नव्हती, रूप नव्हते. आता मला त्या जुन्या अक्षराच्या बांका–वळणातले त्यांच्या गोलवट, लांबट डौलदार आकारातले सौंदर्य प्रतीत झाले. प्रेतमुखावर तेज दिसावे तसे. आता त्या जुन्या लिपीतली जाड–बारीक रेषा केवळ कलावंताने पेलावी तशी मासू लागली. मन भुक्याने रडू लागले. संतापाने आक्रंदू लागले. पण त्या दुःखाला वाचा नव्हती. त्याचवेळी शिक्षण–खात्याने केलेला दुसरा एक असाच आमची वर्षे नि मेहनत निष्कारण वाया घालवलेला नियम जाणवला. तो म्हणजे मोडीला बंदी. मराठी शाळेतली ती वर्षे वाया गेली होती. मोडी शिकून, मोडी वाचताही आता येत नव्हते. मराठीची ती लघुलिपी अशीच मनात कुढत होती. तीही बेघर होऊन विजनात भटकत होती. मनात आले, असे का ? जे केले त्याचे चीज नाही नि पुढे आहे ते नीट करायला वेळ नि शक्ती नाही. शाळेत आता रोज रोज हस्ताक्षराबद्दल टोमणे ऐकून घ्यावे लागत. मन सतत खट्टू व्हायचे. पण मास्तर तरी काय

करणार ? वाईट अक्षराला कुणीही वाईटच म्हणणार. मग मनही स्वत:ला म्हणू लागले, " तुझे अक्षर मुळात वाईटच होते. ते कधी सुधारणार नाही. मेहनत कर. थोडे तरी दुसऱ्याचे कष्ट वाचताना कमी होतील. " आणि काय नवल ? इंग्रजीच्या बाबतीत अक्षराची झालेली घसरण मराठी अक्षरातही शिरली. मराठीचे वळण बरे होते तेही बिघडून गेले आणि माझे मन अपराधाने शरमिंदे झाले. बाकीच्यांची अक्षरे इतकी वाईट नव्हती. माझेच असे झाले. त्या अर्थी आपली लायकीच मुळात नाही. ड्रॉइंग आपल्याला अवगत झाले नाही; अक्षरे काढणे चित्रकलेचाच एक भाग; तोही आपल्याला जमायचा नाही, असे मनाने पक्के घेतले. पण शाळेत रोज रोज लिहावे लागे आणि अक्षर नीट काढण्यात सारे मन लागल्याने बाकीचे धरून ठेवण्याचे विचार निसटून जात. आतापर्यंत अभ्यास मला फार आवडत असे; पण आता ती एक भयप्रद क्रिया झाली. नव्या अक्षर–नियमाने एक काटेरी कुंपण माझ्याभोवती निर्माण केले. त्यातून सटकायला पळवाट नव्हती; मन पळवाटा धुंडू लागले. अखेर एक पळवाट सापडली. वाचणे आता खूप वाढले होते. मिळेल ते इंग्रजी पुस्तक वाचीत होते; समजता न समजता. वाचणे ही फॅशन नसून ती स्वत:ला झोडपून काढून अक्षराच्या बाबतीतल्या त्रुटीबद्दल स्वत:च स्वत:ला शिक्षा करून घेण्याच्या समाधानाचा दैनिक विधी होत चालला होता. त्याच सुमाराला चित्तरंजन दास वारले. मन फार पोळले, जणू काही बोथट अक्षराचा हातोडा मारून मीच त्यांना मारले, इतका आपल्या निष्क्रियतेचा उबग मला आला. विफलता ग्रासून टाकू लागली, आणि त्याच सुमाराला, The Gospel of the Buddha हे पॉल कॅरसचे पुस्तक मी वाचले; धर्मानंद कोसंबींचे ' बुद्ध, धर्म आणि संघ ' हे पुस्तकही वाचले, तापल्या दुधावर साय धरावी, तसा या वाचनाचा परिणाम झाला. अक्षराचे शल्य आत आत दडले. वरती समाधान आले, शाळेच्या प्रगतीपुस्तकात स्वत: वाचलेल्या पुस्तकांची नोंद करावी लागे. विवेकानंदांचे चरित्र व ही पुस्तके मी नोंदलेली पाहून आमचे वर्गशिक्षक चमकले. " भागवत, भिक्षुणी बिक्षुणी व्हायचा विचार करताहात का ? करू नका. लग्न करा, "

असा सल्ला त्यांनी मला दिला. आत्या अविवाहित होती. त्यामुळे तर त्यांना अधिकच चिंता वाटली. मास्तरांचे बोलणे मी ऐकले न ऐकल्यासारखे केले. कारण लग्नाचा विषय अजून दूर होता. जवळचा टप्पा, शिक्षण, त्यानंतर देशाचे स्वातंत्र्य वगैरे वगैरे, या वाचनानंतर अक्षराबद्दल मला एक उपाय सुचला. अक्षर सुटे सुटे काढावे म्हणजे वाचणाराला अडचण व्हायची नाही. हा प्रयोग बराच सफळ झाला. याचा प्रत्यय दोन प्रसंगी आला. नाशिक हायस्कुलात आमचे भूगोलाचे शिक्षक नेने फार कडक परंतु अतिशय उत्तम शिक्षक होते इंग्रजी उत्तम आणि, मानवी भुगोलावर अपार प्रेम होते त्यांचे. नकाशे काढण्याची कला त्यांनीच शिकवली. आकाशाचे निरीक्षण, भौगोलिक परिस्थितीचे निरीक्षण हे त्यांनी असे काही शिकविले की निसर्ग व मानव यांच्यातल्या अतूटपणाचा प्रत्यय मला त्यावेळी नकळत आला. आजच्या माझ्या लेखनातल्या प्रेरणांचा उगम नेनेमास्तरांच्या त्या विश्व-विशाल भूगोलाच्या शिक्षणातच आहे. पुष्कळ वर्षांनी हे कळले. नेनेमास्तर पुण्यास स्थायिक झाले, तीनचार वर्षांपूर्वी त्यांना भेटून मी कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले " पुष्कळाना शिकवलं. पण तूंच एक वेगळी निघालीस. " मास्तरांना मी हे सांगितले त्याने माझे मन तुडुंब आनंदाने भरून गेले. पण मी वेगळी का झाले याचे गुपित मात्र मी त्यांना सांगितले नाही; वाईट अक्षरा-वरचा उतारा म्हणजेच इतर क्षेत्रांत गती मिळविणे हा होता; त्याशिवाय गत्यंतरच नव्हते.


एकदा आठवड्याच्या परीक्षेत भूगोलाचा पेपर होता. परीक्षक नेने-मास्तरच होते. लिहिलेल्या प्रश्नांचा उलगडा सूक्ष्मपणे, गंभीरपणे नि खोचक-पणे ते करीत. त्या पेपरात मला पन्नासापैकी बेचाळीस गुण पडले होते. माझा पेपर हाती घेऊन ते इंग्रजीत म्हणाले, " सर्व पेपरांत हस्ताक्षराच्या बाबतीत मिस भागवतचे मी अभिनंदन करतो. " हे वाक्य ऐकले आणि माझे अवसान गळाले. आपल्या भिकार अक्षराला हा टोला आहे असे मला वाटले. मी लगबगीने उठले नि म्हणाले, " सर, माझे अक्षर फार वाईट आहे हे मला माहीत आहे. सुधारण्याचा प्रयत्न करते पण जुळत नाही. " मी

अपराधी भावनेने काळवंडून गेले होते. पण मास्तरांनी मला खाली बसण्यास सांगितले. ते म्हणाले, " मी टोचून बोललो नाही. तुमचे अक्षर घोटलेले नि वळणदार नाही हे खरे आहे. पण ते फार स्वच्छ आहे. सुटे लिहिलेले आहे. त्यात डाग नाहीत. खाडाखोड नाही. लेखन असेच हवे. म्हणूनच मी त्याला सर्वात चांगले म्हटले. " मी सुटकेचा निःश्वास टाकला. पण आपले अक्षर चांगले आहे याच्यावर माझा विश्वास बसला नाही.

दुसरा प्रसंग कॉलेजातल्या पहिल्या वर्गाच्या वार्षिक परीक्षेच्या वेळचा. पदार्थविज्ञानाचे जर्नल आमचे प्रिन्सिपॉल फादर ड्यूर हे पाहात होते. माझा प्रयोग संपला होता. मी जर्नलमध्ये तो लिहून काढीत होते. माझा मजकूर लिहून होताच त्यांनी जर्नल हातात घेतले आणि ते उद्‌गारले " Oh child, what a beautiful handwriting this is ! " (मुली, किती सुंदर हस्ताक्षर आहे हे.) त्यावेळीही मला हे शब्द प्रथम छद्मीच वाटले नि मी घाईघाईने म्हटले, " माझे अक्षर फार वाईट आहे. " फादर ड्यूर म्हणाले " नाही. सर्व जर्नल कसे छान लिहिले आहे; " आणि इतर विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले " हा आदर्श तुम्ही पुढे ठेवा. " फिरून माझे अभिनंदन करून ते निघून गेले आणि मी आश्चर्यात बुडून गेले. अपराधी मन वर डोके काढीतच होते. तेव्हा त्यांचे बोलणे एक गोड अपघात आहे. असे समजून मी तो प्रसंग अडगळीत फेकून दिला. पुढे बरीच वर्षे लोटली सत्तेचाळीस साली मी मिठापूरला माझ्या काकांच्याकडे गेले होते. तिथे खूप आजारी पडले. दुखण्यातून बरी होत असताना काकांच्या कपाटातली पुस्तके मी काढली. त्यात एक इंग्रजी निबंधाचे पुस्तक होते. त्या लेखकाचे नाव मला आठवत नाही नि पुस्तकाचे नावही आठवत नाही. लेखक आयरिश असून त्याचे लंडनमध्ये एक साप्ताहिक होते. डॉ. क्रोनिनची 'सिटॅडेल' ही वैद्यकीय जीवनावर लिहिलेली स्फोटक कादंबरी प्रथम याच साप्ताहिकातून क्रमशः प्रसिद्ध झाली आणि तिचे प्रथम प्रकाशनही याच संपादकाने केले. त्या पुस्तकातले दोन लेख आठवतात. एकात मॅडम मॉंटेसरीच्या शिक्षणपद्धतीची चेष्टा केलेली असून बर्ट्राण्ड रसेलने काढलेल्या शिशु-शाळेची

प्रशस्ती होती. दुसरा लेख माझ्या दृष्टीने फार महत्त्वाचा ठरावा. लेखात लेखकाने म्हटले होते की, गेल्या पंचवीस वर्षांत इंग्लंडच्या नव्या पिढीत कुणाचेही चांगले हस्ताक्षर मी पाहिलेले नाही. मागच्या पिढीपर्यंत अक्षर घोटलेले, सुवाच्य व सुंदर असे. सुंदर अक्षर असणे हे प्रतिष्ठेचे चिन्ह मानले जात असे. पण आता ते राहिलेले नाही. याचे कारण टाइपरायटरचा वाढता उपयोग हे नसून इंग्लंडच्या शिक्षणखात्यातला मोठा प्रमाद आहे. एक सामान्य बुद्धीचा इन्स्पेक्टर शिक्षणखात्यात होता. त्याला डायरेक्टर होण्याची हाव लागली होती आणि जमेची बाजू कमी असल्याने एवढी बढती नि तीही अल्पकाळात मिळणे कठीण होते. त्याने एक क्लृप्ती काढली. मुलांना चार लिप्या शिकण्यास त्रास होतो, तो कमी करावा आणि मुलांच्या-वरचा मानसिक ताण कमी व्हावा म्हणून त्याने धावत्या आलंकारिक लिपी-ऐवजी छापील पुस्तकातली लिपी वापरावी अशी योजना तयार केली आणि वशिले जोडीत जोडीत त्याने मंत्र्यापर्यंत ती नेली. शिक्षणक्षेत्रात बुद्धिमत्ता बेताचीच आणि प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष बेताचेच असल्यामुळे एक अभि-नव प्रयोग व उपक्रम म्हणून या योजनेला शिक्षणखात्याने अग्रक्रम दिला आणि इन्स्पेक्टरसाहेब डायरेक्टरपदी चढले. या नव्या उपक्रमामुळे जुनी लिपी लिहिणाऱ्या मुलांच्या डोकीत गोंधळ निर्माण तर झालाच, पण नव्या मुलांना धावत्या लिपीचा परिचयही घडला नाही. याच्याबरोबर कॉपी लिहिणे वगैरे प्रकारही उतरणीस लागले. सुंदर हस्ताक्षर असणे अगत्याचे आहे, ही जाणीवच नष्ट झाली. इंग्लंडने हस्ताक्षर गमावले ते कायमचे. यात युवकांचा दोष नाही. दोष आहे तो आमच्या शिक्षणपद्धतीचा. हे वाचले नि वर्षानुर्षांचा भार डोकीवरचा उतरला. कुणा देवदूताने स्वर्गातून खाली येऊन आपल्याला शापमुक्त केले असे वाटले. कोंडमारा थांबला. आपल्या लिहिण्यासंबंधीची अपराधी भावना आता न्यूनगंडात रूपांतर पावली होती. तो गंड आता फुटला. कारण आमच्या अक्षराची अशी पद्धतशीर वाट लाव-णारी चुकीची पद्धत शिक्षणक्षेत्रात इंग्लंडातून धोपटमार्गाने भारतात आयात झाली आणि तिच्याबद्दल इथल्या शिक्षण–तज्ज्ञ म्हणविणाऱ्यांनीही काहीच

प्रतिक्रिया व्यक्त केली नाही आणि ती आमच्या बोकांडी बसली. साथीचे बळी आम्ही झालो, हे आता स्वच्छपणे उमगले. अपराधाचा गंड गेला पण न्यूनाची भावना मात्र गेली नाही.



गोष्ट 'मोरण्या'च्या पुस्तकाची

ही गोष्ट अकल्पित पण वास्तव आहे. चमत्कारिक नाही म्हणून लक्षणीयही आहे. पण कुणी म्हणेल 'मोरण्याचे पुस्तक' ही आधी काय भानगड आहे ? अद्याप मराठीच्या कोशात अंतर्भूत न झालेला आगरी कुणबी स्त्रियांचा हा शब्द आहे. ठाणे जिल्ह्यातल्या मुंब्रा परिसरातला. त्याचा अर्थ 'टोचणे, टांचणे,' असा होतो ! मुंबईच्या पाचकळशी, चौकळशी इत्यादी जातींत 'मोरणी' असा शब्द नाकातल्या चमकीसाठी वापरतात; त्यात 'मोरणे' म्हणजे 'टोचणे' हाच अर्थ अभिप्रेत आहे. पण 'मोरणे' या शब्दाला दुसराही एक केवळ शब्द–वाचक परंतु आलंकारिक अर्थ त्या स्त्रियांनी दिलेला आहे. हा शब्दशः अर्थ 'मोर' या शब्दावरून केलेल्या क्रियापदात–मोरण–प्रतीत होतो. 'मोरणे' म्हणजे 'मोर काढणे' नि मोर काढणे म्हणजे कपड्यावर सुताने विविध आकृती काढणे; भरतकाम करणे; कशिदा काढणे.

आतापर्यंत 'एम्ब्रॉयडरी' या प्रतिष्ठित शब्दाला 'कशिदा' हाच फारसी पर्याय मी ऐकत होते. भरतकाम हा इंग्रजी राजवटीनंतर आलेला भाषांतरवजा ढिला शब्द आम्ही ऐकतच होतो, रसेल व हिरालाल यांनी मध्यप्रांताच्या जातीजमातींवर लिहिलेल्या पुस्तकात मोगल राजवटीपूर्वी भारतात सुईचा उपयोग केला जात नव्हता असा शेरा वाचला नि माझे मन अस्वस्थ झाले. कशिदा हा आमच्या–पणज्यांच्या चोळीवरचा प्रकार. पण त्याचेही नाव असे परके. हे पाहून मनात चीड उत्पन्न झाली, पण ही चीज वस्तुस्थिती पालटण्यास असमर्थ अशी असल्यामुळे वांझच होती. भरतकामाचा हा प्रकार आम्ही खूप पुरातन मानीत असलो, तरी त्याला आपली

म्हणावी अशी नावाची प्रतिष्ठाच नव्हती. 'कसूति' हे कानडी नाव व कशिदा हे आमचे नाव मुळी आमचे नव्हतेच. भरतकाम हे उपरे नावही समाधान देत नव्हते. मग 'आमचे' नाव काय ?

रसेलनी माझ्या मनात मोठे प्रश्नचिन्ह उभे केले, १९३६ साली हे प्रश्नचिन्ह मध्यप्रदेशातल्या आदिवासी जमातींचा अभ्यास करताना माझ्यापुढे उभे राहिले आणि मी भारतातल्या सुईच्या कसबाचा मागोवा ग्रंथांच्या आणि प्रत्यक्ष प्रांतोप्रांतीच्या नमुन्याच्या आधारे घेऊ लागले. पहिला सुटकेचा निःश्वास मी टाकला तो बौद्धसाहित्यात, म्हणजे पाली साहित्यात. भारतातल्या एका सुईत सात सुया सामावणारे अजब कसब असणाऱ्या सुईकाराच्या जातकातला बारीक सुयांच्या संदर्भात; हा एकटा कारागीर नव्हता. सुईकारांची गावेच होती. या तरुण कारागिराला एका प्रसिद्ध सुईकाराच्या मुलीला मागणी घालायची होती. तेव्हा तो त्या गावात 'सुई घ्या' असे ओरडत हिंडू लागला. सुईकारांच्या गावात सुई विकणारा कोण आहे अशा कुतूहलाने सुईकारांच्या त्या प्रमुखाने या तरुण सुईकाराला बोलावले. त्याने एक सुई अगदी बारीक व सुंदर अशी दाखवली. ती पाण्यावर तरंगायची. हे नवल पाहून प्रमुख सुईकार मुग्ध झाला. पण तरुण तिथेच थांबला नाही. त्याने त्या सुईतून दुसरी, दुसरीतून तिसरी अशा एकीहून एक सूक्ष्म व सरस अशा सात सुया प्रमुखाला काढून दाखवल्या. सौदा पटवायची भाषा सुरू झाली. तरुण कारागिराने प्रमुखाच्या कन्येची मागणी केली. सौदा पटला.

ही गोष्ट वाचल्यानंतर जिथे सुंदर सुया होतात तिथे सुंदर शिवण-काम होत असलेच पाहिजे हा तर्क बळावला. त्यानंतर भिक्षूंनी आपली वस्त्रे फाटके तुकडे जोडून सुरेख शिवावीत, भाताची शेती जशी हारीत एकात एक जोडलेली असतात तसेच हे तुकडे चौकोनी करून सरळ व चांगल्या टाक्यांनी शिवावेत असा गौतमबुद्धाचा आदेशही मग स्मरला. ठिगळे जोडणे हे इतके महत्त्वाचे होते तर ? गोधड्यांचे काम, ऊर्फ पॅचवर्क–ठिगळकाम–करीत असत तर ? हा विचार रुजला, 'अंगुत्तरनिकाया'च्या टीकेत एक गोष्ट वाचली. तिच्यात एका गृहपतीला आपल्या मुलासाठी योग्य वधू

निवडायची होती. तो धनिक होता. पुष्कळ थोरामोठ्यांच्या मुली त्याला सांगून आल्या; पण त्याने त्या नाकारल्या. एकदा एका खेड्यात त्याला एक कुमारिका दिसली. तिचे वस्त्र जुने होते पण ते तिने शिवून नेटके केले होते. त्या ठिगळांचे टाके व बाजूची शिवण अतिशय सुंदर होती. गृहपतीने मुलीला विचारले " हे शिवण कुणी केलं ?" मुलीने उत्तर दिले " मीच "; आणि त्या क्षणीच गृहपतीने या शिवण–कुशल मुलीला सून म्हणून पसंत केले. हे वाचले आणि रसेलनी उत्पन्न केलेला डंख मनातून निघून गेला. भारतीय सुईकाम आता एक स्वतंत्र अभ्यासविषय झाला, आता त्याचे अभावात्मक स्वरूप गेले. त्याचे स्वतंत्र अस्तित्व मला जाणवू लागले. विशेष म्हणजे संस्कृतीतली प्रतीकात्मकता मला आता सर्व तऱ्हेच्या दृश्य, श्राव्य आणि साहित्यिक आविष्कारात व कालखंडात विभागलेली परंतु तरीही काल आणि प्रदेश यांच्या सीमांना ओलांडून अक्षय अशा स्वरूपात दिसू लागली. आदिवासी जमातींचा अभ्यास करताना विश्वविद्यालयाने मला दरसाल २००–२५० रुपयांची प्रवासासाठी मदत केली होती. शिवाय मला मासिक रु. ७५ वेतनही फेलो म्हणून तीन वर्षे मिळाले होते. १९३७–३८ साली माझ्या कामाचा वृत्तांत विद्यापीठाला मी दिला; त्यात आदिवासींच्या चालीरीतींखेरीज वर उल्लेखिलेला भरतकामाबद्दलचा भाग देखील मी दिला. एवढेच नव्हे तर आदिवासींच्या भितीवरील भूमितीय चित्राकृती, आणि पारंपरिक कशिद्यातल्या आकृती यांच्यातल्या साम्याची देखील स्थूल चर्चा केली होती. इथून दृश्य व नाद यांचे रूपबंध मला सारखे ओढू लागले. लोकगीते, लोकाचार आणि विविध कथात्मक आविष्कारांतून मी निसर्गाचा प्रतिकात्मक वापर कसा होतो ते पाहून विस्मित झाले. पाने, फुले, नद्या, डोंगर, ढग, आकाश, विजा, पाऊस, वादळे, पशुपक्षी, कीटक आणि त्यांच्याशी पडलेली मानवाच्या मनाची सांगड मला चित्रात, गोंदण्यात, रांगोळीत, गीतांत, कथांत, प्रथांत आणि नादांत आवर्तित झालेली स्पष्ट दिसत होती. या आवर्तनाभोवती जन्ममृत्यूचे विशाल क्षितिज होते. हे आवर्तन प्रतीकमय होते. चित्रमय होते. ध्वनिमय होते. तालबद्ध होते आणि रूपबद्धही होते. मानवाने मनात साठव-

लेली पिढ्यानुपिढ्यांची मनोगते वास्तव आणि अवास्तव, सत्य आणि कल्पित, शास्त्रपूत आणि भ्रामक यांच्यात फिरताना या प्रतीकांत दिसू लागली. प्रतीके कल्पित अशी असली तरी अगदी वास्तवही तीच असतात, कारण त्यांच्या द्वारा माणसाच्या प्रादेशिक आणि सार्वत्रिक प्रेरणांची नेमकी चाहूल आपल्याला लागते, प्रतीके एकट्या-दुकट्याची नसतात, सार्वत्रिक असतात आणि म्हणूनच तो वेगवेगळ्या माध्यमात,--दृश्य, श्राव्य--सहज प्रवेश करतात.

प्रतीकांबद्दल एवढे सांगायचे कारण असे की त्या वेळेपासून कशिदा हे केवळ हाताचे कसब, अलंकरण एवढेच आता राहिले नाही. इतर अभ्यासाबरोबर याची गती वाढली नाही, तरी जाण वाढत चालली.

लहानपणापासूनच भरतकामाची मला फार हौस असे. पैसे जवळ नसतानाही पदपथावरची जुनी इंग्रजी नियतकालिके मी कितीतरी आण्या-दोन आण्याला खरेदी केली; तीही अगदी वैशिष्ट्यपूर्ण. जगातले सर्व तऱ्हेचे टाके गोळा केले, आणि त्या सर्वांचा लहान मुलांच्या कपड्यांसाठी मुक्त वापर केला, टाक्यांवर नजर स्थिर करण्याचे कारण एक असे होते, की टाका हे भरतकामाच्या लिपीतले एक अक्षर असते. भरतकामाच्या जगभरच्या विविध शैली आहेत. त्यात नेमकेच टाके वापरले जातात. ज्यांना आद्याक्षरे म्हणता येतील असे टाके फारच थोडे आहेत. धावेचा टाका, साखळी टाका, टिपेचा टाका, फुलीचा टाका इत्यादी, प्रत्यक्ष भरतकामात कितीतरी टाके आहेत. पण ते सारे या टाक्यांतून निघालेले विविध पर्याय आहेत. ज्याप्रमाणे सुंदर हस्ताक्षराला अक्षरे घोटावी लागतात त्याचप्रमाणे सुंदर भरतकामालाही या आद्य टाक्यांवर हात बसावा लागतो. जसजसे भरतकामाचे वेड वाढू लागले, तसतसे आपले टाके घोटीव, रेखीव येत नाहीत हे शल्यही मनात बोचू लागले. शाळेत शिवण अगदीच जुजबी होते. पुढे मुलांच्या शाळेत तर तेही सुटले. घरी गरज व छंद या पायीच या कसबाची संगत सुटली नाही.

भारतीय कशिद्याकडे मन आसोसून ओढले जाण्याचे एक कारण असे झाले की धारवाडला माझी आत्या मुलींच्या ट्रेनिंग कॉलेजवर प्रमुख म्हणून

काही महिने होती. त्या जागेवर भारतीय स्त्री–प्रमुख प्रथमच आली होती. १९२५ साली इंग्लंडमध्ये वेम्ब्ले एक्झिबिशन भरणार होते. १९२४ पासून कॉलेजातल्या विद्यार्थिनी कशिद्याचे नमुने त्या प्रदर्शनासाठी तयार करीत होत्या. त्याचवेळी आम्ही तिथे होतो. आत्याला तिथल्या मुलींनी दोन नमुन्यांचे रुमाल आठवण म्हणून दिले. शंभरसव्वाशे नमुने विविध रंगांत भरले होते. ते पाहून कशिद्यातले रेखाकृतीचे सौष्ठव मनात भरले. स्वदेशी चळवळीमुळे परदेशी भरतकामापेक्षा हेच काम करावे असे वाटू लागले. मी त्या रुमालातले कितीतरी नमुने खादीच्या तुकडयावर काढून घेतले आणि ते जोडून त्यांचे नमुन्यांचे छोटे पुस्तक बनवले. ते पुस्तक व एक रुमाल अद्यापही माझ्याजवळ आहे. पुढे वेम्ब्ले प्रदर्शनात धारवाडच्या कृतींना पारितोषिक मिळाले असेही ऐकले. आम्ही स्वदेशीखेरीज कापड वापरीत नव्हतो. पाश्चात्य भरतकामाला रंगसंगती लागते. रंगीत धागे त्या वेळी भारतात होत नसत. क्वचित् काळी, हिरवी दोऱ्याची रिळे मिळत. विलायती धागे वापरायचे नाहीत, मखमल, साटीण घ्यायची नाही, रेशमी कापडही घ्यायचे नाही, लोन व मलमलही घ्यायचे नाही; तेव्हा त्या काळी युवतिजगात रूढ असलेले आकर्षक भरतकामाचे साहित्य आम्हाला वर्ज्य होते व म्हणून ती नखरेल आणि विश्वमान्यता पावलेली भरतकामाची शैली मला अप्राप्य राहिली–खूप काळपर्यंत अप्राप्य राहिली. विकत घेतलेल्या पुस्तकातले नमुने पाहावे व मनोमन अभ्यासावे, देशी काळ्या-पांढऱ्या भरड सुती दोऱ्यात जे काही खादीवर करता येईल ते करावे आणि संतोषावे असे चालले होते. वर उल्लेखिलेल्या कशिद्याच्या कापडी पुस्तकाने मात्र आपणही आपल्या टाक्यांचे, आकृतींचे त्यांच्या इतिहासासकट पुस्तक काढले तर त्यातल्या आकृती कशा असतील यांचा एक ओबडधोबड आराखडा निर्माण केला. इथेच त्या पुस्तकाचा सुप्रभात झाला असे म्हणायला हरकत नाही.

पुढे मुंबईच्या खादीभांडारात निळे जाडे रेशीम मिळू लागले. मिलचीही जाडी मर्सराइज सुते क्वचित् मिळू लागली. खादीच्या कापडाचे पोत

ठाशीव असल्याने त्याच्यावर जाडग्या रंगीत सुताने काढलेल्या कशिदा फार ठसठशीत दिसायच्या. माझ्या कॉलेजच्या दिवसांत वाहीवर काढलेले कशिद्याचे ते नमुने एक वेगळेच आकर्षण ठरले. काही मैत्रिणींना ते नमुने शिकावेसे वाटू लागले. पण एका मैत्रिणीची दृष्टी खरेच कलावंताची आणि हात कसबी होता. भरतकामावर तिचे आत्यंतिक प्रेम होते व आहे. या मोहिनीनेच प्रमिला जयकर व मी एकत्र आलो आणि तिच्यामुळेच आमची मैत्री अभंग राहिली आहे. तिला कशिदा प्रथम मी दाखवला आणि कलावंताचा कुंचला चालावा अशा सफाईने तिची सुई चालू लागली. मला कुठल्याही तऱ्हेच्या टाक्यांचे मर्म लवकर कळते. ते मी ताबडतोब आत्मसात करते. पण प्रमिलाचे टाके हे जादूचे टाके असतात. तिच्या टाक्यांनी भरतकाम सजीव होते. त्यानंतर आम्ही दोघी सतत भारतीय मोरण्याचे नमुने गोळा करून ते कशावर नि कशावर तरी काढीत राहिलो. आमच्या गप्पा नेहमी अशा नमुन्यांचे विलायती डी. एम्. सी. पुस्तकांसारखे शोभिवंत पुस्तक कधी भारतात निघेल का नि निघालेच तर आपला त्यात काही वाटा असेल का ? अशा तऱ्हेच्या असत. प्रत्यक्षात नव्हे तरी कल्पनेने आम्ही दोघी आमचे सामायिक पुस्तक तयार करीत होतो.

इकडे मी भ्रमंती करताना मला भारतीय भरतकामाच्या बाबतीत लमाणांचे भरतकामाचे नमुने व त्यांच्या भरतकामाची खुबी मिळाली. त्यापूर्वी पाटण्याच्या वस्तुसंग्रहालयात व कलकत्त्याच्या नॅशनल म्यूझियम-मध्ये बसून मी बंगाल, बिहार, पंजाब, कच्छ, राजस्थान व लमाणांच्या भरतकामाच्या नमुन्यांचा खूप अभ्यास केला. आकृती काढल्या. टाके तपासले. पण लमाणांचे काही टाके दुर्गम वाटले. माझा गर्वपरिहार झाला. काश्मिरचे भरतकाम केवळ धंदेवाईकांचे असते. पश्मिना लोकरीचे कापड अगोदर निराळे; त्याच्यावर काढायचे कच्चे रेशीमही वेगळे आणि मग कसबी कारागिरांनी काढलेली, कापडात एकजीव झालेली ती कुसर पाहून 'हे आपले काम नोहे' असे उत्तर मनाने अगोदरच दिले होते; म्हणून काश्मिरी शालीवरचे भरतकाम आले नाही तरी टाके सर्वच माहीत अस-

ल्याने ओशाळगत वाटली नाही. कर्नाटकी कशीदा येत होता. पण अडाणी लमाणांचे कसब पाहून मी नामोहरम झाले आणि ते काही करून शिकायचेच असे मनाशी पक्के केले.

सुदैवाने दुर्ग जिल्ह्यात भटकताना लमाणांचा तांडा १९३८ साली भेटला. त्यांच्याशी ओळख करून घेऊन मी त्यांच्या भरतकामाची स्तुती केली. त्यावेळी त्यांच्यापैकी एक म्हातारा म्हणाला, "बाई, आमच्या बायकांसारखी 'कढाई' कुणालाही येत नाही. मागे मिशनरी आम्हाला म्हणाले की मुली आमच्या शाळेत पाठवा. त्यांना आम्ही छान कढाई शिकवू. आम्ही त्यांचे नमुने पाहिले. नि त्यांना म्हटलं, "असं शिकणं केलं तर आमच्या मुलींची लग्नं होणार नाहीत." मिशनऱ्यांचे गर्वहरण करणाऱ्या या कलाकुशल लोकांचा परिचय झाल्याने फार आनंद वाटला. पण मला काही त्या बाया आपले कसब शिकवायला तयार होईनात. त्यांच्या तांड्याबरोबर जवळजवळ चाळीस मैल प्रवास पायी केला, तेव्हा त्यापैकी एकीने, "तू कसं भरतकाम करतेस ते दाखव" असे म्हटले; मी थोडेसे टाके तिला दाखवले. पाटण्याला म्यूझियममध्ये काढलेले काही लमाणी नमुने होते. ते टाके पाहिल्यावर ती बाई म्हणाली, 'एवढं जर तुला येत आहे, तर बाकीचं कशाला चोरून ठेवू? पण तीस रुपये घेईन शिकवायचे.' तीस रुपये तिला मोजून दिले. तिने माती लावून चोळून चोळून हात स्वच्छ धुतले. म्हणाली, "हात धुतल्याशिवाय आम्ही कढाई करीत नाही." मग एका कोळशाने लाल कापडावर तिने आकृती काढली आणि ती आकृती उलट बाजूने भरण्यास सुरुवात केली. "सर्व भरगच्चआकृत्या आम्ही अशाच उलट बाजूने काढतो. आमच्या देवाचा तसा हुकूम आहे. बाकी सारं जग दुसऱ्या बाजूने काढतं." ती म्हणाली. माझ्या डोकीत एकदम प्रकाश पडला. उलट्या बाजूने काढले की सुलट्या बाजूला टाके घट्ट येतात; ही ती खुबी. कापडात टाका एकजीव करण्याची ही खुबी. मग मला आठवले की १८८५ मध्ये पंजाबच्या 'फुलकारी' वर फ्लोरा ॲनी स्टील यांनी लिहिलेल्या लेखातही फुलकारीचे तंत्र हेच सांगितले होते; आणि मग आठवले की 'हर्षचरिता' त बाणभट्टानेही राज-

कन्येच्या वस्त्रावरचे भरतकाम असेच उलटबाजूने कसबी स्त्रिया करीत होत्या असा उल्लेख केला आहे. मात्र 'हर्षचरिता' चे भाषांतर पुरुषांनी केल्यामुळे व पुरुषांनी स्टीलबाईचा लेखही वाचला नसल्याने व तसे भरतकामाचे तंत्र त्यांना अवगत नसल्याने भाषांतरात महामहोपाध्याय पां. वा. काणे यांच्यासकट सर्वांनी गोता खाल्ला आहे. आता माझ्या मनात भारतीय भरतकामाच्या इतिहासाची रूपरेखा तयार होऊ लागली; त्याच्या तंत्रात मी गुरफटत चालले.

तेवढ्यात नागपूरला एक म्हातारी शिंपीण भेटली. तिने नवीच माहिती दिली, कुमारिकेची चोळी वेगळी. तिच्यावर तुळशीची मंजिरी काढायची. नवऱ्या मुलाच्या आईची चोळी वेगळी. तिच्यावर रुईफूल काढायचे. मुंजा मुलाच्या आईची चोळी वेगळी. तिच्यावर रेजा म्हणजे तारा काढायचा. इथे प्रतीकांचा वेगळाच अर्थ कळला. मी तीन चोळ्या पांढऱ्या खणाच्या तिच्याकडून करवून घेतल्या.

याच्या आधी दोन वर्षे. म्हणजे १९३६ च्या सुमारास मला खादी-भांडारात प्रथमच खादीची काळी साटीण मिळाली आणि घट्ट पिळाचे लाल, हिरवे, पिवळे धागे मिळाले, आता या साहित्याने मी टाक्यांचे हद्‌गत शिकायचे ठरवले. त्यावेळी दादरला अॅथेड नावाचे एक अत्यंत कुशल व निष्ठावान भरतकामाचे शिक्षक होते. मंजुळाबाई भांडारे यांच्या भरतकामाच्या भव्य देखाव्यांना मुंबईच्या आर्ट एक्झिबिशनमध्ये बक्षिसे मिळायची. त्या या अॅथेडमास्तरांच्याच शिष्या. मी त्यांच्या वर्गाला गेले. त्यांना माझे साहित्य दाखवले आणि म्हटले 'मी स्वदेशीशिवाय कापड व सूत वापरत नाही. माझ्याजवळ फक्त एवढं साहित्य आहे. त्यात जे टाके होतील ते मला दाखवा. मला सुरेख टाके कसे घालतात ते शिकायचं आहे.' अॅथेडमास्तर खूप आनंदले. उत्तेजित झाले. ते म्हणाले, " इतके दिवस ज्या शिष्याच्या शोधात मी होतो तो शिष्य मला आज भेटला. इतक्या बाया आल्या. शिकल्या. पण असं आव्हान कुणी दिलं नाही. चल आपण प्रयत्न करूया. " आणि मग त्या प्रयत्नातून खरोखरच कितीतरी टाके नि आकृती

आम्ही तयार केल्या.

टाके शिकण्याचा हेतू असा होता की जिथे रंगाकृतींना गौणत्व तिथे रेखाकृतीतच सारे सौष्ठव सामावते. रेषेचा शोभिवंतपणा तर टाक्याच्या नेटकेपणातच असतो. पुस्तकाचे डोक्यात होतेच; शिवाय रेखाकृतींना धागे कमी लागतात. कापड साधे चालते. आमच्या गरीब देशातल्या बायांना भरतकामाच्या नावाखाली भुर्दंड पडू नये. पूर्वीच्या बायका जुन्या लुगड्याच्या काठांचे दोरे जमवून त्यांनी कशीदा काढीत. ते सूत मऊ व लुगड्याच्या पोताचेच असल्यामुळे कशीदा कसा एकजीव नि सूक्ष्म दिसायचा लुगडयाच्या पोतातच सामावून जायचा, नि दोन्ही बाजूंनी परत सारखा असायचा. शिवाय टाका तर नुसत्या धावदोऱ्याचा पण आडव्या उभ्या पोतात या भूमितीच्या सुंदर आकृती कशा उठून दिसत. ढब सारी अलंकारांच्या विविध रूपबंधांची आणि साम्य रांगोळीच्या आकृत्यांशी. देवळांचे कळस, बिल्वपत्रे, अष्टदळ कमळ, शंख, मोर, पोपट, रुइफूल सारे काही. सारे काही विशिष्ट आणि तरीही सार्वत्रिक.

तेवढ्यात सोलापूरकडच्या एका शिंपिणीकडचा असाच एक नमुन्यांचा रुमाल मिळाला. नमुने भूमितीय. पण हातमागाच्या विणीच्या धर्तीवरचे. साळी जातीचे हे नमुने. महाराष्ट्राच्या दक्षिणेचे, कर्नाटकापर्यंत पोचणारे हे शैव नमुने होते. कारण टाके शैव लोकांच्या भस्माच्या पट्ट्याप्रमाणे आडवे होते. लगेच मनात प्रकाश पडला. कर्नाटकी कशीदा अधिक चौकशीअंती वैष्णव निघाला; त्यातले टाके उलट दिसतात. महाराष्ट्र-कर्नाटकातल्या या शैव–वैष्णव कसबाचा शोध हा मला प्रेरक वाटला. पुस्तक मनात साकारू लागले.

नागपूरचे टाके मिळाले त्यावेळी कुठला नमुना केव्हा काढतात याविषयी नवी माहिती मिळालीच होती. त्यात डोहाळमुलीच्या चोळीवर पोपट काढतात या नव्या माहितीची भर पडली. एका आजींनी ओवी दिली:

कुसुंब्या चोळीवरी ।
राघू काढून पाहिला ।

तोची दिवस राहिला ।
मैनाबाईला ॥

त्यानंतर वसईच्या ख्रिस्ती लोकांचे, म्हणजेच पूर्वीच्या सामवेदी ब्राह्मण स्त्रियांच्या चोळ्यांवरचे नमुने मिळाले. आता गाभा भरत चालला होता.

इतक्यात १९४०–४१ च्या सुमारास एक विलक्षण गोष्ट घडली. एक इंग्रजी प्रकाशन–पद्मा पब्लिकेशन्स ही संस्था मुंबईत निघाली. तिचे संचालक बाबूभाई उर्फ पद्मशी मोरारजी माझ्या वडिलांचे भागीदार अनंतराव पटवर्धन यांचे स्नेही होते ते कधी कधी आमच्याकडे येत. आदल्याच वर्षी मद्रासच्या व्यापारात त्यांना ठोकर बसली असताना माझ्या वडिलांनी व पटवर्धनांनी त्यांना पन्नास हजार रुपये कर्जाऊ दिले होते. ते पुढे त्यांनी फेडले. ते बाबूभाई एकदा आमच्याकडे आले नि मला म्हणाले, " आमच्या मनात इंडियन एम्ब्रॉयडरीवर एक पुस्तक काढायचं आहे. तुम्हाला माहीत आहे कोण हे काम करील ?" पटवर्धन म्हणाले " करणारी तुमच्या समोरच आहे. "

" ओहो, बेन करीत असतील तर देवच पावला. मी कॉंट्रॅक्टचा कागद आत्ता पाठवतो. "

मी प्रमिलाकडे गेले. माझे सारे नमुने तिच्याकडे नेऊन दिले. आमचे बोलणे झाले. डी. एम. सी. च्या धर्तीवर महाराष्ट्रात रूढ असलेले कशिद्याचे व भरतकामाचे सर्व प्रकार द्यायचे आम्ही ठरवले. पुस्तकात दीडशे तरी नमुने घालायचे ठरले. अगदी सहा वर्षाच्या नवशिक्या मुलीपासून तो कसबी भरणारणीपर्यंत सर्वांची तरतूद आम्ही करणार होतो. विशेष म्हणजे कापड व सूत दोन्ही गोष्टी स्वस्तात पडतील अशीच या कसबाची निर्मिती आम्ही करायचे ठरवले.

आम्ही कल्पिलेले पुस्तक आडव्या बांधणीचे आणि अवघ्या सोळा पानांचे होते. आत शैव व वैष्णव कशिद्यांचे एकास एक जुळणारे असे नमुने प्रथम यायचे होते. मग महाराष्ट्रातल्या ' ठिगळ ' कामाचे ऊर्फ

पॅचवर्कचे नमुने. 'ख्रिस्ती' नमुने मग होते. साखळीच्या टाक्यांचे सुंदर 'दरबारी' शोभणारे काम होते. मोर होते. पोपट होते. फुले होती. काठ होते. चोळीच्या बाहीच्या खांद्यावरचे नमुने होते. सर्व काही होते.

आम्ही नमुने करण्यास सुरुवात केली. तन्मयतेने आम्ही काम करू लागलो. वेगवेगळ्या रंगात, आकृतीवर आकृती तयार करीत आम्ही तासन् तास काम करीत होतो. रोज सहा तास असे आम्ही सहा महिने काम केले. आमचे काम पूर्ण झाले. आमचा ध्यास रूपबद्ध झाला. त्या दिवशी माझ्या मनात गोंड स्त्रियांचा एक उखाणा आला.

दो बहिनों, उन का जुड बया हेत
दो बहिनों के पेट में लडका एक.

उखाण्याचा अर्थ शिंपल्यातले मोती असा होता. पण माझ्या दृष्टीने हे पुस्तक म्हणजे अक्षरशः आम्हा दोघींची एकाकार निर्मिती होती. प्रमिलाचे काम फार सरस असल्याने तिने कव्हराचे भरतकाम करावे असे ठरले आत जितके प्रकार होते. त्या प्रकारचा पण आत नसलेल्या नमुन्याहून भिन्न असा दुसराच नमुना घालून. सर्वप्रकारे प्रातिनिधिक असा हा रचनाबंध आम्ही तयार केला. तो भरून झाला. आम्ही काम बाबूभाईंना दाखवले. ते खूष झाले. दहा टक्के दोघी मिळून मिळणाऱ्या रॉयल्टीच्या करारपत्रावर आम्ही सह्या केल्या; आणि पुस्तक छापण्याची वाट बघू लागलो.

आमचा कराराचा कागद पाहून प्रमिलेचे यजमान म्हणाले 'एवढ्या थोड्या रॉयल्टीवर तुम्ही कबूल करायला नको होते.'

पण एकतर त्या वेळी यापेक्षा अधिक रॉयल्टी कोण देणार होते ? शिवाय पैशांपेक्षा पुस्तक महत्त्वाचे ही आशा व भाबडा ध्येयवादही होताच.

महिन्यांवर महिने गेले. एक वर्ष उलटले. पुस्तकाच्या आघाडीवर सामसूम होती. मग एक दिवस डी. बी. नेरॉय कंपनीकडून बोलावणे आले. आमच्या नमुन्यांचे ब्लॉक्स तयार झाले होते. नेरॉयनी छापलेली प्रुफांसारखी फोटोप्रत आम्हाला दिली. यात सर्व चित्रे काळी पांढरीच होती. आम्ही

कितीतरी रंग वापरले होते. त्याबद्दल विचारताना ते म्हणाले " ही कच्ची प्रत आहे. रंगाचे पुढे करू." त्या प्रतींचे कागद घेऊन आम्ही आलो. माझ्या प्रास्ताविक मजकुरांचीही प्रुफे येऊ लागली. बाबूभाईंनी फोन केला की " रंगीत चित्रांबद्दल शंका घेऊ नका. खास आर्ट पेपरवर काम करायची माझी महत्त्वाकांक्षा आहे. सध्या सरकारकडून स्पेशल कोटा सँक्शन करून घेतला आहे."

आम्ही वाट पाहात राहिलो. वकील अँड सन्सनेच पहिले ब्लॉकचे प्रिंटिंग केले होते; अर्थात् पाहिले ते काम सुंदर असल्याने आम्हाला शंका घ्यायला जागा नव्हती.

पण महिनेच्या महिने उलटले. पुस्तक बाहेर आले नाही. 'करतो, करतो' हाच जबाब बाबूभाई देत होते. त्यात आमचा संयम पुरा तुटण्यासारखी आणखी एक विचित्र घटना अखिल भारतीय महिला समाजाच्या आघाडीवर घडत होती. तिचा दणका चांगलाच जाणवला.

साल १९४२ चे होते. एक दिवस सौ. इंदिराबाई जोशी यांचा फोन आला. त्यात त्यांनी आपल्या माहेरच्या राऊत घराण्याचा व भागवत घराण्याचा तीन पिढ्यांच्या संबंधाचा आवर्जून उल्लेख केला. पुढे त्या फार गोड वडीलकीच्या आवाजात म्हणाल्या, " बघ, तू इंडियन एम्ब्रॉयडरीवर काम करते आहेस असं मला कळलं. ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्स तुला माहीत असेलच. तिच्या सेक्रेटरी मिसेस कमलाबाई डोंगरकेरी आहेत, त्या सर्व कलांत निष्णात आहेत. मी पण भरतकामाचे नमुने गोळा केले आहेत. कॉन्फरन्ससाठी आम्ही भरतकामाचे पुस्तक काढणार आहोत. मी आणि कमलाबाई डोंगरकेरी. तर तुझी सारी माहिती आम्हाला तू दिली पाहिजेस. आपला जुना घरोबा आहे, तर एवढं तू केलंच पाहिजेस."

मला फार राग आला. मी ताबडतोब उत्तर दिलं " मला तुला काही देता येणार नाही. माझा प्रकाशकाशी करार झाला आहे. मैत्रिणीशी करार झाला आहे. तेव्हा तुमचं काम तुम्ही करा. आमचं आम्ही करू. नाही तर तुमच्या कॉन्फरन्सलाच दहा हजार रुपये आम्हाला देऊन हे पुस्तक आमच्या

नावाने प्रसिद्ध करायला सांगा."

ते अर्थात त्यांना रुचले नाही. पुढे डोंगरकेरीबाईंचेही फोन व निरोप आले. त्यांचा थोडक्यात मथितार्थ असा की, माझा मजकूर त्यांना हवा होता, कारण त्या दोघीही संशोधक नव्हत्या. तेव्हा नमुने व मजकूर मी द्यावा आणि त्या पुस्तकावर त्या दोघींबरोबर कॉन्फरन्सला मंजूर असल्यास माझे नाव टाकले जाईल. निदान प्रस्तावनेवर तरी. शिवाय त्यात आमचे दोघींचे आभार तर रुजू होतीलच.

यात माझ्या मैत्रिणीला साफ डावलले जाणार होते, अर्थात् ते मला मंजूर नव्हतेच. अगोदरच मी प्रमिलाला पहिल्या फोनबद्दल सांगितले होतेच. तिचेही मत माझ्यासारखेच होते. काही झाले तरी आपली जोडी टिकवायची नि परक्याला शिरकाव करून द्यायचा नाही हा आमचा निश्चय आता पक्का झाला. हा तणाव वर्ष दोन वर्षे चालू होता. तेवढ्यात या कॉन्फरन्सच्या दुकलीने नेरॉयकडे जाऊन आमचे नमुने पाहावयास मिळविण्याचा प्रयत्न केला.

एकदा इंदिराबाई जोशी आमच्या घरी आल्या. मी त्या वेळी आमच्या पुस्तकातल्या नमुन्याचे एक पान भरीत होते. ते मी अर्थात् पटकन बाजूला ठेवले. त्या म्हणू लागल्या "तुझे नमुने तर दाखव. तू हुशार आहेस. पण युनिव्हर्सिटीच्या भानगडीत तुझे वडील पाठीशी होते म्हणून तुझी मिजास टिकली. आम्हाला कोण आहे असं साहाय्य करणारं ? नोकरी करावी लागते. संसार आहे. तुझ्यासारखा रिकामपणा आम्हाला कुठला ? म्हणून तुला विनवावं लागतं. जुना स्नेह स्मरून तरी तू मदत करावीस."

त्या वेळी मीही वडिलांचा सल्ला घेतल्याप्रमाणे त्यांना उत्तर दिले. "तुमचे नमुने तुम्ही दोघी आम्हाला पाहायलाही देत नाही, नि मी मात्र तुम्हाला सारं मोफत द्यावं ही का मैत्रीची तऱ्हा झाली ? मग आता स्पष्टच सांगते की मलाही माझं साहित्य जमवण्यासाठी डोंगरदऱ्यांतून भटकावं लागलं आहे. वडिलांना देखील भूर्दंड खूप पडला आहे. तर आपण आता सौद्याच्या दृष्टीनं विचार करू या. तुम्ही आम्हाला पंचवीस हजार रुपये द्यायचे. मग सारं काही तुमच्या नावावर छापा. आमचं नावही नको. चालेल ?"

मात्रा लागू पडली. "आम्ही काय? आम्ही नोकरी करणारी माणसं–बायकांना उपयोग व्हावा म्हणून ही सेवा करायला निघालो तर यां अटी तू घालतेस काय?" मग बरेच पाणी डोळ्यांतून काढीत त्या निघून गेल्या.

प्रमिलेला हे सांगितले. तिलाही माझा विचार पटला.

इकडे त्रेचाळीस साल अर्धे झाले. प्रेसमध्ये पुस्तक अडकल्याची वार्ता आली. त्यात कॉन्फरन्स–जोडीने नेरॉय यांच्याकडे आमच्या फोटोंच्या प्रती पाहायला मागितल्याची वार्ता पण नेरॉय यांनी सांगितली. काही वर्षांपूर्वी खोताच्या वाडीत आम्ही समोरासमोर कित्येक वर्षे राहात होतो व आमचे संबंध फार चांगले असल्यामुळे नेरॉय यांनी त्यांना त्या प्रती पाहायला दिल्या नाहीत असे नेरॉय यांनी सांगितले. इकडे इंदिराबाईंचे फोन तर येतच होते. मध्यंतरी म्हणजे १९४२ च्या सुरवातीपासून इंदिराबाईंचे यजमान डॉ. पी. एम्. जोशी देखील बायकोच्या सेवाकार्यात मी मदत करावी असे उघड सुचवू लागले होते. ते होते मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल. त्या वाचनालयात मी कित्येक वर्षे नेमाने वाचीत व लिहीत बसत असे, पुढे माझे सहकार्य मिळत नाहीसे पाहून जोशीसाहेब नाराज झाले. पीएच्. डी. चा बोजवारा नुकताच उडाल्याने माझी विश्वविद्यालयातली किंमत शून्यावर आली होती. एकीकडे मी फार लक्षणीय व्यक्ती होते. एकीकडे त्याज्य व नगण्य होते. प्रस्थापितांच्या दृष्टीने मी बंडखोर नि उर्मट होते. संधी मिळेल तिथे माझ्या समकालीन विद्यार्थ्यांकडून व इतरत्रही या लोकांनी मला टोचून खिजवून बोलण्याचा परिपाठ ठेवला होता. तेच वातावरण आता ग्रंथालयात शिरले. आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांसमोर जोशीसाहेबांनी मला टोला हाणला. अत्यंत उपहासगर्भ. "हे आले मोठ्ठे प्रोफेसर. सर्वज्ञ. स्वत:ला सर्वात शहाणे समजणारे" इत्यादी. मी ताबडतोब उत्तरले, "होय, लहान विद्यार्थ्या, तुला कुठली अक्षरं शिकायची आहेत?". वातावरण तंग झाले. जोशीसाहेब न बोलता निघून गेले. आतापर्यंत मी तिथेच बसून पुस्तके वाचीत असे. घरी पुस्तके नेण्याची मेहेरबानी कधी घेतली नव्हती. परंतु इथे इत:पर राहण्यात

अर्थ नाही हे मात्र त्या दिवसानंतर उमगले आणि मी रॉयल एशियाटिक सोसायटीची सभासद झाले.

इंदिराबाईंनी तरीही आपले धोरण बदलले नाही. मी आता बेकार होते. बाई वनिताविश्राम मुलींच्या हायस्कूलच्या मुख्याध्यापिका होत्या. मला मदत म्हणून त्यांनी आपल्या शाळेत पार्टटाईम शिक्षिका म्हणून घेण्याची तयारीही दाखवली. जुनी मैत्री कशी राखायची याचा वस्तुपाठ होता तो. पण मी ती नोकरी नाकारली.

इकडे दुसऱ्या प्रस्थापितांकडूनही वजन येतच होते. तेवढ्यात कमलाबाई व इंदिराबाई यांचे बिनसले. दोघी मग एकेकट्या आपापले पुस्तक काढण्याच्या मागे लागल्या. कमलाबाईंकडून नंतर काही निरोप वगैरे आला नाही. इंदिराबाई मात्र त्यानंतर दहाबारा वर्षांवर या विषयावर मी मदत करावी, समुद्रातून दोन थेंब गेले तर काय होते वगैरे गोष्टी बोलतच राहिल्या. प्रथम कमलाबाई डोंगरकेरींचे पुस्तक पॉप्युलरने काढले. त्यानंतर कित्येक वर्षांनी पॉप्युलर प्रकाशनाने इंदिराबाईंचेही पुस्तक काढले. आम्ही दोन्ही पुस्तके पाहिली आणि आमची मैत्रीण रेस्क्यू होममधल्या स्त्रियांना नित्य भरतकाम शिकवीत असे, त्यात त्यांच्या नमुन्यांचा निर्मत्सर वृत्तीने उपयोग करू लागलो. आम्ही आता निश्चित झालो होतो. पण ही मानसिक प्रयासाने मिळवलेली निश्चिती मिळायच्या अगोदर वर मी जी अघटित घटना उल्लेखिली आहे तिच्यातून जो प्रचंड क्षोभ व वेदना निर्माण झाली होती, तिचीच ही निश्चिती, प्रतिक्रिया होती. पूर्ण भावात्मक पण ती घटना अगोदर सांगितली पाहिजे. कडू असली तरी. बाबूभाईंनी आम्हाला व्यवस्थित फसवले होते. वर्षामागून वर्ष उलटत होते. एकदा वार्ता ऐकली की पद्मा पब्लिकेशनचे दिवाळे वाजले म्हणून. वार्ता प्रमिलेचे यजमान सॉलिसिटर जयकर यांनीच आणली; तेव्हा तिच्याबद्दल शंका घ्यायला जागाच नव्हती. १९५१।५२ चा हा काळ होता. इस्टेट रिसीव्हरच्या ताब्यात गेली असे ऐकत होतो. आम्ही वकील अँड सन्सकडे गेलो. मॅनेजरला भेटलो. त्या वेळी ते म्हणाले, "पद्मा पब्लिकेशन्सनी आमचे पैसे दिलेले नाहीत म्हणून तुमचे नमुने व मजकूर

आम्ही मोहोरबंद केला आहे." एकदा एकजण आला व म्हणू लागला, "तडजोड म्हणून तुम्ही दहा हजार रुपये देत असाल तर तुमचा माल तुमच्या स्वाधीन करतो." दहा हजार रुपये! एवढी रक्कम कुठून उभी करायची? एकेकीला पाच पाच हजार द्यावे लागले असते. मी बेकार व आजारी. १९४२ सालीच वडिलांनी मुंबई विद्यापीठाने मला दिलेली प्रवास-भत्त्यासह सर्व रक्कम साडेतीन हजाराची सॉलिसिटरच्या मार्फत परत करून माझा आब राखला होता. त्याच वडिलांना हा भूर्दंड भरायला कसा सांगावा? प्रमिलाही संभ्रमातच पडली. घासाघीस करून जुळते का ते पाहू लागली. पण काही महिन्यांत वार्ता आली की आमचा माल वकील अँड सन्सकडे उरलेला नव्हता. तिथेही बरीच उलथापालथ झाली होती. कुणी तरी ती अडगळ फेकून दिली होती. आमची अत्यंत मेहनतीने अतिशय बुद्धी नि कौशल्य खर्च करून निर्माण केलेली ती कलाकृतींची पुस्तिका कायमची नष्ट झाली होती. बेवारशी कुत्र्याच्या प्रेतासारखी कुणीतरी तिला तंगडी धरून उकिरड्यावर भिरकावून दिली होती. कुणालाच कळले नाही का की तिच्यात सौंदर्याची मंद पखरण होती. भारतीय कसबाचे हृद्‌गत होते. महाराष्ट्रात कसबाचे सौंदर्य नाही असा समज इथल्या भल्या भल्या समाजशास्त्रज्ञांचाही होता व आहे. मला पाहीन तिथे सौंदर्य दिसते. कसब दिसते. गरीब व साध्या मराठी माणसाची कुशल बोटे व कलाशालीनता दिसते. तीच या पुस्तिकेत भरतकामाच्या रूपाने आम्ही साकारली होती. ते सारे सारे आता दृष्टीआड झाले होते. आम्ही बोलू शकत नव्हतो. सहनही करू शकत नव्हतो. माझे मन सुन्न झाले. पीएच. डी. ची सारी मेहनत निकालात १९४२ सालीच गेली होती. तेव्हा मी दुःखी झाले पण निर्धारीही बनले. दुसऱ्या दिवसापासून स्वतःचे असे निर्भ्रांत विचारविश्व साकारण्याचे माझे आव्हान मीच घेतले नि कामात बुडून गेले. समाधान होऊ लागले. त्याच समाधानाला फुटलेला हा महत्त्वाचा अंकुर आता साफ जळून गेला. माझे लेखनविश्व अजून प्रत्यक्षात आकाराला आलेच नव्हते. एकांतात त्याला धुमारे मात्र फुटत होते. या आघाताने मी साफ खचले. अवसान बारगळले.

प्रमिलाही निराश झाली. तिच्या यजमानांचे म्हणणे हेच की आम्ही योग्य करारपत्र न केल्याने बुडालो. रिसीव्हरकडे आमचे हस्तलिखित अगर नमुने नसल्यामुळे त्या कराराला अर्थच उरला नव्हता. त्यात आणखी असे समजले की बाबूभाईंनी या कला–पुस्तिकेच्या निमित्ताने तेव्हा प्रकाशकांना दुर्मिळ झालेला आर्ट पेपराचा बराच कोटा पदरात पाडून घेतला होता. त्यावेळी दाखवण्यापुरती आमची नमुना–पुस्तिका व प्रस्तावना त्यांना उपयोगी पडली. आर्ट पेपरला खूप भाव आला. पद्मा प्रकाशन बुडाले. पण बाबूभाई वाचले.

हा विश्वासघातकी प्रकार पाहून 'हा तुझा बाबूभाई' असे प्रमिला म्हणाली. तिच्या अश्रूंत संताप होता. उद्‌गारात कडवटपणा होता. मी अगतिक होते. कुठेच व्यवहारात उणी नव्हते. भांडणाचा प्रसंग सर्वस्वी टाळला होता. पण जे व्हायचे ते टळले नाही. नुकसान आपले नि वाईटपणाही आपलाच हे विद्यापीठाच्या घटनेनंतर माझ्या पदोपदी अनुभवाला येत होते. प्रमिलेने प्रत्यक्ष ठपका दिला नाही तरी तिचे शब्द मला लागले. मी गप्प बसले. काय करावे? हिचा आपल्यावरचा विश्वास गेला का? पण तो राहावा तरी कसा? तिचा दोष नव्हता. ती सुजन म्हणून तेवढेच म्हणाली. पण मी स्वतःचे समर्थन करू शकत नव्हते.

काही दिवस गेले नि प्रमिलेची आणि माझी मैत्री होती तशीच चालू राहिली. मध्ये आलेले वादळ आम्ही वाटून घेतले. फिरून आम्ही आमच्या स्वप्नात शिरलो. एकमेकींना नमुने शिकवू लागलो. प्रमिलाने रेक्स्यू होमच्या मुलींना भरतकाम शिकवण्यास प्रारंभ केला. त्या कामात गेलेली शांती तिला परत मिळाली. आणि मी? नव्या नव्या हुडकाहुडकीत मागचे विसरत चालले.

पण या एवढ्या काळात आणखी दोन घटना घडून गेल्या. १९४४ च्या सुमाराला अहिल्याबाई किर्लोस्कर कशिद्यावरचे पुस्तक काढणार होत्या त्यांची माझी ओळख नव्हती. त्यांना पुस्तकात द्यायला नमुन्यांची वाण नव्हती. कारण त्यांच्याकडे श्रीमंतांकडच्या कशिद्याच्या लुगड्यांचे कैक

नमुने होते म्हणे. वाण होती ती अशा पुस्तकांला मजकूर काय घालावा याचीच. कुणी माझे नाव सांगितले. त्यांचा एक दीर माझ्या भावाबरोबरच मेडिकल कॉलेजात होता. त्याने माझ्या भावाला सांगितले की, " माझी वहिनी कशिद्याचे पुस्तक तयार करते आहे. तुझ्या बहिणीने खूप संशोधन केले आहे, तेव्हा तिच्याकडे त्या विचारायला येणार आहेत." भाऊ म्हणाला, " माझी बहिण आजारी असते. तिला त्रास न दिलेला बरा. " पण इतके सांगूनही त्या बाई एक दिवस सकाळी अकरा–बाराच्या सुमाराला आल्या.

दारात माझ्या दीड वर्षांच्या भाच्याने ओकून ठेवले होते. तो रडत होता. जुन्या नऊवारी लुगड्याचे ओचे खोचून मी ती घाण साफ करीत होते. " दुर्गाबाई आहेत का ?" त्यांनी विचारले.

" बसा, येताहेत " असे म्हणून मी जमीन पुसून आत जाऊन हात धुऊन बाहेर आले.

" काय काम आहे तुमचं ?" मी विचारले.

आश्चर्य गिळीत त्या बाई म्हणाल्या, ' मी कशिद्याचं पुस्तक काढते आहे. त्याला प्रस्तावना कशी लिहायची ते कळत नाही. आपण या विषयावर काम केलं आहे असं कळलं: आपले काम मला दाखवा नि माहिती पण सांगा. '

मी संथपणे म्हटले, ' वीस वर्षांच्यावर काळ मी भरतकाम शिकण्यात घालवला आहे. बाळपणापासून मी ते करते आहे. मी रानावनातून माझे नमुने आणले. प्रकृती घालवली. तरी मला अद्याप वीस पानांच्यावर या विषयावर लिहिता येणार नाही. तर ती पानं तुम्हाला मी का देऊ ? समजा, दिली तरी ती तुम्हाला कशी पेलतील ? बोहरी आपले नमुन्याचे संग्रह काढतात, तसाच तुमचा संग्रह तुम्ही काढा. तोही उपयुक्त ठरेल.'

' अहो, पण मी पदवीधर बाई आहे. शिकलेल्या बाईने प्रस्तावनेशिवाय पुस्तक काढलं तर कसं दिसेल ? मग शिकलेल्यांत व अशिक्षितात फरक काय ?'

' ज्या पदवीधर बाईला स्वत:च्या पुस्तकाची प्रस्तावना लिहिता

त नाही तिने स्वत:ला शिकलेली म्हणू नये.'

त्या फार रागावल्या. तेव्हा मी पुढे म्हटले, "आता व्यवहाराची गोष्ट सांगते. सारे नमुने नि मुद्दे लिहून देते. पण या व्यवहारात मला तुम्ही पंचवीस हजार रुपये माझ्या मेहनतीचे द्यायला हवेत. माझा मैत्रिणीबरोबर व प्रकाशकाबरोबर करार झाला आहे, तो मला मोडता येत नाही. पण तुम्ही हा व्यवहार मान्य करीत असाल तर प्रयत्न करीन."

त्या न बोलता चालू लागल्या. पुढे त्यांचेही पुस्तक निघाले. पण मला ते अद्याप पाहायला मिळाले नाही. पैशाची गोष्ट मी काढली की या मागण्या सुटतात हे मला आता कळून चुकले होते. पुढे या अहिल्याबाईंचे मला एक पत्र आले त्यात त्यांनी लिहिले होते "तुमच्याकडे अपेक्षेने आले होते पण निराशा झाली. इंदूरला माझे माहेर, माझी मोठी बहीण तुमच्या मंडळींना चांगली परिचयाची आहे. तुमच्याआमच्या घराण्याचा जुना स्नेह. असे असताना मदत मिळाली नाही, तुमचा स्वभाव कळला." वगैरे. १९४५ साली माझी बहीण कमला कुन्तूरला असताना एका मैसूरी पण दिल्ली-तल्या कॉलेजची प्राचार्य असलेली विदुषी सीताबाई भेटली. गप्पा झाल्या. बहिणीची व तिची दिल्लीला असताना मैत्री झाली होती. पुढे काही महिन्यांनी त्या बाईंचे मला इंग्रजीत एक पत्र आले. त्याचा आशय असा- 'माझी एक कूर्गची मैत्रीण इंडियन एम्ब्रॉयडरी हा विषय घेऊन ऑक्सफर्डला पीएच. डी. साठी गेली आहे. आतापर्यंत प्रवास व इतर खर्च मिळून तिचे पंधरा हजार रुपये गेले आहेत. तिच्या प्रोफेसरला या विषयाची माहिती नाही. तिलाही लिहिता येत नाही. तू या विषयाचा अभ्यास केल्याचे कळते. तरी तू तातडीने सर्व काही लिहून व नमुने देऊन तिला मदत कर. भारतीय विद्यार्थी नालायक असतात असे सारेजण तिला बोलतात. तिला जीवन असह्य झाले आहे. प्रसंगी ती जीवही देईल अशी मला भीती वाटते. तरी आपल्या एका गरजू बहिणीला तू मदत करशील अशी आशा आहे.' मी उलट टपाली पत्रात लिहिले की, 'तुमच्या मैत्रिणीबद्दल वाचून वाईट वाटले. मी मदत करीन. पण माझ्या अटी आहेत. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीने

तुमच्या मैत्रिणीला मार्गदर्शन करण्यासाठी माझी जाहीर नेमणूक करावी आणि तुमच्या मैत्रिणीने माझ्या नमुन्यांबद्दल व कल्पनांबद्दल मला पंचवीस हजार रुपये द्यावे.'

हे पत्र वाचून बाई चिडल्या. त्यांनी मला लिहिले, 'तू इतकी आप्पलपोटी व निर्दय असशील असे वाटले नव्हते. एक भारतीय स्त्री इंग्लंडात आपली कला दाखवावी म्हणून धडपडत असताना तुला केवळ पैसा व प्रतिष्ठा दिसते !" इत्यादी. परंतु आता दुसऱ्यांना आपण मेहनतीने कमावलेले सर्वस्व मोफत व स्वत:चे नावही स्वत: खोडून टाकून देत नाही म्हणून स्वार्थी, दुष्ट, समाजविरोधी व पर्यायाने भांडखोर अशी विशेषणे ऐकण्याची सवय मलाही झाली होती. त्यामुळे या सर्व घटना जीवनातल्या विनोदात जमा करायची प्रवृत्ती मी अंगी बाणवत चालवली.

तिला यश येत चालले ते मात्र खरोखर या विषयात मला ज्या काही खऱ्या प्रकाशाच्या तिरिपा वेळोवेळी दैवानेच पुरवल्या त्यामुळे. त्यातली पहिली तिरीप अशी की माझी बहीण कमला सोहोनी हिची मैत्रीण राणी कुमुदिनी रामदेवराव. या हैद्राबादच्या जुन्या राजकुलीन बाई. त्यांच्या अंगावर सुंदर नक्षीची चोळी मी पाहिली. १९४५ च्या सुमारास. असे कसब मी पूर्वी कुठेच पाहिले नव्हते. राणीशी चौकशी केली तेव्हा त्या कसबाचे नाव 'पाल-मिगडु' म्हणजे 'दुधावरची साय' असे कळले. आंध्रप्रदेशाची ही ग्रामकला. व्हेनिशियन लेस फिकी पडेल असे हे दोरे काढलेले अप्रतिम कसब. साऱ्या आकृती भूमितीय. त्यांच्याकडून चोळी घेऊन मी ते काम शिकले. पुढे भावाला पहिली मुलगी झाली तेव्हा तिच्या झबल्यावर ते काम केले तेव्हा मला जितका आनंद झाला तेवढा कुठलीही कृती संपन्न केल्याने झालेला नाही. ही कला दिसली आणि मागच्या कडू अनुभवांनी आलेली मरगळ साफ ओसरली. नवा हुरूप आला. त्याचे कारण असे की अद्याप कुठल्याही भारतीय शिक्षण-कसबाच्या पुस्तकात अगर लेखात, त्याचप्रमाणे भारतातल्या कुठल्याही वस्तुसंग्रहालयात 'पाल-मिगडु'चा उल्लेख व नमुना नव्हता. आंध्र-स्त्रीची ही घरगुती कला बाजारू झालेली नव्हती व नाही.

आणि तिचे ते साधे सौंदर्य पाहून मी मोहित झाले होते. आता माझे भरतकामाचे पुस्तक मेले नव्हते. नव्हे, ते कधीच मरणार नव्हते. मरणे त्याच्या नशिबीच नव्हते. ते तर माझ्या रक्तात होते, दृष्टीत होते, सर्व प्रेरणांत जागृत होते. फिरून मी प्रमिलाला ही गुजवार्ता सांगितली. तीही टवटवली. आम्ही त्या प्रकाराला यथेच्छ आंजारले गोंजारले. भारतीय भरतकामात त्याला मानवंदना दिली.

पुस्तक फिरून व्यवहारात मृतच होते. तरी आमच्या संकल्पात ते तसेच कायम होते,

आणखी काही वर्षे गेली, तेवढ्यात आम्हा दोघींवर अनेक प्रसंग आले नि गेले. पण पुस्तकाचे मनोमनीचे सूत्र सुटले नाही.

१९६४ साली वडील वारल्यावर मी काही महिने कल्याणला आत्याकडे राहात होते. रोज मुंबईला ग्रंथालयात येत असे. त्यावेळी कल्याणच्या स्टेशनवर एक आगरी कुणबी बाई दिसली. धारवाडी खणाच्या चोळीवर काही वेगळेच भरतकाम केले होते. त्याची मी कुतूहलाने चौकशी केली. तेच ते 'मोरणे.' खास महाराष्ट्राचा भरत-प्रकार. टाकाही अद्याप जगाच्या ख्यात भरतकामाच्या टाक्यांत प्रविष्ट न झालेला. महाराष्ट्राच्या झाडाझुडपांसारखा काटेरी पण रेषेदार. आखीव व ठाशीव. हे मोरणे सणासुदीला करायचे असते. विशेषत: नवे धान्य घरात आले की त्या वेळी अशी चोळी भरून सवाष्ण ती अगात घालून धान्यदेवतेची पूजा करते. हे ऐकले आणि माझे मन उचंबळले. आतापर्यंत झालेले सर्व श्रम दूर झाले. थकावट गेली. साखळीच्या टाक्याचाच हा टाका एक प्रकार होता. ज्याला अमेरिकन परिभाषेत 'कॉर्न स्टिच' (धान्य-टाका) म्हणतात त्याच तऱ्हेचा पण जरा वेगळा म्हणजे अर्ध-धान्य टाका हा होता.

मी नमुने हातातल्या कागदावर काढले. टाका मनात साठवला. घरी जाऊन काढला आणि वर्दी दुसऱ्या दिवशी प्रमिलेला दिली. तिने कौशल्याने त्या आकृती कापडावर अंकित केल्या. ही दुसरी तिरीप अत्यंत जीवनदायी ठरली.

पुढे एका नंदीबैलवाल्याकडून सुंदर झूल मिळाली आणि सात खणी अजब पिशवीची माहिती प्राप्त झाली. हा मला शुभाशीर्वादच वाटला.

त्यानंतर आम्ही दोघींनी मिळून फिरून आमचे 'पुस्तक' तयार करायला घेतले. ते आकार घेऊ लागले. एवढ्यात १९६९ साली सिबा कंपनीला भारतीय भरतकामावर एक लेख लिहून हवा होता. ते काम माझ्याकडे आले. आता आम्ही फिरून कामाला लागलो. प्रमिलेचे नाव माझ्याबरोबर आले पाहिजे एवढीच माझी अट होती. आम्ही लेख तयार करून देण्यात वर्ष उलटले. आणि तो लेख रिव्ह्यू–सिबा–गैगी–१९७२–७३मध्ये अलीकडेच तीन भागांत प्रकाशित झाला आहे. त्याची छपाई दृष्ट लागण्यासारखी आहे. बाकीचा एक मोठी पुस्तिका होईल एवढा मजकूर लिहून तयार आहे आणि आमचा 'हेत' हळूहळू बाळसे घेतो आहे.

अशी आहे या अर्ध्या–अधुऱ्या सर्वात छोट्या पुस्तकाची गोष्ट. माझ्या दुसऱ्या कुठल्याही पुस्तकापेक्षा सर्वात मोठी. ●

'ज्ञानकोशा'विषयी थोडेसे

डॉ. केतकरांचा नि माझा प्रत्यक्ष परिचय नव्हता हे नव्याने सांगायला नको. तरी पण केतकरांचे जीवनच असे काही विचित्र आहे की तुम्ही आपणहून त्यांच्या जवळ गेलात की गुरफटलात म्हणून समजाच.

१९३७ साली मी केतकरांच्या 'ज्ञानकोशा'तले बौद्धधर्मावरचे लिखाण वाचले. त्यात बुद्ध डुकराचे मांस (सूकर मद्दव) खाल्ल्याने अतिसार होऊन वारला. या एका गोष्टीखेरीज बाकीचा मजकूर चुकीचा होता व याही बाबतीत सूर उपहासाचा व तुच्छ होता. केतकरांना पाली भाषा अवगत नव्हती. इंग्रजीत प्रसिद्ध झालेल्या त्यावेळी उपलब्ध असलेल्या बौद्ध वाङ्मयात अनेकदा पिटकांच्या टीकाग्रंथांचे संदर्भ नसत. बराच भाग गाळलेला असे. त्यामुळे अभ्यासकाला ऱ्हिस डेव्हिड, मिसेस ऱ्हिस डेव्हिस, मॅक्समुलर इत्यादी जगन्माननीय पंडितांशी मतभेद होण्याचे प्रसंग उद्‌भवणे अपरिहार्य असते. पण केतकरांच्या या ग्रंथात हेतुपुरस्सर बुद्धाची व बौद्धमताची अवहेलना झालेली मला आढळली आणि ती डॉक्टरांच्या अज्ञानावर आधारित असल्याचे पाहून माझा जीव गलबलला. मी पाली ग्रंथांतून पुरावे देणारे असे पत्र त्यांना लिहिले. पाकिटात घातले. पत्ता लिहिला आणि पोस्टात टाकणार इतक्यात मनात एक विचार आला. 'या पत्राने त्यांचे मन पालटेल काय ? की आणखी एक शत्रू आपल्या यादीत जमा होणार ?' मनाचा कौल दुसऱ्या बाजूने आला. पत्र पाठवले नाही. माझा प्रबंध छापून येणारच होता. आल्यावर पाठवू, म्हणून गप्प बसले; आणि दोन महिन्यांनी डॉ. केतकर निवर्तल्याची बातमी वाचली.

१९४७ साली डॉ. केतकरांचा दहावा स्मृतिदिन. त्या निमित्ताने

शीलवती केतकरांच्या इच्छेनुसार ज्ञानकोशातला हिंदूधर्माबावतचा मजकूर एकत्र करून 'Hinduism and its Future in the New World Society' ही पुस्तिका अनुवादरूपाने, शीलवतीबाईंच्या साहाय्याने मी प्रसिद्ध केली. या स्मृतिसप्ताहात लालजी पेंडसे यांचे व्याख्यान झाले. लालजी गुजराती ज्ञानकोशात डॉ. केतकरांचे साहाय्यक होते. त्यांनी एक स्फोटक आठवण सांगितली. डॉ. केतकरांनी गुजरातीत ज्ञानकोश करायचा उपक्रम सुरू करायचे ठरवले, त्यावेळी कन्हय्यालाल मुनशी यांना बरे वाटले नाही. त्यांनी हिंदू गुजराती साहाय्यक केतकरांना मिळू नयेत म्हणून खटपट केली. ती फलद्रूप झाली. पण केतकर हार खाणारे नव्हते. त्यांनी खबरदार या पारशी गृहस्थांचे साहाय्य घेऊन 'ज्ञानकोशा'चे कार्य पुढे रेटले. गुजरातीत प्रस्तावनेचे दोन खंड प्रसिद्ध झाले. याबाबतीत अंबालाल साराभाई यांचे प्रोत्साहन केतकरांना प्रेरक झाले. एक कचेरी बडोद्याला होती. पुढे मुनशींनी गांधींकडे गुजराती काम मराठ्याने का करावे अशी तक्रार केली. गाधीनी अंबालालना बोलावून या कामात मन न घालण्यास सांगितले व डॉ. केतकरांना गुजराती ज्ञानकोशाचे काम गुजराती करतील असे सांगितले. ही आज्ञा अनुल्लंघनीय होती. अंबालालनी अंग काढून घेतले. तेवढ्यात गुजरात-मध्ये महापूर आला. कचेरी वाहून गेली. हजारोंची ठोकर बसली. हस्तलिखित छातीवर बसले.

गुजराती पाठिंबा गेल्यामुळे उत्तर प्रदेशात दोन खंड हिंदीत निघाले होते. तरी ज्ञानकोशाच्या हिंदीच्या आवृत्तीतही हाच कोलदांडा पडला. केतकर फक्त कर्जाचे धनी झाले. गुजरातीत व हिंदीत अद्याप विश्वकोश पूर्ण झालेला नाही. एवढेच काय पण मुन्शींचे 'भारतीय विद्याभवन' संशोधना-करता इतके गाजलेले असूनही व त्यांना लक्षावधींची अनुकूलता असूनही ज्ञानकोशासारखे कार्य संपन्न करता आले नाही. काळ मोठा विचित्र असतो. १९५६ च्या सुमारास शीलवतीबाईंनी गुजरातीत विश्वकोश निघावा या हेतूने विनामूल्य गुजरात विद्यापीठाला अठरा भागांचे हस्तलिखित देऊन टाकले. तरीही अद्याप तो कोश बाहेर पडलेला नाही.

१९३८ साली मी शांतिनिकेतनात गेले होते. मला आदिवासींवरचे तिथले वाङ्मय, संताळ लोक व बुद्धभवन पाहायचे होते. पालीचे शांतिनिकेतनचे सुप्रसिद्ध आचार्य विधुशेखर भट्टाचार्य नुकतेच शांतिनिकेतनातून निवृत्त झाले होते. शांतिनिकेतनात प्रवाश्यांची राहायची सोय असल्याने मी महिनाभर अगोदर शांतिनिकेतनाशी पत्रव्यवहार करून जाण्याचा दिवसही मुक्रर केला होता. त्यावेळी वडिलांचे मित्र भास्करराव ढवळे यांच्याकडे मी कलकत्त्यात महिनाभर होते. तेच मला विधुशेखरांकडे घेऊन गेले. विधुशेखरांचे साहित्य मी वाचले होते. विधुशेखर त्यांच्या पुस्तकापेक्षाही फार समंजस होते. ते म्हणाले. " बेटी, जातेस तर माझी म्हाताऱ्याची तीन पत्रे घेऊन जा. म्हणजे अडचण येणार नाही.' प्रवासी स्वतःचा खर्च करण्यास तयार असल्यावर अडचण कसली ते कळेना. पण मोठ्या माणसाचे ऐकावे, म्हणून मी पत्रे घेतली.

दुसऱ्या दिवशी रात्रीच्या गाडीने निघाले. भास्करराव बरोबर फराळाचे भरपूर ने असे म्हणत असता ऐकले नाही. सोलपूरला तर साडेबारा वाजून गेले होते. एप्रिलची सुरवात असल्याने ऊन्ह कडाक्याचे होते. बसमधून शांतिनिकेतनला उतरले. ऑफिसात पत्रे दिली. मला माझी खोली दाखवण्यात आली. खाट, दिवा, पाणी सारे छान होते. जेवणासाठी ऑफिसचे कार्ड आणायला गेले तर ऑफिस बंद झाले होते. जेवणाच्या हॉलचे दार बंद केले होते. जेवण नाही. मुकाट्याने खाटेवर पाणी पिऊन झोपले. शेजारच्या खोलीत मन्वेला नावाची फ्रेंच कलाकार राहात होती. तीही माझ्याबरोबरच बसने उतरली होती. ती माझ्या खोलीत आली. म्हणाली, " आम्ही परकीय म्हणून फसतो. पण तुम्ही इंडियन लोकही कसे फसता ? संकोच करू नको. माझ्याजवळ भरपूर खायला आहे. खाऊन घे. " आढेवेढे न घेता मी खाल्ले. दुपारी एक फ्रेंच चित्रकार भेटला. त्याचाही हाच अनुभव. " ही जागा प्रतिष्ठितांना मानवते. इतरांना नाही.' असे तो म्हणाला. आम्ही तिघे संध्याकाळी संताळांच्या खेड्यात फिरून आलो.

रात्री चांदणे छान होते. बंगालचे सुंदर अनुपम चांदणे पाहून मी

हर्षित झाले. पण रात्री ऑफिस उघडले नव्हते म्हणून तिकीट नाही व काही वेळाने बंद झाले म्हणून नाही. तात्पर्य जेवण नाही. मन्वेलाने थोडे दिले. दहा वाजता दिवे गेले. मोरीतले पाणी संपले. दुसऱ्या दिवशी सकाळी दीड रुपयाला दूध दिसेल न दिसेलसा अगोड चहा आणि एक टिपकागदासारखी पातळ ब्रेडची स्लाइस आली. आधाशासारखी ती खाल्ली. दुपारी घुसून तिकीट मिळवले व जेवले. रात्री दिवा नाही. दिवसा पाणी नाही. ' बुद्धभवन ' बंद केले होते. लायब्ररीत प्रवेश नव्हता. मी परत जाते म्हटले तर दोन दिवसांखेरीज बसची सोय व्हायची नाही असे कळले. तिसऱ्या दिवशी सकाळी 'गुरुदेवांना भेटायचे आहे का ' असे कृपलानींनी विचारले. एवढ्या मोठ्या माणसाशी मी इतकी क्षुद्र मुलगी काय बोलू ? असे म्हणून मी नाही म्हटले. दुपारी रवींद्रबाबूंच्या घरी चहाला बोलावले. एक कपभर चहा तेवढा आला. भूक आता शरीरातच नव्हे तर मनात चढली. तेवढ्यात श्री. दत्त नावाचे महाराष्ट्रात नोकरी केलेले एक पूर्व आय. सी. एस. तिथे होते. ते म्हणाले, " तुला टागोर व तुकाराम सारखेच नाही का वाटत ?" मी म्हटले, " मला बंगाली येत नाही. पण इंग्रजीतलं सारं वाचलं आहे. टागोर श्रेष्ठ कवी आहेत. नि तुकाराम संत कवी आहेत. " हे उत्तर त्यांना आवडले नाही.

दुसऱ्या दिवशी रवींद्रबाबूंनी आपल्या गाडीतून मला श्रीनिकेतनात नेले. पण नऊवारी खादी नेसणारी, मी मला साडया व पर्सेसमध्ये काही स्वारस्य नव्हते. अखेर पाचव्या दिवशी मी कलकत्त्याला परतले. कलकत्त्याला स्टेशनवरून भास्करारावांना फोन केला. ते म्हणाले, " दुपारी सिनेमाला जाऊ या. " मी म्हटले, " मी जिवंत यावी असं वाटत असल्यास स्वैपाक्याला मला आधी जेऊ घालायला सांगा. मी भुके 'बंगाला' चा अनुभव घेतलाय." ते खूप हसले.

दुसऱ्या दिवशी इंडियन म्युझियमचे आर्किऑलॉजिस्ट डॉ. रामचंद्रन, भास्कराराव व मी मिळून विधुशेखरांकडे गेलो. ' काय झालं बेटा ?' ते म्हणाले. भास्करारावांनी सारी हकीकत हसत हसत सांगितली. रामचंद्रनही हसू लागले. मंदमंद हसत विधुशेखर म्हणाले, " तरी मी पत्रं दिली होती. "

मग चेहरा गंभीर करीत ते म्हणाले, " सारा घोटाळा तुमच्या डॉ. केतकरांनी करून ठेवलाय. त्यांच्यासारखा कोश काढावा म्हणून दहाबारा वर्षं खटपट केली, पण यश न आल्याने नुकतेच ते खातं बंद केलं. त्यानंतर तू विद्वान होऊ पाहातेस ना ? म्हणून हे असं झालं. केतकरांचं नाव काढलेलं शांतिनिकेतनात खपत नाही. "

आम्ही सारेच मग हसलो नि उठलो.

अरेबियन नाइट्स

प्रार्थना समाजाच्या संस्थापकांपैकी मामा परमानंद व माझे पणजोबा, म्हणजे आजीचे वडील भास्कर हरी भागवत हे परम मित्र होते. आमच्या दोन घराण्यातला स्नेह मामांचे सुपुत्र डॉ. परमानंद व त्यांच्या पत्नी काकी दिवंगत होईपर्यंत म्हणजे मामांच्या मृत्यूनंतर साठ वर्षांहून अधिक काळ टिकला. परमानंदांचे ते कुटुंब काळाच्या उदरात रिचले आणि आमचे एक जिव्हाळ्याचे घर, नव्हे आमच्याच विशाल कुटुंबाची एक शाखा कायमची नष्ट झाली. सुंदर शिल्प एका रात्रीत भग्न व्हावे नि मग हळू-हळू त्यांच्या साऱ्या खाणाखुणा देखील उध्वस्त होऊन उरावी केवळ दुखरी आठवण तसेच या बाबतीतही झाले. या आठवणींच्या थडग्यावर जर अरेबियन नाइटस या कल्पित कथांच्या पुस्तकाचा कोरीव लेख नसता, तर हे नुसते मातीचे अवशेष राहिले असते. कुटुंबच सबंध मरते तेव्हा अखेर धपापणारी मातीच उरते.

मामांचे धाकटे चिरंजीव डॉक्टर होते. आमच्या आजीच्याच वयाचे; व तिच्याशी बाळपणी खेळलेले. तेव्हा त्यांना 'बाबू' याच नावाने घरातली वडील माणसे हाक मारीत. आम्हा मुलांना ते आपली नातवंडं मानीत. तरीही आम्ही सर्वजण त्यांना 'काका' 'आजोबा' वगैरे न म्हणता 'बाबू डॉक्टर' च म्हणत असू. डॉक्टर अतिशय कर्तबगार, करडे पण प्रेमळ व परोपकारी होते. साऱ्यांनाच त्यांचा धाक वाटे. पण मला इथे त्यांच्याबद्दल सांगायचे नाही. सांगायचे आहे ते काकींबद्दल नि अरेबियन नाइट्सबद्दल.

काकीला कुणी कधी पुस्तक वाचताना बघितलंच नाही. आडवं कुंकू

लावलेली, ठेंगणी ठुसकी, अंगाने जाड पण प्रसन्न गोऱ्या चेहऱ्याची काकी सदैव पदर बांधून स्वैपाकघरात काही तरी करीत असायची. स्वैपाकघराबाहेर सहसा ती दिसायचीच नाही. खटले मोठे, आवडी नावडी अमूप. लहरी वारेमाप–बाकीची माणसे पाहुणेरी. कष्टकरी काकीच. इतकी कष्टाळू की तिला कष्ट केल्याशिवाय चैनच पडायचे नाही. कुणी काम केले तर ते तिच्या पद्धतीचे नसल्याने पुष्कळदा मनाला यायचे नाही. म्हणून मग घरात लेकीबाळी दूरच्या सुना, मुलींच्या मुली असूनही काकी आपली कामात मग्न झालेली असायची. त्यामुळे अबोल झालेली–बोलताना वाक्ये तुटक यायची. मन मानेल तशा गप्पा तिला कधी मारताच आल्या नाहीत. कुणी म्हणायचे ती कुढी आहे. कुणी म्हणायचे ती मठ्ठ आहे. पण तिच्या मिटलेल्या मनात कुठे तरी एक निखळ भावनेचा झरा आहे आणि त्याचा शोध घ्यायला हवा असे मात्र कुणालाच वाटले नाही. खुद्द तिलाही या झऱ्याची जाणीव नव्हती. ती जाणीव तिला झाली नि मला ती दिसली. पण केव्हा? अगदी विपरीत परिस्थितीत. काकीचा एकुलता एक मुलगा प्रभाकर डॉक्टरच होता. देखणा, हुशार, परोपकारी नि एककल्ली. अविवाहित होता. चाळीशी उलटली होती. घरात खटके होत बापलेकांचे. वातावरण तंग असे. एकमेकांबद्दल मनात प्रेम फार; पण बाहेर अढी.

दोघेही आमचे कुटुंब–डॉक्टर. आमच्या घरात एकरूप झालेले. दोघांच्याही परोपकाराला जणू ऊत आलेला. पैशाची कदर नाही. कामाला विराम नाही. असे दिवस चालले होते, त्यात कंटाळाच होता. तो संपत नव्हता. पण त्यातून जीवनाची एकसूत्री कळाही लपत नव्हती. पण तो दाट कंटाळा एक दिवस फुटला. फुटला तो दुसऱ्या प्रचंड दुःखाच्या भग्नतेला निर्माण करून. विषमज्वराने प्रभाकर एकाएकी वारला. मध्यरात्री म्हातारा बाप काळीज घट्ट करून सग्यासोयऱ्यांना, मित्रमंडळींना ही दारुण वार्ता फोनवरून स्वतः कळवीत होता. स्वर शांत होता पण त्यातून आतली होळी लपली नाही.

आणि काकी? तिचे वर्णन काय करावे? केस सुटलेले, कुंकू फराट-

लेले. मुलाच्या प्रेताजवळ बसून ती आक्रोश करीत होती. म्हणत होती "कुणी करणी केली. काल रात्री माझी चोळी रक्ताने भरली, नि आज हे अघटित घडलं." डॉक्टर तिला आवरीत होते. धीर देत होते. स्वतः डोळे पुशीत होते. वैऱ्यावर न येणारा प्रसंग या देवमाणसांवर आला होता.

अंत्यविधी झाला. दिवस लोटत होते. काकी मात्र सैरभैर झाली होती. कुणाकरता रांधायचे ? कुणाला वाढायचे ? कोण येऊन विचारणार होते ? कोण आता रागावणार होते ? कुणाची आशा होती ? पण या घोर निराशेने काकीच्या वाणीला मुक्त केली. ती बोलू लागली. हवे ते नि नको ते. मला म्हणाली, "तुमचं घर ते माझं माहेर. तुझ्या पणजोबांनी माझं लग्न उरवलं. साऱ्यांनी छळलं. सुख तुम्ही मंडळी देता. आता सुद्धा छळतात. कुणी म्हणतं 'तू देवळात जा, प्रार्थनासमाजाचे सासरे. आम्हाला देवळात जायची' सवय नाही. आता कुठे जाऊ ? समाजाचे लोक म्हणतात, "आम्ही इथे उपासना करतो." मी म्हणते "कशाला ? तुमची बाटगी उपासना मला नको. तोच तसं म्हणायचा नि मारुतीला जायचा. माझा मारुती, माझा मारुती म्हणत प्राण सोडला. पण मारुतीने तरी काय केलं ? दुसरे म्हणतात 'काकी तुम्ही पोथी वाचा. तुकाराम वाचा' आणून दिली पोथी. छीः ! माझं नाही मन लागत. सारखी आग पडली आहे." काकी रडत होती बडबडत होती. घरच्यांचा आजवरचा इतिहास सांगून झाला. संताप अनावर झाला. फिरून फिरून मन आवरून म्हणाली. "तरी हे आहेत. सारी आपलीच आहेत. उठलं पाहिजे. उठेन. करीन मी सारं. पहिल्यासारखं करीन. सारं विसरून करीन. पण विसरायचं कसं ? एक सांग मला. मला पोथी वाचून विसरायला होत नाही. पूजेत मन लागत नाही. तू बुकं वाचतेस, नि बुकं लिहितेस. मला असं बुक आणून दे की मला घटकाभर तरी सारं विसरायला होईल. देशील ना ? उद्याच दे."

मी 'हो' म्हटले नि काळजीत बुडून गेले. या अशिक्षितातच गणल्या गेलेल्या म्हातारीला मी या अवस्थेत कुठलं मराठी पुस्तक वाचायला देऊ ? धर्मग्रंथ ? छे ! ते तर उघड निकामी होते. रामायण ? महाभारत ?

तेही नको. मग मला एक कल्पना सुचली. 'अरेबियन नाइट्स' द्यावा का? घरात अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टींचा जाडजूड ग्रंथ होता तोच द्यावा असे वाटले. मी वडिलांना विचारले तेव्हा ते म्हणाले, "तेच पुस्तक काकींना दे. अवश्य दे."

आणि मी ते पुस्तक भीत भीत दिले. कुणी मला म्हणाले सुद्धा की "काय म्हातारीची चेष्टा करतेस की काय?" पण मी लक्ष दिले नाही. काकीने अधाशीपणे ते पुस्तक घेतले. माझ्या समोरच तिने उघडून वाचायला सुरुवात केली. पाच मिनिटांत ती वाचण्यात गढून गेली. काकी वाचते हा अपूर्व देखावा होता. मी उठून गेले. तिच्या एकांताचा भंग मला करायचा नव्हता.

आणि काय नवल, सात आठ दिवसांनी गेले तेव्हा प्रफुल्ल चेहऱ्याची काकी चहाचा कप माझ्यापुढे ठेवून म्हणाली, "ये बाई ये. तुझं बुक छान आहे ग. मला सारं विसरायला झालं. पण मी ते ठेवणार आहे. तुला परत देणार नाही." डॉक्टर मिस्किलपणे म्हणाले, "पारायणं चालली आहेत त्याची नि काय? चला." त्या 'चला'मध्ये जे कारुण्य होते ते काय वर्णावे?

अरेबियन नाइट्स तेव्हापासून माझ्या स्मृतीत ग्रंथधर्मपोथीत जाऊन बसले आहे. बायबलसारखे. तुकारामाच्या गाथेसारखे. गीतेसारखे. किंबहुना त्याहूनही आगळे स्थान त्याने घेतले आहे. आता जेव्हा जेव्हा मी ते वाचते तेव्हा तेव्हा ते वाचताना मग्न झालेली काकी प्रथम माझ्या डोळ्यांपुढे येते आणि ती काकी जनीसारखी असते. ज्याची त्याची 'पोथी' अखेर वेगळीच असते तर. आणि ती तशी असते म्हणून तर वेदना बुजतात.

एक थंडगार गोष्ट

खूप खूप वर्षांमागची गोष्ट. १९१९ सालची. गारठलेले वर्ष. उन्हाळा पावसाळा, हिवाळा--सारे गोठलेले. धुकट वातावरण. भय नि भय. विलक्षण विस्मय. भयाचा विस्मय नि साऱ्याच शोकाचा. तो शोक घरीदारी नगरी आक्रोशत हिंडत होता. घरचे दारचे दुःख एकवटले होते. जाणत्यांना बधिरता आली होती. मोठी माणसे लोचटपणे जगत होती. सारीच माणसे पटापट मानमोडीच्या, इन्फ्ल्युएंझाच्या, त्या साथीच्या आजाराने अंथरूण धरीत होती. घराघरांत बिछाने; ताप; न्युमोनिया आणि अचानक मरण. डोळ्याडोळ्यांत जगायची आशा मरलेली नि मरणाची भीती दाटलेली. रोजचा विषयच लागणीचा, मरणाचा, चितेच्या सरपणाचा. मोठी माणसे लहानांना समजू नये म्हणून इंग्रजीत बोलत, पण एक इरसाल इंग्रजी शब्द इंग्रजीच्या रिंगणातून सुटून पोरासोरांच्या मराठीत मिळून गेलाच–मॉरटॅलिटी. वडील इंग्रजीत म्हणत, " आज किती मॉरटॅलिटी ?" चारशे–पाचशे–सहाशे. आकडे का पोरांना कळत नाहीत ? म्हणे रस्त्यावर जाऊ नका. घाबराल. का ? का, का म्हणत अनेक बाळमनांनी घरात खलबते केली. शोध लावला. मॉरटॅलिटी म्हणजे मरण; मृत्यू. इंग्रजीत आकडे म्हणतात म्हणून ते खूप खूप. हजार–लाख–परार्ध असतील–जाऊ द्या. कोण करते आकड्यांची उठाठेव. शाळा नाहीच आहे. बरी सुटी मिळाली आहे गणिताला. शंभर, हजार, लाख, कोट, परार्ध, निमकी, पावकी, पावशेर, मण, अर्धी पेनसील, फुटकी पाटी ! घरात बसून केलेल्या वर्तमानपत्राच्या घांदोट्या बऱ्या की, घे कातर की काप हवा तो कागद. कुणीच काही म्हणत कसे नाही ? कातरीचा चर चर आवाज. जाळी पडते आहे घडीच्या कागदा-

वर, नमुनेच नमुने. छानदार. अंत नाही त्यांना. लाख, परार्ध नमुने. माझे मी कापलेले. तयार केलेले. कुण्णी न दाखवता केलेले. अयाई ! पण ही कळ कुठे निघाली छातीत. आला खोकला... डोकीत चमचम. कोण म्हणते आहे ते 'घे औषध' म्हणून ? पलीकडे कुणाचा तो हुंदका ? दबल्यागत. कोण म्हणते आहे ते की शेजारची लीलाताई मेली म्हणून ? काल वडील गेले. भाऊ गेला, आज ती गेली. पोटातले बाळ घेऊन गेली. गजा पण मेला वाटते ! कामतांचे घरच गेले.

'छूत् ! मोठ्याने बोलू नका.'–कुणी म्हणते आहे. पण आंग्रेवाडीत लागण झाली की. सीताकाकू, रमाकाकू नि राम दोन तासांत गेले, घरी स्वैपाक कोण करणार ? कोण उचलणार त्यांना ? कुणीतरी माझ्या अंगाखाली हात घातला. मला उचलणार ? मेले मी ? आई मेली तशी ? मला नाही मरायचे. घेते मी औषध. खरेच घेते. हट्ट नाही करीत. 'मला मरून देऊ नको आजी ग. मला इथंच राहायचंय.'

मग, मग खूप काळोख दाटतो. गरम गरम हवा. खिडक्या बंद. श्वास कोंडतो. अंग गारठते... मग... मग शांत झोप. लांबलचक बाळझोप. कुणी जागते आहे जवळ वाटते ? जागेना का. झोपा. आता आता कुण्णी कुण्णी आपल्याला उचलणार नाही. मॉरटॅलिटी फक्त पेपरात. दूर गावाला. आंग्रेवाडीत. शेजारी. या खोलीत नाही.

मग गार गार रात्री; गारीगार दिवस आले. भोवतीची पावले हलकी झाली. आवाज मंदावले. एक दिवस चिमणीची चिवचिव. कावळ्याचा भसाडा काव काव आवाज, घशाला कोरड. पोटात भूक. मला राजबेरी हवी. आंबा हवा, कैरी हवी. कशाला देता औषध ? कडू तुरट, आंबट. कसला वास हा ? मॉरटॅलिटीच्या वासाचे औषध–नको मला. पोळी हवी. लाडू हवा. भाजी हवी... नाही तर मी रडेन..." रडून ताप वाढेल ना ? दूध घे. मग देऊ पोळी. औषध घे बरं आधी !"

" नाही घेणार. पोळी नाही तर मऊ भात दे. "

" भात नाही खायचा. डॉक्टर रागावतील. "

" मग ऊस दे. "

'' आता कुठून आणू ऊस ? खडीसाखर देते. मग झालं ? "

" नको मला. ऊस दे. पोळी दे. पिठलं दे. "

आजोबा येतात. अपराधी चेहरा घेऊन. उंचच उंच. भव्य. एरवी रुबाबदार करडा चेहरा. पण आता कसा आर्जवी झाला आहे. वरून खाली बघताहेत ते. पण नजर वर पाहाताना असावी अशीच आहे की. जशी काही मीच खूप उंच झाले आहे नि ते ठेंगणे झाले आहेत. खरेच की ते खाली आले आहेत. मीच वर वर जाते आहे.

हातात चकचकीत रुपया. विनवणी करीत ते म्हणतात, " घे बाळा औषध. पोळी देईपर्यंत रोज देईन तुला रुपया. "

" रोज ? "

" रोज. "

" लाख दिवस ? "

" हो. "

टोपलीभर रुपये डोळ्यांपुढे नाचले. नावडतीची आवडती झाल्याची गोष्ट एका क्षणात डोळ्यांपुढे रंगली, आजोबांची मी नव्हते लाडकी नात. बहिणीच्यावरच त्यांचा लोभ. मोठे पक्षपाती होते ते प्रेमाच्या बाबतीत. मला चाबकाने एकदा मारले होते त्यांनी. पण आज रुपया घेऊन ते माझी अजीजी करीत होते. मी खुलले. फुशारले, गुटकन औषध गिळले. दुधाचा कप रिकामा केला. रुपया हातात धरला, डोळ्यावर झापड-उशीखाली रुपया सारला.

रुपये झाले बारा. ठेवायला मिळाली पेटी. चावी असलेली रंगीत पत्र्याची पेटी. छनछन रुपये वाजत. सुळकन चावी फिरे. पेटी खरेच बंद होई. वाटेल तेव्हा उघडायला मेई. मी राणीएवढी श्रीमंत झाले होते. एवढ्या रुपयांची डोंगराएवढी बोरे येतील. नाही ? ऊस किती ? बिटक्या बाहुल्या शंभर ... दोन पैशाची एक बाहुली ... वाईट नाही. पण कसली ही घाण ? औ–ष–ध. नको ते आता. पण मग रुपये ? रुपये की औषध ? नकोत

रुपये नि नको औषध. वार्ता राज्यात पसरली.

आजोबा प्रधान आले. रुपयाची गोष्टीची पुस्तके देतो म्हणाले. " बरे आहे. पण रुपयापेक्षा गोष्टच बरी. गोष्ट सांगाल ?"

" सांगतो."

आजोबांना कधी कुणी गोष्ट सांगताना पाहिले नव्हते.

" तुम्हीच सांगितली पाहिजे."

" सांगतो. ऐक."

घसा खाकरून ते बोलू लागले. " गोष्ट आहे शेक्सपियरची. तिचं नाव विंटर्स टेल. हिवाळ्याची गोष्ट. बरं का."

आजवर कुणाची म्हणून गोष्ट कुणीच सांगितली नव्हती. गोष्टीचे नावही कधी कुणी सांगितले नव्हते. गोष्ट इंग्रजी म्हणून सांगत असतील ते. सिंड्रेलाच्या गोष्टीप्रमाणे. ॲलिसच्या गोष्टीप्रमाणे. पण शेक्सपियर कशाला लुडबुडतो इथे ? सरळच का नाही करीत सुरुवात ? एक होता अशी. फिरून आजोबा खाकरले. सहसा ते खाकरत नसत. क्षणभर घुटमळले. मग म्हणाले, " ऐक गोष्ट. "

ऐक काय ? सरळ सुरुवात करायची तर हे काय लावले आहे. दादा नाही असे करीत. कुणीच नाही असे करीत. यांना गोष्टच येत नसेल.

" सांगा की लवकर. "

" सांगतो. ऐक. एक होता राजा. त्याची एक होती राणी. एक होता मित्र."

अरेच्या, ही अगदी नवीच गोष्ट दिसतेय की. राजाराणीची नव्हे, तर मित्राची पण म्हणूनच शेक्सपियरचे नाव घेतले वाटते त्यांनी. निराळाच दिसतोय हा शेक्सपियर. वाल्मीकीपेक्षा मोठा की लहान ? पण –

" ऐकते आहेस का तू ?"

" हो. "

" राजाचं मित्रावर फार प्रेम. नेहमी त्याच्या घरी यायचा तो. दिवस दिवस राहायचा. आपल्याकडे काकासाहेब येतात ना तसाच. ते तुझ्या

आजीशी बोलतात तसाच तो पण राणीशी बोलायचा–पण–पण..."

"पण काय ?"

"राणी आजीसारखी म्हातारी नव्हती काही."

"माझी आजी नाही म्हातारी."

आजोबा जरा हसले; फिरून खाकरले नि म्हणाले,

"तसं नाही ग. पण एकदा ती फार तरुण होती."

"तरुण म्हणजे ?"

"तुझ्या आईसारखी. आत्यासारखी."

"हं."

गोष्ट सांगण्यातला एक अडथळा दूर झाला असावा. आजोबांच्या स्वरातला अवघडपणा गेला. आता पुढे काही सांगायला ते मोकळे झाले होते. राजाराणींना वयच नसते. पण या राणीचे वय मोठ्या माणसांचे होते आणि मोठ्यांच्या गमती ऐकायला मला फारच आवडायचे. कान टवकारून मी ऐकू लागले.

"राजाला खूप काम असायचे. राणी एकटी बसून कंटाळायची. मित्र नेहमी यायचा. राणीशी गोष्टी करायचा. गंमत करायचा. तिला खूप हसवायचा. राणी खूष झाली म्हणून राजा पण खूष झाला. मित्राला म्हणाला, तू नेहमी इथेच राहा ना. मित्र म्हणाला, 'माझं राज्य कोण सांभाळील ?' मग दोघांचं एकमेकांच्या घरी जाणं येणं आणखीच वाढलं. राणी पण मित्राच्या घरी राजाबरोबर जायची. एकदा काय झालं..."

गोष्टीत एकदा–एकदा–एकदाच व्हायचे असते ते. नेहमीचेच... पण काय ?

फिरून ते जरा अडखळले. मग सावरून फार सावधपणे आपल्याच बोलण्याचा आपणच कानोसा घेतल्याप्रमाणे बोलू लागले.

"एकदा काय झालं ? राजा खूप काम करून आला होता. राणीनं पाहिलं की तो दमला आहे. त्याला हसवलं पाहिले. मित्र गमत्या. त्याच्याकडे वळून ती म्हणाली–"

फिरून ते अडखळले...

" ती म्हणाली मित्राला, तुम्हाला आठवलं ना काल आपण कशी गंमत केली ती बागेत ? आपण कसे धावलो ? कशी फुलं गोळा केली ? तुम्ही मला कसे उखाणे घातले ? मी कशी उत्तरं दिली ? तुम्हाला मात्र माझे उखाणे सोडवता आले नाहीत.

" मित्र हसून म्हणाला, वहिनी, तुम्हाला मूल नाही. आम्ही तुम्हालाच लहान समजतो. नि हरतो. ते खरं थोडंच ?"

फिरून ते अडखळले. फिरून अवघडले. असे का होते आहे तरी ?

" बाबा. लंगडीत राणी हरली की मित्र ? खेळत नव्हती का ती दोघं ? मोठी बाग खेळायला. राणीला नाही काम. मग नव्हती खेळत तो, राजा नि मित्र ?"

एक सुटल्यासारखा सुस्कारा आजोबांनी टाकला. अवघडपणा फिरून गेला. ते हसून म्हणाले, " हो. सांगायचं विसरलोच होतो की मी. आठवत नाही सारं. म्हातारा झालो ना मी–खूप खेळत तिघंजण. नाचत पण."

" नाचायची ? "

त्याचे नाचणे मला पसंत नाही पडले. खेळ ठीक. " पण मोठी माणसे नाचतात ?'

" हो. ग, विलायतेत मोठी माणसं नाचतात. छान छान पोशाख घालून बायका–पुरुष सारे नाचतात. त्या नाचात मुलं मात्र नसतात. "

अभावितपणे आजोबा बोलले. फिरून अडखळले. जरा जीभ चावली त्यांनी. मी नवेच दृश्य पाहात होते. फारसे रुचकर नव्हते ते. खेळ, उखाणे, नाच, मुले, मोठी माणसे; इथे मेळ बसेना म्हणूनच कुतूहल वाढले. जाणत्यांच्या जगातला एक नवाच फासा माझ्यापुढे या गोष्टीने न कळत फेकला होता. पुढे काहीतरी नवेच घडणार आहे ही खात्री बळावली. जिवाचे कान करून मी ऐकू लागले.

" पण इकडे काय झालं ? मित्र आणि राणीच्या गप्पा वाढल्या आणि राजाला राग यायला लागला; राणी माझ्याशी कधीच असं बोलली

नाही. कधी उखाणे घातले नाहीत. माझ्याशी नाचते तेव्हा बोलत नाही. मित्राबरोबर नाचते तेव्हा बडबडत असते. राजा खूप चिडला. त्याचा चेहरा रागाने लाल झाला. मित्र आणि राणी बोलायची थांबली. थट्टा थांबली. हसणं थांबलं. सारं थांबलं. वारा वाहायचा बंद झाला. मित्र उठला नि म्हणाला, मित्रा चल आपण बागेत फिरून येऊ. तू आणि मी... फिरून मोकळेपणानं हसला. राजाच्या पाठीवर त्यानं थाप मारली. राजानं हात हिसडून टाकला. तो म्हणाला, मी कशाला ? तुम्ही दोघंच जा-राणीचं तोंड उतरलं. ती रडू लागली. मित्र कावराबावरा झाला. राजा उठला नि आपल्या महालात निघून गेला. मग काय झालं ? राजाचा मित्र पण रागावला आणि घोडयावर बसून चालता झाला. फिरून म्हणून मित्रांच्या घरी यायचं नाही असं त्यानं मनात ठरवलं. राणी रडत बसली. राजाचा प्रधानाला हुकूम सुटला की राणीला रानात नेऊन मारून टाक. ती वाईट आहे. मी दुसरी राणी आणीन. प्रधानाबरोबर राणी निघाली. नाही हो, मी वाईट नाही-असं ती सारखी म्हणत होती. राणीला रानात नेलं. चोरून तिची दासी तिच्या मागोमाग गेली. प्रधानाला म्हणाली, राणीला बाळ व्हायचं आहे. मारू नका-प्रधानाला दया आली. हरणाला मारून त्याच्या रक्तात रुमाल भिजवून त्यानं तो राजाला दाखवला. राणीला तावडतोब मारून आलो असं म्हणाला-खरंच मारलीस तिला ?-राजानं विचारलं, खरंच, गळ्याशप्पथ-प्रधान म्हणाला-ठीक केलंस-राजा म्हणाला नि डोळे पुशीत महालाचे दार लावून बसला."

आवडत्या-नावडतीच्या गोष्टीसारखीच झाली होती गोष्ट आता. पण हिच्यात आवडती मात्र नव्हती. एकटया नावडतीच्या गोष्टीत इतका रसाळपणा असेलशी मला कधीच कल्पना नव्हती. एक रामायण होते खरे. रामाने सीतेला टाकली-धोबी बोलला म्हणून. पण सीता बिचारी काय करणार ? कुणी तिला नेलं तर ? तरी लक्ष्मणाची रेघ तिने ओलांडलीच ना! पण राम आपला देव, त्याची गोष्टच कुठे ! ही राणी पण पोटात बाळ घेऊनच वनवासी झाली. सीता काही एकटीच नव्हती तर अशी. देवांच्या

गोष्टी माणसांत घडतात तर ! हा एक नवाच अनुभव आला. कुतूहल दुप्पट वाढले. आता साऱ्याच अंगाला कान फुटले.

" इकडे काय झालं ? राणीला त्या दासीनं आपल्या घरी नेलं नि लपवून ठेवलं. पुढे राणीला झाली एक मुलगी. ती मुलगी रानात नेऊन टाकली. ती सापडली एका कोळ्याला. सुंदर मुलगी पाहून कोळ्याला फार आनंद झाला. त्यानं तिला घरी नेली. आपल्या बायकोला दिली. तिला पण ती मुलगी आवडली. तिनं तिला लहानाची मोठी केली."

इथे गोष्ट रामसीतेच्या गोष्टीपासून सरळ सुटी झाली होती. राणीने मुलीला टाकले.

" पण बाबा, राणीनं मुलीला का टाकलं हो ?"

क्षणभर आजोबा घुटमळले. " राणी म्हणाली दासीला, राजाला नाही आवडणार माझं बाळ. तू तिला सोडून दे. वाढू दे कुठेतरी. असेल नशीब तर जगेल ! "

इथे काहीतरी उघड ते लपवीत होते. ते की शेक्सपियर ? आजोबा खोटे बोलत नसत. पहिल्यानेच ही गोष्ट गोष्ट नसून शेक्सपियरची गोष्ट आहे, हे मला भासले. तेव्हापासून शेक्सपियरची प्रत्येक गोष्ट त्याची त्याचीच आहे अशी भावना उत्पन्न झाली आणि प्रत्ययही येत गेला. आजोबांनीच पुढे, मर्चंट ऑफ व्हेनीस, टेनिंग ऑफ दि श्रू, मिडसमर नाइट्स ड्रीम, हॅम्लेट, किंग लियर, ज्युलियस सीझर या साऱ्या गोष्टी सांगितल्या. त्यातले शेक्सपियरपण मनात पूर्ण बिंबले. शेक्सपियरचा वेगळेपणा इथूनच कळला. ही गोष्ट अशी का तर ती शेक्सपियरची म्हणून हा भाव मनात उमटला नि मग राणीने मुलीला का टाकले ही शंकाच मिटली. गोष्ट पुढे चालू झाली. न हिंदकळता. न अडखळता. शेक्सपियरची गोष्ट.

" इकडे काय झालं ? राणी गेली तरी राजानं दुसरं लग्न केलं नाही. घरात एकटा राहायचा. सारा दिवस काम काम काम. मित्र गेला तो गेलाच. फिरून गाठभेट नाही. राजा फिरून नाचला नाही. गायला नाही. हसला नाही. दिवसामागून दिवस गेले, वर्षामागून वर्षे गेली. राणीची आठवण

त्याला सारखी येऊ लागली. मित्राचं आणि राणीचं मस्करीचं बोलणं आठवू लागलं. राजाला वाटायला लागलं की ते सारं बोलणं अगदी साधं होतं. वाईट नव्हतं. उगीच आपण त्यातून वाईट अर्थ काढला. राणी गमावली, मित्र गमावला. राणीला तर आपण ठार मारलं. तो मनात झुरू लागला. देवाजवळ पापाची क्षमा मागू लागला. राणी कुठे भेटणार ? पण मित्र अजून त्याच्या गावी होता. मोठा राजा होता तो. त्याचा मुलगा मोठा झाला होता. राजाच्या दाढीचे केस पिकले होते. तसेच मित्राचे पिकले असतील. त्याला आठवतो का आपण. करील का तो आपल्याला क्षमा ? राजाला चैन पडेना. त्यानं मित्राला कळवलं की माझी चूक झाली. मित्राचं मन कळवळलं. त्यानं राजाला निरोप पाठवला–झालं ते झालं. आपण फिरून मित्र होऊ.

" इतक्यात काय झालं की मित्राचा राजपुत्र होता तो रानात शिकारीला गेला होता. त्याच्या नजरेला कोळ्याची मुलगी पडली. त्याला ती आवडली. त्यानं कोळ्याशी मैत्री केली. मुलीला पण तो आवडला. करीन तर हिच्याशीच लग्न म्हणून त्यानं हेका धरला. कोळी घाबरला. राजपुत्राच्या आईबापांना, प्रधानाला कुणालाच ही गोष्ट पसंत पडेना. राजपुत्र राजवाड्यात रुसून बसला. कोळ्याची मुलगी रडत घरी बसली.

" इकडे काय झालं ? राणीच्या आठवणीशिवाय राजाला क्षण जाईना. त्यानं तिचा पुतळा करायचं ठरवलं. समारंभानं पुतळा घरात आला. लोक जमले होते. पुतळ्यावरचा पडदा दूर झाला. राणीची हुबेहूब प्रतिमा. तेच डोळे, तेच नाक. तसेच हातपाय. कुठे कुठे फरक नव्हता. त्या पुतळीत नि पूर्वीच्या राणीत. राजा पाहू लागला. पुतळीच्या पापण्या हलल्या नाहीत ? सफेत रंगाची पुतळी. दगड खरंच का इतका नाजुक असतो ? कातडी मऊ असेल तिची राणीसारखीच ? बोलेल का ती ? चालेल का ती ?

" लोक घरोघर निघून गेले. पुतळी हलू लागली. राजाला वाटलं की हा भासच असावा. पण नाही. ती चालू लागली. राजाला आनंद झाला. पुतळी चक्क जिवंत झाली होती. होतं असं कधी कधी. पाप गेलं, पुण्य

वाढलं, की देव करतो पुतळ्यांना जिवंत. पुतळी जवळ आली. कितीतरी दिवसांनी म्हातारी दासी पण तिच्या मागे उभी राहून बघत होती. रडत होती. हसत होती. ती जवळ आली आणि राजाच्या पाया पडून म्हणाली, महाराज क्षमा करा. राणीसाहेबच आहेत या. माझ्या घरी मी त्यांना लपवून ठेवलं होतं. मूर्तिकाराशी मसलत करून मीच राणीसाहेबांना पुतळी म्हणून उभं केलं. महाराज त्या फार चांगल्या आहेत. पदरात घ्या त्यांना. राजानं पाहिलं तर पुतळीच्या डोळ्यांतून पाणी वाहात होतं. त्यानं हात लावला. तर तो गाल राणीचाच होता."

इकडे आजोबा किंचित थांबल्यासारखे वाटले. बोलण्याचा वेग तसाच होता. तो त्यांना आवरताच येत नव्हता. आता तर त्याला आणखीच जोर चढला. त्यांना किंचित धाप लागली. शब्दामागे काहीतरी घुसळत होते त्यांच्या डोळ्यात एक लकाकी तरळत होती. पण नजर कुठे तरी गेली होती. माझ्याकडे पाहाण्याचे ते टाळीत होते. काहीतरी लक्षीत होते. काहीतरी लपवीत होते. पण मी का फसते ? मला उमगले की या शेक्सपियरच्या गोष्टीतून आजोबा काय हुडकीत होते ते; त्या गोष्टीत ते काहीतरी स्वत:चे घालीत होते; मला पण त्यात ओढीत होते. ही गोष्ट शेक्सपियरची. पण आजोबांच्या व्याकुळ नजरेने त्यांनीच त्या राजाची भूमिका घेतली हे माझ्या नजरेतून निसटले नाही. एवढेच नाही तर राजाला राणी मिळाल्यावर जो आनंद, जे आश्चर्य शेक्सपियरच्या गोष्टीत होते. तेवढेच मात्र त्यांच्या नजरेतून गळले होते. आजोबांना राणी गवसली नाही. ही राणी कोण ? आजी तर इथेच होती. मग ही मेलेली राणी कोण ? हं ! कळले. ही राणी शेक्सपियरच्या गोष्टीतली राणी नव्हे. आजोबांच्या नि माझ्या सामायिक गोष्टीतली हरवलेली मुलगी होती. बायको होती, आई होती. माझी आई. आजोबांची सून. गोष्टीतली कोळ्याच्या घरची मुलगी, ती राणी, सारे काही ज्याला आम्ही राणी म्हणूच शकत नव्हतो ते तिच्यात होते.वेगवेगळ्या माणसांशी तिचे नाते वेगळे. पण ओढ मात्र तीच. व्याकुळता वेगळी. लहान मोठी. व्याकुळ म्हातारे आजोबा मृत तरुण सुनेला, उद्याच्या घरधनिणीला

काळात बुडी घेऊन वर काढू पाहात होते. अंधारात प्रकाश शोधीत होते. शेक्सपियर हा मुखवटा घेऊन त्यांना भुलवीत होता. माझ्या बाळमनाला वडीलपणाच्या भाबडेपणाचे, निराशेचे नवे दर्शन देत होता. जीवनातले नवे तीनपात्री नाट्य सुचवीत होता. त्या नाट्यातले एक मुख्य पात्र होते. पण ते पडद्याआड गेलेले होते. ते म्हणजे माझी नवमृत आई. बोलणारे पात्र एकच. मुकुट ढासळलेल्या वृद्ध राजाचे. मात्र ते पात्र मला म्हणजे श्रोत्यालाच त्या पडद्याआडचे पात्र मानून बोलत होते. "तू का गेलीस ?" एवढेच त्या मुलीला त्यांना विचारायचे होते. पण ते बोलणे शक्य नव्हते. काळाला कान नसतात. मृत्यूला डोळे नसतात. तेव्हा ते तिची मुलगी मी, मी आजारी झाल्याने मलाच तिच्या जागी कल्पून विविधभावे मला ते गोष्टीच्या रूपाने आळवीत होते. रंजवीत होते. या त्यांच्या द्विधाभावाची जाणीव मला इथे या स्थळी झाली. आजोबा माझे नव्हते, तर माझ्या आईचे. ते माझ्याशी बोलताहेत पण ते खरे नाही. मी आपला नुसता भोज्या आहे. खेळातला. ते आईशी बोलताहेत; मेलेल्या माणसाशी बोलताहेत हे तीव्रतेने मला भासले. एक धुके उमटले. सारे जड झाले. आजोबा घाबरले आहेत. आई निष्ठुर आहे. अगतिक आहे. हे फार फार जाणवले. भयाची शिरशिरी अंगभर पसरली. किती भयंकर शेक्सपियर हा. ही काय गोष्ट की काय ? मुला-म्हाताऱ्यांना छळणारी ? पण कान मात्र अनिच्छेने ऐकतच होते. अंधाराकडे डोळे पुन्हा पुन्हा वळून बघत होते. गोष्टीचा उरलेला भाग आजोबा भराभर सांगू लागले.

"राजाला फार फार आनंद झाला. पण राणी रडू लागली."

"दासी म्हणाली, त्या रडतात कारण त्यांना मुलगी झाली. तिला त्यांनी तुमच्या भीतीने रानात सोडून दिली. काय झालं बिचारीचं कुणाला ठाऊक ?"

"आता मात्र राजा फार हळहळला. मुलीचा पत्ता लावायचा निश्चय केला. त्यानं मित्राला आमंत्रण पाठवलं. मित्र आला. फिरून तिघांच्या गोष्टी सुरू झाल्या. पण त्या आता राजपुत्राच्या आणि हरवलेल्या राजकन्येच्या होत्या. राजपुत्राची कहाणी ऐकून राजाराणी हळहळली. त्यांनी मित्राचं मन

वळवलं. कोळ्याची मुलगी राजपुत्राची नवरी ठरली. राणी म्हणाली मी घेते तिला माझी मुलगी म्हणून मांडीवर. म्हणजे हरकत कसली राहिली ? माझी मुलगी अशीच एवढीच असती की--कोळी आनंदला. मुलगी आनंदली. कोळ्याने मुलगी आपल्याला कशी कुठे मिळाली ते आनंदाच्या भरात सांगितलं. खाणाखुणा पटल्या. राणीचीच ती मुलगी. मग आनंदाला काय तोटा ? लग्न थाटात पार पडलं. मेलेली राणी राजाला मिळाली. हवी असलेली बायको राजपुत्राला मिळाली. मित्राला मित्र मिळाला ... संपली गोष्ट."

हे म्हणताना आजोबांच्या आवाजात थोडासा कंप आला. गोष्टीतच मेलेली राणी परत येते. हरवलेली मुलगी सापडते. राजपुत्राचे मनासारखे लग्न लागते. मानमोडीने मेलेली माणसे मात्र मरतात ती तशीच राहातात ना ? बायका नवऱ्यांना सोडून, पोरांना सोडून जातात त्या जातात. म्हाताऱ्यांच्या पोरी कायमच्या गायब होतात. गोष्ट शेक्सपियरची असली म्हणून काय झाले ? तीसुद्धा मानमोडीची साथ पार थंड करून गोठवून टाकते. गोष्टीतल्या आनंदमीलनाची पार शिळाच होते की, नेहमीच्या गोष्टीसारखी ही गोष्ट शेवटी आनंदात हालचालत नाही. ती आमच्यात निश्चल होते. फक्त शेक्सपीयरची असते तेव्हाच जिवंत पुतळीचे नाटक घडते. इकडे फक्त कठीण थंडपणच उरते. म्हणजे उरलेच आहे. अजून ते माझ्या उरात तसेच गोठून पडून आहे.

विनायक दामोदर सावरकर

नाशिकचे कोंदट पुराणे गाव. बेचाळीस वर्षांपूर्वीचे. देवदेवतांची गर्दीच गर्दी. भटभिक्षुक, न्हावी, वाणी, यात्रेकरू ह्यांची सदाच लगबग चाललेली. बाकीचे नागरिक सुखी, शांत व निर्लेप. कशाचेच सुख-दुःख नसलेले. कशान्‌कशाला सदा वेढून कधीं रोडावलेली तर कधी फोफावत जाणारी गोदेच्या पाण्याची धार. कधी रुपेरी. कधी काळी कधी, लाल. आकाश भरले होते. वारा थांबला होता. नदीतीर स्तब्ध होते. गुलमोहोराच्या पाकळ्या घपापून पडत होत्या. बाहव्याचा प्रचंड मत्त पिवळा गेंद पिवळ्या अजगराप्रमाणे पाण्याच्या क्षीण धारेवर झेपावत होता. माझे मन बेचैन झाले होते. त्या परतंत्रकाळातल्या अनेक तरुण–तरुणींप्रमाणे आतल्या आत धुमसत होते; रडत होते; स्वप्ने बघू बघू करीत होते. हातात होते कागद. नीटनेटक्या पेन्सिलीत लिहिलेले. अमोल ठेवा होता तो. पारतंत्र्याच्या चिडीच्या लाल ज्वाळांनी अक्षर नि अक्षर पेटलेले होते. स्वातंत्र्याच्या तहानेचा अपार शोध होता. आव्हान होते. आवाहन होते. सावरकरांचा सिंहगडाचा पोवाडा होता तो. त्यावेळी जप्त झालेला. माझ्या काकाने मला कवितेचे अपार वेड म्हणून मुद्दाम नकलून पाठवून दिला होता. त्या पाठवणीमागे एका गुप्त खलबताचा संकेत होता. बंदिवान सावरकरांना आमच्याशी जोडणारा तो एकमेव दुवा होता. कासावीस मनाला उभारी देणारा संदेश होता. नको शिक्षण, नकोत भोग, नको स्वास्थ्य, नकोत मानसन्मान. देशाखातर देहाची कुर्बानी करण्याची ती शिवकालीन परिभाषा नसानसांत सावरकरांनी मोहरू घातली. हरिभाऊ आपट्यांनी तानाजी मालुसऱ्याच्या बलिदानाची छबी माझ्या बालहृदयात कोरली होती. ती छबी आता सजीव

मूर्ती झाली. मानवमूर्ती झाली. हारतुऱ्यांनी नटलेली वीरमूर्ती झाली. एका-क्षणी ती मूर्ती सळसळे; स्फुरे. सेवाभावाने सद्‌गदित होई. तर दुसऱ्या क्षणी ती मूर्ती प्रेत होऊन पडलेली असे. कृतकृत्यतेचे जीवन्मरण तिच्या तोंडावर फुललेले असे. सारी सजीव सृष्टी त्या सतेज प्रेतापुढे निर्जीव दिसे. अर्थ-शून्य भासे. असेच जगावे. असेच झुंजावे. ठायी ठायी शत्रू आहेत – पण ते शत्रू मुसलमान नाहीत. इंग्रज आहेत. इंग्रजांचे नोकर आहेत, घरी दारी आहेत; व्यापारी, धनी, मानी सारे देशाचे द्रोही आहेत. दरिद्रनारायणाचे हिंसक आहेत; शिवशाहीपासून, हिंदुपदपादशाहीपासून पोवाड्यातला ताना मला दूर दूर नेत होता. सत्याग्रही वातावरणाच्या स्वातंत्र्याकांक्षेकडे तो खेचून नेत होता, सिंहगड केवळ प्रतीक झाला होता. फक्त ताना–अमुचा ताना सदैव घरोघर नवनूतन संदेश नेत होता. कारण घर घरच मुळी आमच्या स्वातंत्र्यसंग्रामात गड बनले होते. उभे कडे होते संकटाचे. सागराच्या लाटा, नदीच्या लाटा गर्जत होत्या.

Rules Britannia

Britannia rules the waves.

त्याबरोबर शाळेत, पुस्तकात, इतिहासात एक वाक्य सारखे मनाला स्पर्श करीत होते– ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधीही मावळत नाही– आणि इकडे आमुचा ताना त्या विश्वासाला धडक देत होता. रक्तबंबाळ होऊन तो वर वर उठत होता. मरत होता नि मरता मरता म्हणत होता

शिवनेरी श्रीमान आला
स्वातंत्र्यसूर्य ये उदयाला
त्या सूर्याचा किरण रणांगणि तळपे तानाजी।

आता सूर्य चक्क दोन झाले होते. एक मराठ्यांचा, भारताच्या खड्‌गहस्ताचा, सूर्य कधी उगवतो म्हणून उतावळा झालेला नि दुसरा ब्रिटि-शांचा. बलाढ्य चंडरश्मी प्रतापी सूर्यमहाराज; दर्पाने मी कधी मावळणार नाही, जाणार नाही असे म्हणणारा. आणि या दोन सूर्यांच्यामध्ये वेडया लाटा हलके हलके सुकत होत्या, मऊ चिखलाच्या कडक भेगाळलेल्या वडया

धरत होत्या. माणसाच्या मनातल्या भेगांइतक्याच त्या भेगा मनाला खुप लागल्या. फुलता गुलमोहोर शेवटी धारोधारी कोरड्या मातीत गळतो. बाहव्याचे नयनमनोहर सौंदर्य धुळीला लोळते आहे आणि जिच्यासाठी ते इतके आसुसले आहे ती पाण्याची धार तर त्याच्याकडे बघण्याइतकी उमेदीत राहिलेली नाही. तरवारीच्या पात्यासारखी ती शुष्क लखलखीत झालेली आहे. हे पाणी नाही. जीवन नाही. ही जरा आहे; हे जिवंत मरण आणि मेलेले जीवन, काय फरक आहे त्यात? सावरकर म्हणतातच आहेत–

देशार्थ जनन आपुले
देशार्थ मरण आपुले
देशार्थ पडो द्या काया
धर्मार्थ पडो द्या काया
जाईल ना तरी वाया

खरेच किती लाजिरवाणे जिणे होते आमचे. भविष्यकाळची, विद्येची, संसाराची, प्रतिष्ठेची नि हरतऱ्हेच्या सुखवस्तूपणाची धुंद स्वप्ने नवयौवनाच्या उंबरठ्यावरच आम्हाला घेरून टाकत होती. मी हे करीन नि ते करीन. मी देईन. मी घेईन. मी हे सारे करीन नि देशभक्ती पण, आणि मग सावरकर तुच्छतेने हसून म्हणत होते, दोहोपैकी एक सोडा सुख सोडा. कारण–

श्वानहि भरते पोट बापुडे
चघळुनिया तुकडे
शणामाजी बांधुनि वाडे
नांदति शेणकिडे
संसार तसा जरि करी
मनुजता तरी
कशासी वरी
हो तुच्छ किडाचिच का तो
जो गुलाम असुनी हसतो

परदास्यी स्वस्थचि बसतो
धिग् धिग्--

धिक्कार चहूकडे उठला. धुळीच्या चक्रात. झाडावरच्या पातेऱ्यात. पाखरांच्या कलकलाटात. सारी सृष्टी पोळत होती. शुष्क होती. उदास होती. गुलमोहोराच्या लालिम्याला, बाहव्याच्या फुलोऱ्याला हिणवीत होती. त्यांनी झडावे म्हणून चेटूक करीत होती. नुसते रूप नको. गंध द्या. सुरस सुगंध घ्या. चिखलाच्या मांसात मुरवण्यासाठी रक्तरस द्या असे म्हणत होती.

सिंहगडावर तुझी आर्यभू
फोडी हंबरडे
गुलामगिरिचा खून पाडण्या
जा जा जा तिकडे

तिकडे जाच तर आता. स्त्रीत्व व्रतवृत्तीकडे ओढू लागले. जिजामाता उग्र होऊन म्हणत होती–

गड सर केल्या विना न शिवणे
अन्न शपथ तुजला

नि पुरुषांनो बांगड्या भरा नाहीतर वीरपौरुषाची ग्वाही द्या असे म्हणत होती; आणि स्त्रीपुरुषांना, आबाल वृद्धांना आवाहन देत होती. त्या आवाहनातच उत्तर आले : जिवंत मरण व मेलेले जीवन या दोहोंत जिवंत मरण बरे. मरण सदा ताजे, सजीव असावे.

'स्वातंत्र्याचा तीर' आपणही व्हावे. कारण –

देवदूतहो स्वातंत्र्याच्या
पवित्र कार्याला
येतो आहे अमुचा ताना
रक्षण व्हा त्याला
हे मंगळ तारांगणही
अप्सरा जनहो
गडावरि जाहो

तानाजि लढाया येतो
अरिमार एकला की तो
परि धीर पुढेचि घुसतो
त्या धीरावर वर्षा अमृत
आणि फुले ताजी

मनात उत्तर आले. बुद्धीला पटले. आता गुलमोहोरांच्या गळ्याला, बाहव्याच्या फुलोऱ्याला नि नदीच्या क्षीण धारेला, चिखलाच्या भेगांना एकमेकाशी सांधून टाकणारा नवा अर्थ प्राप्त झाला. आज संध्याकाळी नवीन संध्या मी पढत होते. एकटीच. त्या दिवशी जुनी कात गळली. कशाचा तरी, खूप दूरच्याच अतीताचा, अप्राप्याचा ध्यास मला लागला. जवळच्यात दूरचे क्षितिज दृग्गोचर होऊ लागले. काळ्या रंगावर अपार प्रीती जडली. सुकली माकलेली, तहानलेली सृष्टी कसला तरी अमोघ रससोत कणाकणातून धारण करते आहे. त्या स्रोताचा अनुभव घेतला पाहिजे. प्राण गहाण टाकून घेतला पाहिजे अशी ओढ उत्पन्न झाली. आवतीभवतीची सजीव निर्जीव वस्तू माझी आहे. माझ्या देशाची आहे. गरीब देशाची आहे, म्हणूनच अमोल आहे. हे दैन्य उधारीने फिटणार नाही. कष्ट, बुद्धी, भावना, बळ, प्राण सारे काही रिते केले पाहिजे. पण हा माझा साठा किती क्षुद्र तरी ? काय होणार त्याने ? समुद्रात मूठभर वाळू. रामायणात घडला होता तसाही सेतू बांधण्याचा चमत्कार. पण असा चमत्कार धर्माच्या इतिहासात एकदाच घडतो. ते युग आमचे नव्हते. यंत्रांचे नव्हते. विमानोड्डाणाचे नव्हते. सर्वसंचारी संशयाचे, ज्ञानपिपासेचे नव्हते. आमचे शतक ज्ञानाचे सागर रिते करते आहे. आमचे शतक ? म्हणजे पाश्चात्यनिर्मित्त विसावे शतक ना ? ते का आमचे ? होय आमचे; जितके त्यांचे तितके आमचे. त्यांनी आम्हाला जित केले तरी त्या बंधनातून मुक्त होऊन आम्ही त्या ज्ञानसत्रात भाग घेऊ. लवकरच म्हणजे आमची पिढी समग्र गेल्यावर किंवा त्यानंतरही कधी तरी. पण स्वातंत्र्यसूर्याची जाणीवच मुळी त्याच्या अस्तित्वाची हमी नव्हती का ? अंदमानाच्या भिंतीत ती कोंडलेली नव्हती.

देशातल्या हरदिनी वाढत चाललेल्या स्वातंत्र्याच्या चळवळीत ती आधार घेत होती. पोसत होती. प्राणाचे मोल देऊन पोसण्यासारखे अमूर्त असे माणसाच्या जीवनात काही तरी असते हीच संथा मला त्या संध्येने दिली. ती अमूर्त गायत्री आपल्या विसाव्या शतकातल्या आसन्नयौवना कन्येच्या मनात निनादू लागली. सिंहगडाचा पोवाडाच होता तो. पण ती आता तानाजीची कथा नव्हती. 'अमुचे' म्हटले जावे असे सारे जे हुतात्मे, प्रयोगी, योगी, ज्ञाते, जगभरचे होते त्यांची ती गाथा होती. पण त्या गाथेला स्वतःचे शब्द अजून गवसत नव्हते आणि म्हणून ती सिंहगडाच्या पोवाड्यात परकाया प्रवेश करून बसली होती. कितीतरी वर्षे. आणि म्हणून मी तो पोवाडा अर्थ न जाणताच किती तरी वर्षे 'प्रेमे' गात असे. गुणगुणत असे. आयुष्यातल्या सर्व तंद्रांत स्वातंत्र्येच्छेची ही तंद्रा फार काळ टिकली. तो संभ्रम होता नि तरल जागृती पण होती.

ती संध्या उलटली तरी धुंदी तशीच राहिली. सहा महिने लोटले नि जानेवारी सहाला (१९२४) ऐकले की सावरकरांची मुक्तता झाली. नाशिक सावरकरांचेच गाव. लोक आनंदाने सद्गदले. एका थेटरात त्यांच्या फोटोचा सत्कार झाला. नाशिककरांना रत्नागिरीचा हेवा वाटू लागला. मीही त्या गर्दीत जाऊन न समजणारी भाषणे ऐकली. मुख्य म्हणजे सावरकरांची हारांनी सुशोभित झालेली प्रतिमा पाहिली. तो सोहळा मी विसरले. सावरकरांना प्रत्यक्ष आयुष्यात कधी पाहिले नाही. पाहावेसे वाटलेही नाही. कारणे दोन. एकतर त्यांचा व माझा राजकीय मार्ग दुभागला होता; तिथून त्यांच्याकडून नवा आदेश मिळण्यासारखा नव्हता. त्यांची व माझी धर्मप्रेरणाही अगदी वेगळी होती. संघटित धर्माची मला अद्यापही भीती वाटते. पण त्यांना भेटावेसे वाटले नाही याचे कारण दुरावा नसून सावरकरांच्या कविहृदयाचे मर्म एका शब्दात माझ्या कल्पनेने, भावनेने, स्मृतीने जिवाभावाने टिपून घेतले होते. भेटीची गरजच राहिली नव्हती. त्यांचे कमला काव्य मी वाचले आणि त्यातल्या दोन ओळी माझ्या मनात ठसल्या. सावरकरांची पुष्पप्रीती माझ्या मनात भिनली.

बालकवींच्या कवितांइतक्या जर मला त्यावेळी कुठल्या काव्यपंक्ती आवडल्या असतील तर त्या –

दयिता दयिता माझी सुमलोकातल्या पहा
घाली झेपा मधावरी मदनाचा दलाल हा.

भ्रमराचे वर्णन सांकेतिकच असले तरीही 'सुमलोक' या शब्दाने मला वेड लावले. बालकवींनाही हा शब्द भेटला नाही. महाराष्ट्रातल्या कुठल्याही कवीला अद्यापही ज्या शब्दाने भेट द्यायचे टाळले, तो हाच शब्द सावरकरांनी सुमलोक पाहिला. त्यासाठी ते झुरले. त्यासाठी ते आनंदले; त्यासाठी त्यांनी सारे सोसले. कविमन उफाळते ठेवले. वीराची चलबिचल झाली. दिशांची चुकामूक झाली. पण कवी भुलला नाही. फसला नाही. हिरकणीसारखा हा शब्द त्यांनी नेमका उचलला. तो आपलासा केला. शब्दच का? पुष्टसृष्टीच त्यांनी त्या प्रतिमेत नवी घडवली. भारताला त्यांनी फुलबागेसमान मानले व 'सागरास' कळवळून म्हटले –

फुलबाग मला हाय पारखा झाला
सागरा प्राण तळमळला.

पण ती क्षणिक भूल होती. फुलबाग नव्हे तर समस्त सुमलोकच त्यांच्या काव्यात, आणि त्यांच्यामुळे मराठी काव्यात कायमचा, सुखाने बंदिस्त होऊन पडला. तो मला भासतो आणि म्हणूनच सावरकरांची मार्ग-भिन्नता मला बोचत नाही.

कर्वे आले, कर्वे गेले

एकोणीसशे अठ्ठावीस ते बत्तीसचा विकट काळ. मी कॉलेजच्या दुसऱ्या वर्षात असेन. मी आजारी होते. कॉलेजात गेले नव्हते. सकाळी दहाची वेळ. दरसालप्रमाणे अण्णासाहेब कर्वे वर्गणी मागायला आमच्या घरी आले. त्यांच्या व आमच्या घराचा ऋणानुबंध त्यांच्या विद्यार्थीकाळापासून, राजारामशास्त्री भागवतांमुळे आलेला. पुनर्विवाह झाल्यापासून बायाही त्यांच्याबरोबर येत. आताही त्या त्यांच्याबरोबर आल्या होत्या.

या वर्षी वर्गणी देता येण्यासारखी माझ्या वडिलांची परिस्थिती नव्हती. तंत्रज्ञ, वैज्ञानिक यांच्या घनघोर बेकारीचा तो विलक्षण काळ होता. माझे वडील बेकार होते. पुण्याच्या अनाथ विद्यार्थीगृहाची देणगी कधी चुकली नाही. पण आता एका मागून एक स्मरणपत्रे येत होती. मला आठवते, पावसाळ्यात आम्ही बहिणी भिजतच कॉलेजमध्ये जायच्या. छत्रीचा उपयोग नव्हता. कोट परवडत नव्हते. 'व्हिक्टोरिया करा' म्हणून वडील म्हणाले. रुपयाकरता खिशात हात घातला आणि तसाच रिकामा हात बाहेर पडला. त्यांच्या डोळ्यात इतकी तीव्र निराशा, मुद्रेवर असा खजील भाव मी पूर्वी कधी पाहिला नव्हता; पुढेही पाहिला नाही.

माझा काका माधवही एम्. एस्. सीत सुवर्ण पदकाचा मानकरी होता. पण तोही बेकारच होता. पुढे तो मिठापूरच्या टाटा केमिकल्सचा मॅनेजर झाला ते वेगळे. वडील व काका नोकरीसाठी वणवण भटकत. पण काहीच कुठे जमत नव्हते.

भरीत भर म्हणजे माझी आत्या सीताबाई भागवत ही नाशिकला हेड मिस्ट्रेस होती. आम्ही मुले आई वारल्यानंतर तिच्याकडे असू. तीही

विषमाने अकाली वारली होती. आजोबांनी अनेकांना पैसे हजारावारी दिले पण ते बहुतेक बुडले होते. टाटासारख्या कंपनीत बरेच भाग होते. पण ती कंपनीही तेव्हा डबघाईत असल्याने आर्थिक परिस्थिती तंग होती.

कर्वे व बाया आल्या. कर्वे आजोबांच्या खोलीत बसले. बाया आजीकडे बोलत बसल्या. कर्व्यांना आत्या वारल्याचे माहीत होते. पण त्यांनी चुकूनसुद्धा सांत्वनाचा शब्द काढला नाही. वर्गणीचा कागद मात्र मामुली बोलता बोलता पुढे केला. झालेल्या आघातांनी आजोबांना अर्धांगाचा झटका येऊन ते अंथरुणावरच होते.

" सीता गेली; कर्वे, परिस्थिती कठीण आहे. "

" चालायचंच, बाळासाहेब, पण सार्वजनिक काय तर झालंच पाहिजे ना. स्त्रियांच्या शिक्षणाला तर तुमच्यासारख्यांनीच पहिल्यापासून उचलून धरलं. नाही म्हणू नका. काही द्या. पाच पैसे सुद्धा चालतील. सीताबाईच्या नावाने द्याना. " कर्व्यांना पाच पैसे कसे द्यायचे ? सीताबाईसारख्या गुणी कन्येच्या नावाने लहान देणगीही देता येत नाही याचे आजोबांना अगोदरच दुःख वाटत होते. मी चहा घेऊन तिथे गेले तेव्हा हा संवाद मी ऐकला. तिथेच उभी राहिले.

माझ्याकडे पाहून कर्व्यांनी मान हलवली. चेहऱ्यावरची रेषासुद्धा ढळली नाही.

" बाळासाहेब, देणगी द्यायचे कितीतरी प्रकार असतात. पैशाच्या देणगीहून माणसाची देणगी फार मोठी. "

आजोबा चमकले ! सीताबाईच्या स्मृतीतून वर आले.

कर्वे मितभाषी. पण ते पुढे बोलू लागले. " बाळासाहेब, ही मुलगी अशक्त दिसते. काय शिकते ? "

" इंटर झाली आहे. "

" पण या प्रकृतीने शिक्षण कसं झेपणार ? पुढे काय होणार ? हिला तुम्ही हिंगण्याला पाठवा. प्रकृती नक्की सुधारेल. आम्ही तिची फी वगैरे काही घेणार नाही. जी. ए. एक वर्षात होईल. लगेच नोकरी देऊ. पाहा,

तिचा घराला उपयोग होईल." आजोबा गडबडले. "तुम्ही म्हणाला ते खरं आहे कर्वे. प्रकृती चांगली हवीच."

"पाहा विचार करून. उद्या येतो मी. अहो आमच्याकडे तिचं शिक्षण फुकट होईल; शाळेत नोकरी मिळेल. लग्नही जुळवून देऊ." डोळे किलकिले करून कर्वे बघत होते. वाघाला पाहून हरीण जागीच खिळते तशी मी तिथेच हतबुद्ध होऊन उभी राहिले.

आजोबांनी ते हेरले. "काय ग बाई तुला काय वाटतं?"

"मला हिंगण्याला जायचं नाही."

मी तिथून निघून गेले. हातातल्या रिकाम्या पेलेबशा कापऱ्या हातात थडथड उडत होत्या. पाठीलाही कर्व्यांची नजर जाणवत होती.

बायांची तर मुळी नको तिथे बोलण्याबद्दल ख्याती. या वर्षी वर्गणी देणे किती कठीण आहे हे आजीने सांगितले, तेव्हा बाया म्हणाल्या, "अहो अक्का, पैसे नाहीत तर दुसरं काहीतरी द्या." आणि जवळचा पितळेचा तांब्या त्यांनी उचललाच. होय–नकोचा सवालच नव्हता. आजीचा चेहराही रडवेला झाला होता. इतकी वर्षे दिले ते आता देता येत नव्हते हीच गोष्ट मनात खटकत होती. पण तांब्या हस्तगत करायचा प्रकारही रुचत नव्हता. बाया म्हणत होत्या, "सीता गेली तरी दुसऱ्या मुली शिकताहेत. मिळवतील पैसे; पण आमच्यासारखं नाही मागायला लागायचं हो त्यांना– चांगले हपिसर करतील त्या. पाहा अक्का, कर्वे काळे नि मी गोरी. पण पुनर्विवाहाची बायको; करतो कोण? पदरी पडलं नि पवित्र झालं."

दोघाही नवराबायकोंनी वर्गणीचे पर्याय आपापल्यापरी सुचवले. कर्वे उठले. "मी येईन लवकरच" ते म्हणाले. एरवी ते वर्षातून एकदाच येत. आणि ते लवकर म्हणजे पंधरा दिवसांनी आले. आणि नंतर महिन्यातून एक तरी चक्कर घालू लागले. माझी बहीणही आता कॉलेजात जाऊ लागली होती. कर्व्यांना ते कळले. त्यांनी एकीऐवजी दोघींच्या शिक्षणाची तयारी दाखवली, दोन नोकऱ्या एका घरात देण्याचे आश्वासन दिले. हिंगण्याची सुंदर हवा, सोपा शिक्षणक्रम हे तर मोठेच प्रलोभन होते.

आजोबा मवाळले. तंग परिस्थिती त्यांनाही असह्य होत होती. "मी पाठवीन त्यांना हिंगण्याला. पण ही परीक्षा उलटू दे."

कर्व्यांनी चहाचा रिकामा कप खाली ठेवला. ते जायला उठले.

आजोबांनी वडिलांना बोलावले. ते म्हणाले, " खर्च पेलत नाही मुलींना हिंगण्याला पाठवायचं ठरवलंय मी." वडील आजोबांच्या शब्दाबाहेर कधीच गेले नव्हते. " ठीक आहे " ते म्हणाले.

त्या ठीक आहे ने आम्हा दोघी बहिणींच्या काळजाने मात्र ठाव सोडला. आम्ही रडू लागलो. आजीची पाठ धरली -- " आजी गं, आम्हाला हिंग. ण्याला पाठवू नको."

आजीला ते पटले. ती आजोबांना म्हणाली, ' हे काय नवं डोक्यात घेतलं आहे तुम्ही ? मुलींना कॉलेजात स्कॉलर्शिपा मिळताहेत. त्या का तुम्हाला जड झाल्या ? मुंबईचं शिक्षण सोडून हिंगण्याच्या रानात कुठं पाठवता त्यांना--काय आहे अर्थ त्या शिक्षणात ?"

आजीच्या भडिमारापुढे आजोबा वरमले. " बरं राहिलं माझं. झालं तुझं समाधान ?"

पण कर्वे येतच राहिले. आणि त्यांनी आपले पालुपद सोडले नाही. ते आले की आजोबा विचलित होत. त्यांना हो म्हणत. मग आमचे रडणे, आजीच्या तोंडचा पट्टा आणि आजोबांची नाराजीची माघार, हा प्रकार ठरलेलाच. आजी तर पुढे कर्वे येताना दिसले की म्हणायची, "आले म्हातार-बुवा पोरींना रडवायला."

आमची एक आतेबहीण इंदु काळे डॉक्टर झाली होती. तिचा आसरा आम्हाला असे आणि आजीलाही कर्व्यांना नाही म्हणायला प्रोत्साहन तिचेच होते. पण दैवदुर्विलास असा की ती एकाएकी क्षय होऊन वारली. मिळवणारे माणूसच घरात उरले नाही. आजी नातीचे मरण पाहून अगदी गळली, आणि त्यानंतर कर्वे आले. नव्या मरणाबद्दल सांत्वन असे.

" बाळासाहेब, झालं त्याला इलाज नाही. मुंबई युनिव्हर्सिटीचा कोर्सच असा की तो बायकांना झेपत नाही. मग प्रकृती ढासळते. म्हणून

सांगतो की या मुलींना हिंगण्याला पाठवा. तुम्हाला काळजी नको करायला." आजोबांना गहिवर आवरेना. आम्ही नातवंडे म्हणजे त्यांच्या काळजाचे घड होतो. हे नवे मरण अतीच झाले होते--माझी बहीण कमल सायन्सकडे होती. माझे ज्युनियरचे वर्ष होते. प्रश्न एकाच वर्षाचा होता. पण आजोबांना तो काळ युगासारखा भासला. एका वर्षात आणखी कुणी मूल गळले तर ? काळाने गिळले तर ? ही धास्ती त्या पंगू वृद्धाने घेतली. कर्वे तर सुदृढ प्रकृतीचे, हिंगण्याच्या निकोप हवेचे तुणतुणे वाजवीतच राहात. हा मिशनरी फार चलाख होता. मितभाषित्वात कुठेही भावना न ओतता हे गृहस्थ दुसऱ्याच्या भावनांना कसे चांगलेच हलवीत, हे पाहून मी विस्मित झाले; भयाने थरथरले. कर्वे म्हणजे बागुलबोवाच भासू लागले. झाले. त्या दिवशी आजोबांनी कर्व्यांना सांगितले की पंधरा दिवसांत मुलींना हिंगण्याला पाठवतो म्हणून. वडिलांना त्यांनी बोलावले आणि सांगितले की "मुलींना हिंगण्याला पाठवण्यावाचून गत्यंतर नाही."

माझा काका नुकताच मिठापूरला नोकरीला लागला होता. पगार दीडशे रुपये. पण त्या वेळी त्या कंपनीची दशा अशी होती की महिनोमहिने पगार हाती येत नसे. त्यात घरात एक आत्या क्षयाने आजारी व तिची मुले. आणखी धाकट्या काकाचा आजार कधी बरा न होणारा.

अशा या परिस्थितीत आशेचा किरण म्हणजे पुढल्या मुलांची प्रकृती चांगली राहाणे हाच होता. आजोबा पैशाची पर्वा करणारे नव्हते. पण आम्हा मुलांना आरोग्य मिळावे म्हणून कर्व्यांपुढे लाचार झाले. कर्तबगार पुरुषाची वृद्धावस्थेतली हतबलता कशी असते, ते मी या वेळेला बघितले. आजीही त्याच आघाताने बधिर झालेली होती. तिलाही विरोध करायला त्राण उरले नव्हते. "कर्वे, मुली येतील." आजोबा म्हणाले. आणि आम्ही दोघी बहिर्णींनी रडून आकांत केला. वडील कष्टी पण मूग गिळून होते. कर्व्यांच्या करारनाम्यावर शिक्कामोर्तब झाल्यासारखे आम्हाला वाटले.

आणि आम्ही दोघींनी आता आजोबांवर दडपण आणायचे ठरवले. झेवियर कॉलेजचे रसायनशास्त्राचे प्राध्यापक (कै.) रा. ना. भागवत हे

मानलेले चुलते, आणि आमचे कुटुंबवैद्य डॉ. परमानंद यांच्याकडे आम्ही धाव घेतली. आमचे बौद्धिक वकीलपत्र रामूकाकाने आणि आरोग्याचे वकीलपत्र परमानंदांनी घेतले.

दोघेही रात्री घरी आले. डॉक्टर म्हणाले, "बाबा, काय म्हणता तुम्ही ? झालं ते वाईट खरं. पण तुमच्या मुलींच्या प्रकृतीची हमी मी घेतो. वाटलं तर त्यांना इंग्लंडला उत्तम हवेत शिकायला पाठवतो. पण हिंगण्याला त्या जायच्या नाहीत."

"पण पैशाचं काय ?"

"मुलींच्यापेक्षा जास्त मोलाचं काही नाही. त्याही आमच्याच मुली आहेत. आम्ही खर्चू पैसा, तुम्ही चिंता करू नका. घरात इतकं दुर्दैव आल्यावर त्यातून पुढे नक्की चांगलं होतंच. विश्वास ठेवा, बाबा, उद्याचे दिवस चांगले आहेत."

'पण मी कर्व्यांना शब्द दिला आहे ना." आजोबांचा शब्द म्हणजे भीष्मप्रतिज्ञाच.

डॉक्टर म्हणाले. "मग त्यांना कळवा की मुलींची शिक्षणाची व्यवस्था परदेशात होते आहे. म्हणजे तुमचं वचन मोडणार नाही."

"पण हे बरं वाटत नाही रे."

"मुली शिकतात ते बरे वाटत नाही ?"

"नाही रे, पण कर्व्यांसारख्या थोर माणसाला एकदा म्हटलं ते नाही कसं म्हणू ?"

"हात्तेच्या ते माझ्यावर सोपवा. मी सांगतो त्यांना की बाबांना आजारामुळे नातींना जवळून दूर करावंसं वाटत नाही."

मात्रा लागू पडली. खरोखरच नातवंडे दूर गेली तर आजोबांना करमत नसे.

पण तसे ते जिद्दखोर. "पण त्यांच्या प्रकृतीच्या दृष्टीने कर्वे म्हणतात तेच बरोबर"... इत्यादी.

रामूकाका म्हणाला "बाबा, हिंगण्याची युनिव्हर्सिटी कुठे नि मुंबईची

कुठे ? कमा तर सायन्सला आहे. तिथे काय शिकवतात ते ? दोघी मुली हुशार आहेत. फार थोडे मुलगे त्यांच्यासारखे असतात. कॉलेजात सर्व प्रोफेसर त्यांना चाहतात."

"खरंच मुली हुशार आहेत रामू."

"मग मी काय खोटं सांगतो ? आणि बाबा, मीही तुमचा मुलगाच आहे. माझ्या आयुष्यात प्रथम दादा नि नंतर त्यांची मुले. माझा पगार कुणासाठी आहे, सांगा पाहू ? मुलींच्या शिक्षणाचा उगीच बाऊ करता तुम्ही." आजोबा फार गहिवरले. "बरं तर नाही पाठवत त्यांना–झालं तुमच्या मनासारखं ?"


"आणि फिरून त्या कर्व्यांना थारा देऊ नका. वगंणीपरी वर्गणी घेतात नि वर दुसऱ्यांच्या घरात नसती भांडणं सुरू करतात." आजी म्हणाली. तीही मनातून सुखावली. परिस्थिती होती तीच होती. पण या प्रेमाच्या पाठिंब्यामुळे उद्याचे तांबडे फुटलेले तिला जाणवले.

आणि आम्ही ? आमची आत्या सीताबाई नेहमी एक गोष्ट आमच्या मनावर बिंबवायचा प्रयत्न करायची. "मुलींनो, चोळीपोळीला कुणाला महाग होऊ नका."

आम्ही विद्यार्थी होतो. पैसे मिळवीत नव्हतो. पण गुणांमुळेच विद्यावेतन मिळत होते. काटकसर, कौशल्य आणि कष्ट यांची परमावधी आम्ही करीत होतो. पैसा मिळवला नाही तरी तो वाचवू पाहात होतो. सारी कामे करीत होतो. पण कर्वे अधुनमधून येत. आणि फिरून दोन दिवस हवा उलटी वाहू लागे. मनातली धुगधुग गेली नव्हती. पण आमचे पाठीराखेही आजोबांना आश्वासने देतच राहायचे.

मानी घरात दुसऱ्या कुणाची पैही घेतली जात नाही. आमच्या घरातही घेतला गेली नाही; आणि असेच दीड वर्ष उलटले. मी बी. ए. फर्स्ट क्लासात आले. बहीणही नंतर बी. एस. सीत पहिल्या वर्गात आली. आजोबांना आता विश्वास आला आणि नंतर वडिलांचा धंदा सुरू झाला. काकाची नोकरी नीट सुरू झाली. आणि मग मात्र कर्वे यायचे बंद झाले. ते

त्यानंतर कधी आमच्या घरी आले नाहीत. कर्व्यांच्या विद्यापीठात जावे न लागल्यामुळे माझा जो फायदा झाला तो पैशांच्या बाबतीत नगण्य असला तरी ज्ञानाची आकांक्षा फलद्रूप होण्याच्या बाबतीत अनमोल आहे. मग कर्वे आले नि गेले म्हणूनच त्या लाभाबद्दल आनंद होतो; आणि तरी ती स्मृती खडयासारखी खुपते; धास्तीत काढलेली वर्षे कुणाला कधी गोड वाटली आहेत का ?





REFBK-0027050